शनिवार । १ ऑगस्ट १९८१ । एक रुपया

माणूस

# हरिनाम सप्ताह

पुण्याहून 'श्रमिक विचार' हे मार्क्सवादी दैनिक प्रसिद्ध होत असते. या दैनिकाच्या ६ जुलैच्या अंकात 'वेध' या सदरात मुंबईत येऊन गेलेल्या एका तरुण पोलीश कामगार-नेत्याच्या मुलाखतीचे वृत्त व त्या अनुषंगाने काही विचार व्यक्त करण्यात आलेले आहेत. हा तरुण पोलीश कामगार-नेता लेच वॉलेसा यांच्या नव्या 'ऐक्य' (Solidarity) संघटनेचा कार्यकर्ता होता. स्वतःला कम्युनिस्ट म्हणवणारा होता. त्याचे वडील जन्मभर कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते होते. आणि तरीही हा मुंबईत आलेला तरुण पोलीश कामगार-नेता चर्चमध्ये प्रार्थनेला जाण्यात कसलाही कमीपणा मानणारा नव्हता. मुलाखतीसाठी जमलेल्यांपैकी एकाने या तरूण कामगार-नेत्याला यासंबंधी बरेच छेडले. शेवटी सरळच त्याला विचारले, 'तुम्ही स्वतःला पुरोगामी म्हणवता आणि तरीही चर्चमध्ये जाता. तुम्हाला काही त्याबद्दल वाटत नाही? मनाच्या सदसद्विवेक बुद्धीची टोचणी?'

चीड आणणारा हा प्रश्न होता. पण पाव्हण्याने सौम्य आवाजात प्रश्न विचारणाऱ्यालाच उलट विचारले, 'काय रे मित्रा! आम्ही सर्व मंडळी पूर्ण गाढव असून तुम्हीच फक्त सूज्ञ आहात असे तुम्हाला खरोखरच वाटते का?'

वाटत असले पाहिजे.

कारण दुसऱ्याच दिवशीच्या, म्हणजे ७ जुलैच्या 'श्रमिक विचार'मध्ये 'समाजवाद, भक्तिमार्ग व ३० लाखांचा हरिनाम सप्ताह' असा एक दणदणीत लेख प्रसिद्ध झाला आहे व त्यात साकरवाडी येथे महाराष्ट्रातील अग्रगण्य साखर-कामगारनेते श्री. किशोर पवार संयोजित करीत असलेल्या हरिनाम-सप्ताहावर कडाडून टीका करण्यात आली आहे. या लेखाचे लेखक आहेत प्रा. रणजित परदेशी. त्यांनी लेखात बरीच विद्वत्ता दाखवली आहे व शेवटी म्हटले आहे: 'साथी किशोर संयोजित 'गंगागीर हरिनाम सप्ताह' म्हणजे धार्मिक परंपरावादाने समाजवादाचा साखर कामगारांचा घेतलेला बळी आहे. समाजक्रांतीला बांधलेले समाजवादी असे किती कार्यकर्ते क्रांतिकारी तत्त्वज्ञानाच्या अभावी धार्मिक परंपरावादाच्या सुळावर चढविणार आहेत?'

पोलंडमधील चर्चने तेथील समाजवादाचा बळी घेतलेला दिसत नाही. उलट तथाकथित क्रांतिकारक तत्त्वज्ञान पोलंडमधील कामगारांना सुळावर

चढवत होते. अशा वेळी पोलंडमधील धार्मिक परंपरावाद पुढे आला व त्याने कामगारांना दडपशाही आणि भ्रष्टाचार याविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. आपल्याकडे मात्र अजूनही धर्म ही अफूची गोळी आहे, हे मार्क्सवादी वचन प्रमाण मानून धार्मिक प्रश्नांवर लिहिले-बोलले जात आहे व हरिनाम सप्ताहासारख्या समाजात सत्वगुणाची वाढ करू पाहणाऱ्या उपक्रमांना विरोध केला जात आहे. मार्क्स काहीही म्हणो, माणसाने जगाच्या पाठीवर कुठेही, केव्हाही, क्रांती झाल्यावर किंवा होण्यापूर्वी, धर्माला कायमची सोडचिठ्ठी दिलेली नाही. कोंबडे कितीही झाकण्याचा प्रयत्न केला तरी रशियातसुद्धा धर्मश्रद्धेचा पुन्हा उदय सुरू आहे, ही वस्तुस्थिती आहे. अमेरिकेत व इतर बिगरमार्क्सवादी देशात तर धर्मपंथाचे नवे पीकच फोफावते आहे. प्रवृत्ती आणि निवृत्ती या दोन काठातून मानवी जीवनप्रवाह वाहत असतो आणि मार्क्सवादाने एका काठाचा पूर्ण ताबा घेतला तरी दुसऱ्या काठावरचा आणि त्याहीपलीकडचा प्रदेश पाहण्याची गरज व ओढ माणसाला नेहमीच वाटत राहिली आहे व यापुढेही वाटत राहणार आहे. ज्या मानवी संस्कृती केवळ एकाच काठावर उभ्या राहिल्या, केवळ इहवाद-भौतिक जीवन यावरच ज्यांनी भर दिला त्या अल्पजीवी ठरल्या. पारलौकिकाकडे डोळे लावून बसलेले समाजही टिकलेले नाहीत. समाजातील कर्ते पुरुष, ज्ञानी, सत-महंत हे ह्या निवृत्ती-प्रवृत्तीचा योग्य मेळ कसा साधायचा, त्या त्या काळी गमावलेला या दोन्हींचा तोल पुन्हा कसा सावरायचा हे सांगत असतात, प्रत्यक्ष आचरून दाखवत असतात. वारकरी संप्रदायानेही हे कार्य मध्ययुगात आपल्याकडे केलेले आहे व ही परंपरा आजही विनोबापर्यंत टिकून आहे. केवळ निवृत्ती किंवा प्रवृत्ती असा एकाच अंगाचा विचार या वारकरी तत्त्वज्ञानात असता तर ज्ञानोबांपासून विनोबांपर्यंत सातशे वर्षे ही परंपरा नित्यनूतन स्वरूपात टिकून राहिलीच नसती. मार्क्सवाद एकांगी आहे, परलोक नाकारणारा आहे, धर्माला अफूची गोळी मानून निकालात काढणारा आहे म्हणून शे-दीडशे वर्षांतच त्याची शकले उडू लागली आहेत. विज्ञानाच्या, इहलोकविचाराच्या वाढीबरोबर अध्यात्म किंवा परलोकविचार, धर्मविचार नष्ट होतो, या दोन प्रवृत्ती परस्परमारक आहेत हा आधुनिकतावाद्यांचा एक उथळ गैरसमज आहे. अगदी युरोपात, जिथे विज्ञान, औद्योगिक क्रांती, समाजवादी तत्त्वज्ञान यांचा जन्म झाला तेथेही धर्माला, अध्यात्माला नेस्तनाबूत करून विज्ञान किंवा समाजक्रांतीची नवी मंदिरे उभी राहिली, असे घडलेले नाही. विज्ञानाबरोबरच किंवा आगेमागे धर्मसुधारणेच्या लाटाही युरोपभर फैलावलेल्या होत्या. ल्यूथर किंवा काल्व्हिनची ख्रिस्ती धर्मसुधारणा अगोदर, की नवे उत्पादनतंत्र व त्यासोबत आलेली आर्थिक सामाजिक क्रांती अगोदर, यावर तिकडचे समाजशास्त्रज्ञ आजही आपापल्या बाजू मांडीत असतात. पण एक नक्की. कर्मठ मार्क्सवादी सोडले तर धर्म आणि समाजक्रांती यांना एकमेकांचे शत्रू समजण्याचा अडाणीपणा तिकडे आता फारसा दाखवला जात नाही. भौतिक आणि नैतिक-आध्यात्मिक या दोन्ही अंगात बदल होतात तेव्हा काळ बदलतो. उत्पादनतंत्र, विज्ञान जसे विकास पावते तशी धर्मश्रद्धाही बदलते, विकास पावते. अगोदर कुणाचे पाऊल पुढे पडते हा कधी न सुटणारा कूटप्रश्न आहे. भोवतालच्या सृष्टीविषयी असलेले अज्ञान, त्यामुळे वाटणारी भीती, त्यातून येणारा शरणागत भाव ही धर्मश्रद्धेची प्राथमिक स्वरूपे असली तर संपूर्ण चराचरा-


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : नववा

१ ऑगस्ट १९८१

किंमत : एक रुपया

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

विषयीचा प्रेमभाव हे तिचे अंतिम, विकसित स्वरूप आहे व विज्ञान कितीही वाढले तरी या प्रेमभावनेची, या आत्मौपम्यवृत्तीची महत्ता व श्रेष्ठत्व कधीही कमी होण्यासारखी नाहीत. एखाद्या आइन्स्टाइनला त्यामुळेच गांधीजी श्रेष्ठ वाटत राहतात आणि शेकडो नव्हे, अक्षरशः हजारो वैज्ञानिक ख्रिस्तापुढे नतमस्तक होण्यात कसलाही कमीपणा मानीत नाहीत. धर्माचा, धार्मिक पीठांचा वापर हितसंबंधी, प्रस्थापित वर्ग आपल्या स्वार्थासाठी करीत असतात, हे खरे आहे. पण विज्ञानाचा असा वापर केला जात नाही का ? कला-साहित्य असे राबवले जात नाही का ? म्हणून कुणी कलेला, साहित्याला, विज्ञानातील शोधांना अफूची गोळी समजण्याचा अडाणीपणा करीत नाही. खरा वैज्ञानिक दृष्टीचा माणूस धर्म-अध्यात्म ही माणसाची भाकरी इतकीच महत्त्वाची गरज आहे, हे मानण्याइतका वास्तविक सूज्ञ असायला हवा. पण सुज्ञपणा दाखवला तर आपल्याकडचा समाजवादी तो कसला? त्यामुळे किशोर पवारांना विरोध होत आहे. किशोर पवार हरिनाम सप्ताह यशस्वी करण्यासाठी कुणावर सक्ती करीत असतील, काही गैर मार्गाचा अवलंब होत असेल तर विरोध अवश्य व्हायला हवा गंगागीर महाराज मठात काही भ्रष्टाचार, गैरप्रकार असतील तर त्यांचीही चौकशी व्हायला हरकत नाही. पण अशी सक्ती नसेल, असे भ्रष्टाचार-गैरप्रकार नसतील तर हरिनाम सप्ताहाला आक्षेप घेण्याचे काहीच कारण नाही. हरिनाम हे प्रेमसुखाची वृद्धी करण्यासाठी आहे. 'प्रेमसुख देई। प्रेमसुख देई ॥' एवढेच मागणे सतांनी पुन्हा पुन्हा आपल्या सावळ्या विठ्ठलाकडे मागितले आहे. आपल्या प्रत्येक कर्मात प्रेमपूर्वकता कशी आणावी एवढ्याचसाठी गीता-ज्ञानेश्वरी आहे. दासबोध आणि गाथा यातून हेच सांगितले गेले आहे. कुणी प्रवृत्तीपासून सुरुवात करून निवृत्तीची शिखरे गाठली, तर कुणी या शिखरावरून खाली उतरून–'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे व्यय करी ॥ असा जमिनीवरचा उपदेश केला. प्रपंच आणि परमार्थ या दोन्ही अंगाचा विचार प्रत्येक संताने केलेला आहे. फक्त प्रपंचात किंवा परमार्थात जे काही कराल ते गोडीने, प्रेमाने करा एवढेच संताचे सांगणे आहे. ते जर एखाद्या हरिनाम सप्ताहामुळे पुन्हा लोकाच्या मनावर ठसवले गेले तर 'क्राती बुडाली, क्रांती बुडाली' म्हणून उगाच हाकाटी पिटण्यात काय अर्थ आहे ? कर्मठ सनातनी लोक 'धर्म बुडाला' म्हणून हाकाटी पिटत असतात. क्रांतीवादयांची ही नवीन हाकाटी दिसते! शब्द फक्त वेगळे!!

–श्री. ग. मा.

पुणे वार्ता

## सुरुवातीला सत्तेपासून दूर, नंतर पुलोदशी युती आणि आता अचानक इंदिरा–काँग्रेसशी जवळीक...

# नागरी संघटनेच्या तत्त्वशून्य राजकारणाचा प्रवास

माहितगार

पुण्यातल्या दैनिक 'सकाळ'मध्ये काही दिवसांपूर्वीच एक बातमी आली होती. बातमीचं शीर्षक होतं 'वरात अशी फिरली!' एका लखपतीचं वऱ्हाड एक दिवस गया रेल्वेस्टेशनवर उतरले. तिथल्या एका तरुणीबरोबर या लखपतीच्या मुलीचा विवाह होणार होता. देणं-घेणं, मानपान, मुहूर्त सगळं काही ठरलेलं होतं; हा सगळा लवाजमा घेऊन वऱ्हाड आता गयेमधल्या आपल्या नियोजित जातीकडे जाणार होतं. पण अचानक रेल्वेस्टेशनवरच दुसऱ्या एका श्रीमंताच्या लोकानी त्याना गाठलं. 'इथे तुम्हाला काय देतील, त्यापेक्षा जास्त पैसा आम्ही देतो, आमच्या मुलाशी तुमच्या मुलीचं लग्न लावून द्या!' अस त्यांनी मागितलं. व्यवहार झाला आणि एकदम वऱ्हाड तिथून निघालं ते थेट या नव्या स्थळाच्या गावी गेलं आणि तिथं थाटानं लग्नसमारंभ साजरा झाला!

त्यानंतर थोडयाच दिवसांनी या गंमतीदार बातमीची आठवण करून देणारी एक बातमी 'सकाळ'मध्ये झळकली. पुलोद आघाडीचे संबंध तोडून नागरी संघटना काँग्रेस (आय)शी सहकार्य करणार! दोन्ही बातम्यामध्ये विलक्षण साम्य होतं. जास्त पैसा मिळतोय असं पाहताच वऱ्हाडी लोक ठरलेलं लग्न मोडून तिकडे धावत सुटले होते आणि इथेही खात्रीनं एक वरचं पद मिळण्याची शक्यता दिसू लागताच नागरी संघटना पुलोदशी जागेच्या देवघेवीची चालू असलेली चर्चा सोडून देऊन एकदम काँग्रेस (आय)च्या गळयात पडली होती! सत्तेच्या लोभानं आपली आधीची जाहीर आश्वासन

आणि स्वीकारलेली तत्वं गुंडाळून काँग्रेस (आय)मध्ये जाण्यासाठी धडपडणाऱ्या यशवंतराव चव्हाणांवर एकीकडे 'सकाळ'च्या अग्रलेखामधून टीका होत होती आणि दुसरीकडे 'सकाळ'चे भावंड तशातच सत्तेच्या लोभानं काँग्रेस (आय)शी 'कार्यक्रमा'च्या नावाखर हातमिळवणी करत होतं!

सत्तेच्या लाचारीमुळं नीतिभ्रष्ट झालेली राजकारणी माणसं आपल्या कृतीचं खोट्या तात्त्विक गोष्टी पुढे मांडून समर्थन करायला बघतात, तसाच प्रयत्न नागरी संघटनेचे काही नेते आणि नगरसेवक सध्या करत आहेत; पण मुळात पायाच तत्त्वशून्य असलेली त्यांची ही कारणं किती फोल आहेत हे सागायला जास्त खोलात जायचीसुद्धा आवश्यकता लागत नाही. तरीही ते सांगत असलेल्या प्रत्येक तत्त्वाची सत्यासत्यता पडताळून पाहण्याजोगी आहे.

'काँग्रेस (आय) शी सहकार्य करणार नाही,' असं नागरी संघटनेनं पूर्वी कधीही म्हटलेलं नाही. आमची युती ही नेहमी कार्यक्रमावर असते, त्यामुळे या वेळी कार्यक्रमावर आम्ही काँग्रेस (आय) शी युती केली तर त्यात वावगे काहीच नाही', हा नागरी संघटनेचा सध्याचा मुख्य युक्तिवाद आहे. शब्दशः बोलायचं तर काँग्रेस (आय) शी सहकार्य करणार नाही, असं नागरी संघटनेनं पूर्वी म्हटलेलं नव्हतं; पण त्याचबरोबर 'कार्यक्रमासाठी वेळ आल्यास काँग्रेस (आय) शी सहकार्य करू' असंही कधी म्हटलं नव्हतं आणि मुळात नागरी संघटनेची गेली सुमारे तीस वर्षांची परंपरा काय सांगते?

महापालिकेच्या निवडणुकीत कोणत्याही राजकीय पक्षाबरोबर समझोता नाही; पण निवडून आल्यानंतर महापालिकेत सतत काँग्रेसविरोधी आघाडीशी सहकार्य, हीच परंपरा नागरी संघटनेनं पाच किंवा दहा नव्हे, तर तीस वर्षे राबविली. नागरी संघटनेचे म्हणून जेवढे महापौर झाले ते सर्व याच आघाडीतून! त्यांनी नागरी संघटनेचे शहरविकासाचे विविध कार्यक्रम हाती घेतले किंवा पार पाडले ते याच आघाडीतून. अनेकदा नागरी संघटनेचे म्हणून निवडून आलेले काही नगरसेवक काँग्रेसला जाऊन मिळाले; पण नागरी संघटनेनं आपली भूमिका या तीस वर्षांत एकदाही बदलली नाही! कार्यक्रमासाठी जनसंघ, शिवसेना, रिपब्लिकन यांच्या आघाडीऐवजी काँग्रेसशी हातमिळवणी करावी, असं नागरी संघटनेच्या सूत्रचालकांना एकदाही वाटलं नाही. किंबहुना तसा प्रयोग एक वर्षासाठी तरी करून पाहावा, असं कधी त्यांच्यातल्या कोणी सुचवलं नाही. मग आताच 'कार्यक्रमा'साठी काँग्रेस (आय) शी सोयरीक साधणं आणि त्यासाठी तसं आमच्या धोरणात कधी म्हटलेलंच नाही, असं म्हणण्याला काय अर्थ आहे? तीस वर्षं जेव्हा एखादी व्यक्ती किंवा संघटना विशिष्ट तंत्रानं वागते तेव्हा ते तिचं धोरण आहे, हे उघड असतं. त्यासाठी वेगळ्या घोषणेची आवश्यकता नसते. विधिवत लग्न झाल्यावर तीस वर्षं सुखात संसार केल्यानंतर एखाद्या महिलेनं अचानक 'आपल्या लग्नाचं सरकारदरबारी रजिस्ट्रेशनच झालेलं नाही' असं सांगून घर सोडून जावं आणि दुसऱ्या कोणाचा तरी हात धरावा आणि पुन्हा आपली भूमिका तांत्रिकदृष्ट्या कशी बरोबर आहे हे ओरडून सांगावं तसा हा सगळा प्रकार आहे!

## हा सौदा नाही, विश्वासघात आहे!

नागरी संघटनेत सहभागी होणाऱ्यांमधील सर्वांत मोठा गट असलेला समाजवादी पक्ष, जनता पक्षात विलीन झालेला असताना आणि जनता पक्षाच्या मोठमोठ्या नेत्याकडून दबाव आणला जात असतानाही नागरी संघटनेनं आपलं स्वतंत्र अस्तित्व टिकवलं आणि १९७९ च्या महापालिकेच्या निवडणुकीत नऊ जागा मिळविल्या हे खासच कौतुकास्पद होतं. सत्तेसाठी धडपडणाऱ्यांचं राजकारण रंगात येऊ लागलं होतं, त्या काळात पुलोद आघाडीच्या नेत्यांनी विनंती करूनही पहिल्या महापौरपदाच्या निवडणुकीत त्यांच्याशी सहकार्य न करता सत्तेपासून दूर राहून काम करण्याचं धाडसही त्या वेळी नागरी संघटनेनं दाखवलं होतं. (परंतु त्यातही नागरी संघटनेची नऊपैकी दोन मतं त्याच्या उमेदवाराला न पडता फुटली ही भाग वेगळा.) त्यांचा तो निर्णय अतिरेकी असला तरी ध्येय-धोरणाशी सुसंगतच होता.

पण ही सगळी तत्त्वनिष्ठा दोन–तीन महिनेच टिकली! महापालिकेच्या शिक्षणमंडळावरील प्रतिनिधींच्या निवडणुकीत नागरी संघटनेनं पुलोद आघाडीशी सहकार्य केलं आणि दोन प्रतिनिधी निवडून आणले. त्यानंतर थोड्या दिवसांनी आघाडीतील वाटपानुसार शिक्षणमंडळाचं अध्यक्षपदही नागरी संघटनेला मिळालं. थोड्या वेळानतर का होईना, पण शेवटी नागरी संघटनेनं आपल्या तीन वर्षांच्या परंपरेला पूरक अशीच भूमिका तेव्हा घेतली होती; म्हणूनच कोणाला त्यात काही वावगं वाटलं नाही आणि त्याबद्दल कोणी टीकाही केली नाही.

पण कार्यक्रमासाठी सत्तेच्या आहारी न जाण्याची घोषणा तीन–चार महिन्यांतच विसरण्याबद्दल नागरी संघटनेच्या एका नेत्यानं मात्र तत्काळ विरोध दर्शविला. संघटनेचे एक प्रमुख नेते डॉ. बाबा आढाव यांनी निषेध नोंदविला, एवढेच नाही तर नागरी संघटनेच्या कार्ड–कमिटीचा राजिनामाही दिला! त्याच्या या राजिनाम्याची वाच्यता नागरी संघटनेनं कधी केली नाही आणि आपल्या तत्त्वानुसार चालणाऱ्या डॉ. आढाव यांनीही या गोष्टीचा उपयोग स्वतःची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी करता येणं शक्य असूनही गेल्या दोन वर्षांत कधीही केला नाही! 'कार्यक्रमा'साठी पुलोदमध्ये राहून नागरी संघटना काम करतच राहिली आणि गेल्या वर्षी आघाडीमधल्या वाटपानुसार वाट्याला आलेलं उपमहापौरपदही तिनं आनंदानं स्वीकारलं.

१९८०–८१ या वर्षातल्या पदाधिकाऱ्याची मुदत संपत आली. पहिली निवडणूक आली ती स्थायी समितीवर निवडून द्यावयाच्या सभासदांची. याही वेळी नागरी संघटनेनं सहकार्य घेतलं ते पुलोद आघाडीचं–काँग्रेस (आय)चं नव्हे. किंबहुना 'आघाडी' म्हणून ते बंधनकारकच होतं. स्वतःच्या ताकदीवर स्थायी समितीमध्ये नागरी संघटनेचा फक्त एक सभासद जाऊ शकला असता, तिथे आघाडीच्या आधारानं तिचे दोन सभासद निवडून आले. आता निवडणूक होती ती स्थायी समितीच्या अध्यक्षपदाची. तिकडे यशवंतराव चव्हाणांपाठोपाठ अरस काँग्रेसमधील काही नगरसेवक काँग्रेस (आय) मध्ये जाऊन दाखल झाले होते तरीही पुलोद आपलं बहुमत टिकवून होती.

आघाडीमध्ये विविध पक्षांच्या वाटपा-बद्दल चर्चा सुरू झाली. अपक्ष गटानं सुरुवातीलाच, आम्हाला तुमच्याशी सहकार्य करणं जमणार नाही, असं स्पष्ट सांगितलं. नागरी सघटना मात्र या वाटाघाटीत शेवटपर्यंत सहभागी होतच राहिली. स्थायी समितीच्या अध्यक्षपदाचे अर्ज दाखल करण्यासाठी काही तासच उरले असताना अचानक नागरी सघटनेचे अध्यक्ष निळूभाऊ लिमये यांनी आघाडीच्या इतर नेत्याना निरोप पाठविला, 'तुमचं–आमचं जमणार नाही. आम्ही कॉंग्रेस (आय)शी सहकार्य करणार आहोत!' स्थायी समिती अध्यक्ष-पदाच्या आणि पुढे होणाऱ्या महापौर-उपमहापौरपदाच्या निवडणुकाचा निकाल त्याच वेळी लागला!

'कार्यक्रमा'साठी कॉंग्रेस (आय)शी हातमिळवणी करण्याच्या नागरी संघटनेच्या 'उदात्त' आणि 'जनहिता'च्या महान धोरणाची पार्श्वभूमी ही अशी आहे. 'राजकारणापासून आणि राजकीय पक्षापासून दूर राहणारी' असे म्हणविणाऱ्या नागरी संघटनेची ही उत्कृष्ट राजकीय मुत्सद्देगिरी, असं मोठमोठे राजकारणी नेतेही सांगतील! सर्वसामान्य माणूस याला दगलबाजी आणि विश्वासघात याशिवाय दुसरं काय नाव देणार?

सुरुवातीला सत्तेपासून दूर, नंतर पुलोदशी दोस्ती आणि आता यंदा अचानक कॉंग्रेस (आय)शी जवळीक, असा हा तत्त्वशून्य राजकारणाचा नागरी संघटनेचा प्रवास आहे. महापालिकेतील कॉंग्रेस (अरस)चे नेते मच्छिंद्र काळभोर यानी याच वर्णन 'साखरपुडा एकाशी, लग्न दुसऱ्याशी आणि मीलन तिसऱ्याशी' असं केलं होत, ते सार्थच आहे!

'पुलोदशी सहकार्य केलं तर बरोबर आणि कॉंग्रेस (आय)शी केल तर मात्र चूक काय?' असा दावा नागरी सघटनेचे ज्येष्ठ नगरसेवक सध्या पुन्हा पुन्हा करत आहेत. कॉंग्रेस (आय)शी सहकार्य करण्याचा त्याचा अधिकार तात्त्विकदृष्ट्या मान्य केला तरी ती तडजोड करताना केलेल्या फसवणुकीचं काय समर्थन आहे? पुलोद आघाडीशी यापुढे तडजोड करायची नाही, ही नागरी संघटनेची भूमिका स्पष्ट होती, तर त्यांनी आघाडीच्या यंदाच्या पहिल्याच बैठकीत तसं उघडपणे सांगायला हवं होत. अपक्ष गटानंही आघाडीशी सहकार्य न करायचा निर्णय घेतला होता; पण तो त्यानी किती तरी अगोदर इतर पक्षांच्या प्रमुखाना कळविला होता. त्याचा निर्णय वादग्रस्त किंवा टीकास्पद असूही शकेल; पण त्यात विश्वासघात नव्हता. उघडपणे केलेला तो व्यवहार होता. याउलट नागरी सघटनेनं अर्ज दाखल करायच्या शेवटच्या क्षणापर्यंत चर्चा चालू ठेवली आणि आघाडीला बेसावध ठेवून ऐनवेळी त्याच्या पाठीत खंजीर खुपसला! नागरी संघटनेचे संस्थापक डॉ. नानासाहेब परुळेकर यानी उच्च ध्येयं मनाशी बाळगून वाढविलेल्या या संघटनेच्या उज्ज्वल प्रतिमेवर अशा प्रकारे कधीही न धुता येणारा काळिमा फासला गेला!

## ही नवी सोयरीक कशासाठी?

कार्यक्रमासाठी पुलोदशी केली तशीच आता कॉंग्रेस (आय) शी आघाडी, असा युक्तिवाद करणारे नागरी संघटनेचे नेते पुलोदशी आघाडी मुळात तोडण्याजोगं काय झालं होतं ते मात्र सांगू शकत नाहीत. या आघाडीत असताना दोन वर्षांत नागरी संघटनेनं एखादा कार्यक्रम हाती घेतला आणि आघाडीतल्या इतर पक्षानी त्याला विरोध केला असं एक तरी उदाहरण त्यांना देता येईल का? नागरी संघटनेच्या नगरसेवकानी, विशेषतः त्यांच्यातील तरुणानी म्हणे आपल्या नेत्याना सांगितलं होत का, 'आमच्याकडे एक तरी पद आणि गाडी असल्याशिवाय आम्हाला ठरविलेली कामे नीटपणान करता येत नाहीत!' त्याचा हा दावा निळूभाऊ लिमये आणि इतर नेतेमंडळीनी मान्य केला असला तर नागरी सघटनेच्या व्यासपीठावरून वर्षानुवर्षे पदाशिवाय काम करणारे डॉ. बाबा आढाव, भाई वैद्य, रामभाऊ वडके ह्यांच्यासारखे कार्यकर्ते मूर्ख होते अशी कबुलीच त्यानी दिली असं म्हणावं लागेल!

विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे, तेव्हाचं पक्षीय बलाबल पाहता पुलोद आघाडीबरोबर राहूनही नागरी सघटनला सध्या मिळालेलं स्थायी समितीचं अध्यक्षपद मिळालं असतं. कॉंग्रेस (आय)शी आघाडी करून त्यांचे उमेदवार नारायणराव बहिरट यांना आठ तर आघाडीचे शंकरराव म्हात्रे (अरस कॉंग्रेस) यांना चार मते पडली. नागरी संघटना आघाडीबरोबर असती तर त्यांची दोन मते आघाडीतर्फे उभ्या असलेल्या उमेदवाराला मिळून सहा–सहा असं मतदान झालं असतं. त्या वेळी मावळते अध्यक्ष काका वडके (भाजप) आघाडीचेच असल्यामुळे त्यांच्या निर्णायक मतामुळं त्यांचा उमेदवार निवडून येऊ शकला असता. म्हणजे नागरी सघटनेचं धोरण फक्त मानाचं आणि अधिकाराचं पद मिळवायचं एवढ्यापुरतं मर्यादित नव्हतं, तर ते पद कॉंग्रेस (आय)-च्याच सहकार्यानं मिळवायचं होतं, हे उघड दिसतं. कार्यक्रमाच्या नावावर त्यांच्यांशी करावयाची ही युती नव्हती, तर नागरी संघटना कॉंग्रेस (आय)च्या दावणीलाच बांधण्याचा हा पद्धतशीर डाव होता!

दोन वर्षं आघाडीबरोबर काढल्यानंतर याच वर्षी ही राजकीय कोलांटी उडी घेण्याचं कारण म्हणजे आघाडीतल्या वाटपानुसार यदा महापौरपद भारतीय जनता पक्षाकडे येत होतं. नागरी सघटनेतल्या काही प्रमुख नेत्यानी ठरवून ही संधी साधली. कोणत्याही परिस्थितीत जनसंघाचा महापौर होता कामा नये, मग त्यासाठी हे मानाच पद कॉंग्रेस (आय)ला गेल तरी हरकत नाही, असा राजनारायणी पवित्रा त्यानी पूर्वीपासून घेतला होता. जनसंघाच्या किंवा नगरसेवकाच्या मतावर आपला उपमहापौर निवडून आणताना कसलाही संकोच बाळगायचा नाही, पण त्याच्या उमेदवाराला मात्र मत द्यायचं तर विटाळ झाल्यासारखा आव आणायचा, असं हे 'पुरोगामी' धोरण होतं आणि नागरी सघटनेन ते सरही करून दाखवलं! डॉ. बाबा आढाव किंवा भाई वैद्य हेही नेहमीच संघ आणि जनसंघाचा कडवा विरोध करत आले आहेत; पण नागरी संघटनेचे नगरसेवक असताना जनसंघाशी केलेल्या आघाडीनंतर ऐन वेळी असल्या स्वरूपाची बेइमानी त्यानी कधी केली नव्हती; पण पूर्वीचे कुठलेच आदर्श या वेळी नागरी संघटना मानायला तयार नव्हती. त्याचे नगरसेवक एकीकडे आज 'आमच्या मनात असं काहीही नव्हतं'

मलपृष्ठ २ वर

# पोलंड

## कम्युनिस्ट चळवळीस नवे वळण

वा. दा. रानडे

पोलंडमध्ये गेल्या १४ जुलैला झालेली पोलिश कम्युनिस्ट पक्षाची खास कॉंग्रेस म्हणजे केवळ त्या पक्षाच्याच नव्हे, तर जगातील कम्युनिस्ट चळवळीच्या धोरणाना व कार्यपद्धतीला नवे वळण देणारी कॉंग्रेस आहे. कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यपद्धतीत लोकशाही प्रथा आणण्याचा प्रयत्न या कॉंग्रेसमध्ये प्रथमच करण्यात आला. भांडवलदारी लोकशाही ही खरी लोकशाहीच नव्हे. समाजवादी लोकशाही हीच खरी लोकशाही, ती आम्ही मानतो असे कम्युनिस्ट नेहमी म्हणत असतात. कम्युनिस्टांच्या मते आर्थिक विषमतेचे निर्मूलन हा लोकशाहीचा गाभा. श्रमिक वर्गाच्या पिळवणुकीतून निर्माण झालेल्या आर्थिक विषमतेचे निर्मूलन झाले पाहिजे. भांडवलदारी राष्ट्रात ते झालेले नाही, त्यामुळे तेथील अर्थव्यवस्थेवर थैलीशहांची पकड आहे. निवडणुका होतात. एकापेक्षा अधिक राजकीय पक्षांना कार्य करण्याची मोकळीक असते. सर्व प्रौढाना मताधिकार असतो. मतदान गुप्त असते. लोकशाहीचा हा सारा बाह्य देखावा तेथे असतो; पण आर्थिक विषमता असल्याने ज्यांच्याजवळ पैसा नाही त्याना निवडणुका लढविणे व जिंकणे फार कठीण जाते. थैलीशहा पैशाच्या बळावर आपले हितसंबंध जपणारे उमेदवार निवडून आणतात, असा भांडवलदारी देशातील लोकशाहीवर आणि निवडणुकावर कम्युनिस्टाचा आक्षेप असतो. त्यात काही प्रमाणात तथ्य असले तरी ते पूर्णपणे खरे नाही. निवडणुकीवर केवळ थैलीशहाचाच प्रभाव असता तर केरळमध्ये, पश्चिम बंगालमध्ये कम्युनिस्ट सत्तेवर कसे येऊ शकले असते ? मते पैशाने सर्रास विकत घेता येत नाहीत. पैशाच्या दडपणाला काही मतदार बळी पडत असले तरी हे दडपण बाजूला सारून निर्भयपणे मतदान करणारेही जागरूक मतदार असतात. त्यामुळेच लोकशाही मार्गाने सत्तांतर होऊ शकते.

कम्युनिस्ट राष्ट्रात श्रमिकवर्गाच्या पिळवणुकीतून निर्माण झालेली आर्थिक विषमता नसेल; पण तेवढ्याने तेथील लोकशाही अधिक श्रेष्ठ दर्जाची असे म्हणता येणार नाही. मतप्रकटनाचे स्वातंत्र्य हा लोकशाहीचा प्राण आहे. सत्तारूढ पक्षाची विचारप्रणाली, धोरणे, कार्यक्रम, कार्यपद्धती याबाबतीत मतभेद असतील तर ते मोकळेपणाने मांडण्याचे स्वातंत्र्य सर्वांना असले पाहिजे. कम्युनिस्ट देशात असे स्वातंत्र्य नसते. विरोधी मत मांडणारावर एकदम तो प्रतिगामी, प्रतिक्रांतिकारक, भांडवलशाहीचा हस्तक असल्याची घोलकी विशेषणे लावली जातात. यातली काही मते प्रतिगामी असतील; पण सारीच तशी असतात असे नाही. कम्युनिस्ट प्रणाली मान्य असूनही विशिष्ट प्रश्नावर विशिष्ट प्रसंगी कोणते धोरण योग्य याबाबत मतभेद असू शकतात. भिन्न मत प्रकट करण्यास पूर्ण मोकळीक असली पाहिजे, कोणते मत, कोणता मार्ग, कोणते धोरण बरोबर हे राज्यकर्त्यांनी ठरवावयाचे नाही. ते लोकाना निर्भयपणे ठरवू देणे ही खरी लोकशाही. लोकांच्या हातूनही चुका होतील; पण अनुभवाने ते त्या सुधारतील. पण लोकांनी या गोष्टी ठरवायच्या म्हणजे निरनिराळ्या प्रश्नावरच्या सर्व बाजू अधिकृत स्वरूपात लोकापुढे आल्या पाहिजेत. त्यातून आपल्या अनुभवाच्या प्रकाशात कोणती बाजू बरोबर हे ते ठरवतील आणि त्याप्रमाणे मत देतील, एकापेक्षा अधिक पक्ष, एकापेक्षा अधिक उमेदवार यातून निवड करण्याची संधी त्यांना मिळाली पाहिजे, कम्युनिस्ट देशात कम्युनिस्ट पक्षाशिवाय इतर पक्षांना बंदी असते. निवडणुकीत कम्युनिस्ट पक्षाने पसंत केलेल्या उमेदवाराचीच यादी लोकांपुढे असते. त्यातला एकही उमेदवार पसंत नसला तरी मत दिलेच पाहिजे. कारण मतदान सक्तीचे असते. परिपूर्ण लोकशाहीसाठी कम्युनिस्ट पद्धतीच्या लोकशाहीतील या उणीवाही दूर केल्या पाहिजेत असे तेथील जनतेलाही वाटू लागले आहे. पोलंडमधील आजचा लढा त्यासाठीच आहे. त्याची पार्श्वभूमी नीट लक्षात यावी यासाठी भांडवलदारी लोकशाही आणि कम्युनिस्टाची समाजवादी लोकशाही याचे तुलनात्मक विवेचन काहीशा विस्ताराने मी केले.

गेल्या अकरा महिन्यांच्या लढ्यात पोलिश जनतेने काय मिळविले ? सर्वच कम्युनिस्ट देशांप्रमाणे पोलंडमधील कामगारसंघटना कम्युनिस्ट पक्षाच्या नियंत्रणाखाली होत्या. पण पोलंडच्या कामगारांनी संपाचे आंदोलन उभारून स्वतंत्र कामगारसंघटना प्रस्थापित करण्याचा हक्क मिळविला आणि 'सॉलिडॅरिटी' ही संघटना स्थापन केली. शेतकऱ्यांसाठीही अशीच स्वतंत्र संघटना स्थापण्याचा हक्क त्यानी मिळविला. पाच दिवसांच्या आठवड्यासाठी त्यांनी आंदोलन केले व ती मागणीही बऱ्याच प्रमाणात पदरात पाडून घेतली; पण लोकशाहीच्या लढ्याच्या दृष्टीने त्यांची सर्वांत महत्त्वाची मागणी म्हणजे कम्युनिस्ट पक्षात लोकशाही कार्यपद्धती आली पाहिजे. लोकशाही मध्यवर्तित्व हे कम्युनिस्ट पक्षसंघटनेचे एक महत्त्वाचे तत्त्व. पक्षाचे धोरण व कार्यक्रम केवळ पोलिटब्यूरोने न ठरविता त्यासंबंधी सर्व पातळ्यांवर खुली चर्चा होऊन निर्णय घेतले गेले पाहिजेत हा या तत्त्वाचा गाभा; पण प्रत्यक्षात 'लोकशाही मध्यवर्तित्व' यातली लोकशाही विसरली जाऊन मध्यवर्तित्वावर भर दिला गेला. केन्द्रीय नेते म्हणजेच पोलिटब्यूरो ठरवील ते धोरण सर्व पातळीवरच्या पक्ष समित्यानी मानावयाचे हीच पद्धती रूढ झाली. तळापासूनच्या शाखाकडून सूचना देऊन धोरण ठरण्याची प्रथा बंद पडली. कम्युनिस्ट पक्षाची कॉंग्रेस भरे, पक्षाचे मुख्य चिटणीस व इतर पदाधिकारी, पोलिटब्यूरो मध्यवर्तित्व समिती निवडली जावी; पण हा लोकशाही कार्यपद्धतीचा व निवणुकीचा केवळ देखावा असे. पक्षाचे वरिष्ठ नेते नावे सुचवीत तीच नावे बिनविरोध निवडली जात. जेवढ्या जागा तेवढेच उमेदवार उभे केले जात. प्रतिनिधींची, पदाधिकाऱ्यांची निवड गुप्त मतदानाने होत नसे.

हे सारे बदलून लोकशाही पद्धतीने पक्षाच्या समित्या व पदाधिकारी निवडले गेले पाहिजेत अशी मागणी पोलंडमध्ये होऊ लागली आणि नेत्याना ती मान्य करावी लागली. पक्षाच्या कॉंग्रेससाठी पाठवावयाचे प्रतिनिधी या वेळी स्थानिक शाखाच्या सर्वसामान्य सभासदानी मतदानाने निवडले.

स्थानिक शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांची निवड केली नाही. कॉंग्रेसच्या या दोन हजार प्रतिनिधींनी मध्यवर्ती समितीचे दोनही सभासद गुप्त मतदानाने निवडले. या दोनशे जागांसाठी २७१ म्हणजे जागांपेक्षा अधिक उमेदवार उभे होते. प्रतिनिधींना निवडीला वाव होता. नेहमीसारखी एकच यादी त्यांच्यापुढे नव्हती. प्रतिनिधींनी हा हक्क अत्यंत जागरूकपणे बजावला. दोनशे सभासदांच्या नव्या मध्यवर्ती समितीत जुन्या मध्यवर्ती समितीपैकी फक्त १८ आहेत, तर १५ सभासदांच्या पोलिटब्यूरोवर जुने फक्त ४ आहेत.

जुना कट्टर गट, सुधारणावादी गट आणि कानियांच्या नेतृत्वाखालील नेमस्त गट असे तीन प्रवाह पोलंडच्या कम्युनिस्ट पक्षात आहेत. कानियाची नेतेपदी निवड करून त्यांचा मधला मार्ग प्रतिनिधींनी पसंत केला आणि दोन्ही अतिरेकी टोके टाळली. आपला पूर्ण विजय झाला नाही असे सुधारणावादी गटास वाटणे स्वाभाविक आहे. पक्षाच्या तीस लाख सभासदांत दहा लाख सॉलिडॅरिटीचे होते याचा अर्थ दर तीन सभासदांपैकी एक सॉलिडॅरिटीचा होता. पण पोलिटब्यूरो व मध्यवर्ती समितीवर त्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळालेले नाही. पोलिटब्यूरो सॉलिडॅरिटीला एकच जागा मिळाली. ती एक महिला प्रतिनिधी आहे. पोलिटब्यूरोवर महिलेची निवड प्रथमच झाली आहे. मध्यवर्ती समितीवर २०० पैकी ४० म्हणजे २० टक्के जागा सॉलिडॅरिटीला मिळाल्या आहेत.

पोलंडच्या कम्युनिस्ट पक्षाचे नेतृत्व जुन्या कट्टर गटाच्या हाती राहिलेले नाही. कानियांच्या जागी मॉस्कोशी एकनिष्ठ असलेला कट्टर गटाचा एखादा नेता आणावा असा रशियाचा प्रयत्न होता. परिस्थितीवर कानियांचे नियंत्रण राहिलेले नाही,यातून कम्युनिस्ट पद्धतीलाच धोका निर्माण होईल अशी भीती रशियाला वाटत होती. रशियन कम्युनिस्ट पक्षाने पोलिश कम्युनिस्ट पक्षाला एक पत्र पाठवून याबद्दल इशारा दिला होता; पण पोलंड सध्याचे पेचप्रसंगातून यशस्वीपणे बाहेर पडेल, तेथील कम्युनिस्ट पद्धतीला धोका नाही, तसेच कम्युनिस्ट जगाशी आमचे घनिष्ठ संबंध पूर्वीप्रमाणेच राहतील असे आश्वासन कानियांनी दिले. हंगेरी व चेकोस्लोव्हाकियातील उठाव मोडण्यासाठी रशियाने तेथे लष्करी हस्तक्षेप केला होता. पोलंडमध्ये तसेच घडेल काय अशी भीती व्यक्त केली जात होती. पोलिश जनतेने हा हस्तक्षेप होऊ दिला नाही, हे तिचे मोठे यश आहे. सॉलिडॅरिटीने अतिरेकी सुधारणावादी भूमिका न घेता कानियांच्या मध्यममार्गी धोरणाला पाठिंबा दिल्यामुळेच हे शक्य झाले. रशियाचा हस्तक्षेप टाळण्यासाठी हेच धोरण स्वीकारणे योग्य होते. आपल्या हस्तक्षेपाचे संभाव्य आतरराष्ट्रीय परिणाम लक्षात घेऊन रशियानेही हस्तक्षेपाचा विचार सोडला असावा असे दिसते. १९८१ म्हणजे १९६८ नव्हे व पोलंड म्हणजे चेकोस्लोव्हाकिया नव्हे तेरा वर्षांत परिस्थिती खूपच बदलली आहे. अफगाणिस्तानातील आपल्या हस्तक्षेपाची तीव्र प्रतिक्रिया लक्षात घेऊनही रशियाने विचार बदलला असणे शक्य आहे. एखाद्या कम्युनिस्ट देशातील कम्युनिस्ट पद्धतीलाच धोका निर्माण झाला तर ती वाचविण्यासाठी आम्ही आमच्या मित्राच्या मदतीस जाऊ हे ब्रेझनेव्ह तत्त्व मात्र ब्रेझनेव्ह यांनी सोडलेले नाही !

पोलंडपुढील आर्थिक प्रश्न सोडविण्यात कानियाना कितपत यश येते यावर त्याची खरी कसोटी लागणार आहे. पोलंडला पाश्चात्य बँकांचे २७०० कोटी डॉलर कर्ज आहे. ते आणखी ३०० कोटी डॉलरनी वाढेल असा अंदाज आहे. राष्ट्रीय उत्पन्नात या वर्षी १५ टक्के घट येईल. या वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यात पगार २३ टक्क्यांनी वाढले; पण ग्राहकोपयोगी वस्तूंच्या पुरवठ्यात मात्र १० टक्के घट झाली. या बिकट परिस्थितीतून देशाला वर काढून त्याची आर्थिक घडी व्यवस्थित बसविण्याचे आव्हान पोलंडच्या नेत्यापुढे आहे. त्यासाठी औद्योगिक व्यवस्थापनाची पुनर्रचना करणे, केंद्रीय नियोजन कमी करणे आणि व्यवस्थापन व कामगारांना सहभागी करणे हे उपाय आपण योजणार असल्याचे पंतप्रधान जरूझेल्स्की यांनी कॉंग्रेसपुढील भाषणात सूचित केले.

पोलंडमधील बदलांचा परिणाम पूर्व-युरोपातील इतर कम्युनिस्ट देशावर होणे अटळ आहे. रशियावरसुद्धा तो काही प्रमाणात होईल. पोलंडसारखेच बदल आपल्या देशात करण्याची मागणी जोर धरील व ही लाट तेथील नेत्याना फार काळ थोपविता येणार नाही.

पोलंडमधील घटनांपासून भारताला काही शिकण्यासारखे आहे काय ? देशात एकच प्रभावी पक्ष असतो तेव्हा त्या पक्षात हुकुमशाही प्रवृत्ती वाढू नयेत यासाठी पक्षांतर्गत लोकशाही कार्यपद्धतीचा आग्रह धरायला हवा. इंदिरा कॉंग्रेसने अशी कार्यपद्धती स्वीकारण्याची फार आवश्यकता आहे; पण तशी निकड कोणालाच वाटत असल्याचे दिसत नाही. पक्षांतर्गत लोकशाही कोठेच नसते आणि व्यक्तिपूजा हा आमचा सांस्कृतिक पिंड आहे असे अंतुले यांनी स्पष्टच सांगून टाकले आहे. विरोधी पक्ष दुबळे आणि सत्तारूढ पक्ष हुकूमशाही प्रवृत्तीचा अशी आजची निराशाजनक परिस्थिती आहे; पण लोकशाहीवाद्यांनी सर्व पातळ्यांवर लोकशाही कार्यपद्धतीबद्दल आग्रह धरून लोकशाहीचा लढा लढवायला हवा. पोलंडसारखे आंदोलन त्यातून उभारले पाहिजे. □


तिसरी आवृत्ती संपत आली

**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**

**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**

या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी ...

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

लेखक : वि. ग. कानिटकर

आवृत्ती : तिसरी ( सचित्र )

किंमत : रुपये पंचेचाळीस

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

मुंबई वार्ता

# गरमागरम नाटकांवरची थंडगार चर्चा

मागच्या पंधरवड्यात दादरच्या वनमाळी हॉलमध्ये एका गरमागरम (झालंच तर सामाजिक, कौटुंबिक इ इ. जिव्हाळ्याच्या) विषयावर एक चर्चा झाली. चर्चा झाली झकास; पण विषय गरम असला तरी चर्चा मात्र तशी कोमटच झाली! नाट्यकलोपासक मंडळाच्या ३४ व्या वर्धापनदिनानिमित्त मराठी रंगभूमीवरच्या 'गरम' नाटकांवर ही चर्चा होती चर्चेचे संचालक म्हणून काम करणाऱ्या प्रा. अनंत भाव्यांनी सुरुवातीलाच म्हटलं की, एके काळी चटके देणारे 'सखाराम' आणि 'घाशीराम' आता अगदी कोमट वाटावेत एवढ्या जबर तपमानाची नाटकं सध्या रंगभूमीवर येताहेत. 'भोगसम्राट', 'कनेक्शन', 'हैदोस', 'घटकंचुकी' अशी नुसती काही शीर्षकं वानगीदाखल घेतली तरी मराठी रंगभूमी सध्या एकदम गरमागरम आहे याची खात्री पटेल. (तशात सध्या एअरकंडिशनिंगही बंद! त्यामुळे प्रेक्षक अधिकच गरम !) पण या गरम नाटकाच्या निमित्ताने दोन सरळ-सरळ छावण्या मात्र पडल्या आहेत. एक गरम नाटकाचे पुरस्कर्ते-ऊर्फ आगवाले आणि दुसरे-हे आता ओघानं आलंच-बंबवाले!

प्रास्ताविक संपवून अनंतरावांनी 'एक-दोन-स्टार्ट' असं म्हटल्यावर हे आगवाले आणि बंबवाले परस्परांवर छान तुटून पडतील आणि चांगली तुंबळ खडाजंगी होईल अशा अपेक्षेनं प्रेक्षकमंडळी अगदी सरसावून आणि टवकारून बसली. मागे एकदा दूरदर्शनावर झालेल्या अशा प्रकारच्या एका कार्यक्रमाचा खुमासदार अनुभव गाठीशी होताच; पण कुठलं काय आणि कुठलं काय! सुरुवातीला बोलायला उभे राहिले मोहन कोठीवान. स्टेजवर ते बहुतेक गरम नाटकातले गरमागरम दादा असतात; पण त्यांनी मुळी सलामीलाच सांगून टाकलं की, गरम नाटकांशी माझा संबंध केवळ उदरभरणापुरता आहे! मी एक पोटार्थी नट आहे आणि पोटासाठीच, चांगल्या नाटकात भूमिका न मिळाल्यानं, गरम नाटकात शिरलो आहे. पण मला या दुःशासनी भूमिकेचा आणि बलात्कार करायच्या जुलुमाचा भयंकर कंटाळा आला आहे आणि असल्या नाटकात भूमिका करायची मुळीच इच्छा नाही! खरं म्हणजे ही नाटकं गरमदेखील नाहीत, ती नुसतीच पोकळ आणि बेचव आहेत उगीच आपली 'क्रीम ऑफ सोसायटी'तल्या समीक्षकांनी डोक्यावर घेतली आणि उरलेल्या 'बटरमिल्क ऑफ सोसायटी' वाल्यानी जिभल्या चाटल्या; त्यामुळे ही नाटकं चालली ठाण्याला 'आंटी' हाउसफुल गेले आणि या नाटकाला 'ए' सर्टिफिकिट मिळावं म्हणून किती खटपट केली गेली ते मला माहीत आहे; म्हणजे हा या नाटकाचा गरमपणा! कोठीवानाची अपेक्षा अशी की, आपल्यावर पुष्कळसे आरोप केले जातील आणि मग त्याच्या उत्तरादाखल बोलताना आपण एक नाट्यमय कलाटणी देऊन 'तो मी नव्हेच' असं दाखवून देऊ! पण सुरुवातीलाच असा माफीचा साक्षीदार बोलल्यामुळे, मुळात खटलाच उभा राहिला नाही!

नंतर बोलले समीक्षक शशिकांत नार्वेकर त्यांचे आक्षेप हे अर्थातच नाटकाच्या कलात्मक मूल्यांबद्दल होते; खरं म्हणजे अ-कलात्मक मूल्याबद्दल होते. गरम नाटकं खोटी असतात, त्यांना प्रतिभेचा परीस-स्पर्श झालेला नसतो. ही बाब सर्वांत दुःखाची; मग यात गरमागरम लाथाळणीची आणि ताई-भाऊ जिव्हाळ्याची अशी सगळीच तकलादू नाटकं आली, तेव्हा प्रश्न रंगभूमीच्या पडदानशील पावित्र्याचा नाही, तर कावळ्याच्या छत्र्यांसारख्या विपुलतेनं उगवणाऱ्या बेकार बेचवपणाचा आहे!

नंतर बोलले नाटककार सुरेश खरे. गरम नाटकाचे ते आद्य निर्माते आहेत, असा एक आरोप त्याच्यावर होता; पण पितृत्वाचा हा प्रश्न त्यांनी विश्वामित्री थाटात चुकवला आणि आपल्याला आपली नाटकं गरम वाटतात की नाही, याचा निश्चित पत्ता जाम लागू दिला नाही. त्यांचं म्हणणं असं की, आपण प्रक्षोभक विषयांवर लिहितो; पण हेतुपुरस्सर गरम लिहीत नाही आपण उथळ आणि भडक लिहीत नाही, तर कलात्मक दृष्टिकोनातूनच लिहितो.

म्हणजे आता पहा हे कसं आगडं झालं. अकलात्मक गरम नाटक लिहिलं तर मोहन कोठीवान आणि शशिकांत नार्वेकर म्हणणार की हे कसलं गरम? हे तर बेचव, फुसकं, फार तर बेशरम (इति प्रमोद नवलकर) नाटक झालं! बरं, कलात्मक गरम नाटक लिहावं तर सुरेश खरे म्हणणार, छे:! त्याला 'गरम' वगैरे म्हणू नका हो, ते एक 'कलात्मक', 'प्रक्षोभक' नाटक आहे! म्हणजे बिचाऱ्या 'गरम' पणानं आपल्या अस्तित्वाला मान्यता मिळण्यासाठी आता करावं तरी काय?

मग उठले दीनानाथ रेडकर. हे बऱ्याच गरम नाटकांचे लेखक. तेव्हा स्टेजवरच्या उपस्थितांमध्ये गरम नाटकाचे एकमेव तारणहार. रेडकरानी बोलायला सुरुवात केली ती आडून आडून हल्ले करत. म्हणजे उदाहरणार्थ :-गरम नाटकाच्या टीकाकारांपैकी फारसा कुणी ती पाहिलेलीच नसतात. चांगलं गरम नाटक लिहीणं हेसुद्धा कठीण काम असतं आणि मला स्वतःला पुरेसं गरम नाटक अजून लिहिता आलेलं नाही. इथपर्यंत ठीक; पण मग त्यांनी एक अवघड यू-टर्न मारला आणि सरळ बंबवाल्याच्या छावणीच्या दिशेनं आगेकूच सुरू केली! त्यांचं पहिलं म्हणणं असं की, गरम नाटकं ही 'गरम' नसतातच मुळी! त्यांच्यात कलात्मक ऊब असते. अशा नाटकांना येणारे प्रेक्षकसुद्धा आबटशौकीन आणि सनसनाटी नसतातच! खरं म्हणजे नाटकं गरम नसतात, तर जाहिराती गरम आणि भडक असतात. त्या दिशाभूल करणाऱ्या असतात आणि मी स्वत देखील अशा गरम जाहिरातीना नेहमीच आक्षेप घेतो उदाहरणार्थ, 'घटकंचुकी' ची जाहिरात! म्हणजे आहे की नाही! गरम नाटकांना त्यांचे जन्मदातेसुद्धा 'गरम' मानायला तयार नाहीत! आता या गरमपणाला कोण बरं तारणार?

गड असा पडला-म्हणजे अगदी भुई-

सपाटच झाला म्हणा ना ! तेव्हा प्रमोद नवलकर त्यावर विजयाचं निशाण रोवायला चढले. अपेक्षेप्रमाणेच त्यानी शिवाजी पार्क थाटाचं एक दणदणीत भाषण ठोकलं. गरम नाटकं खरं तर बेशरम आहेत. ज्या नाट्यगृहाना आम्ही शिवाजी 'मदिर', बालगंधर्व 'मंदिर' अशा पवित्र नावानं संबोधतो, त्या ठिकाणी असली बेशरम नाटकं होता कामा नयेत आणि झालीच तर ती आम्ही मनगटी बळावर बंद पाडू !

विचार आणि चिंता करायला लावणारं भाषण झालं ते माधव मनोहरांचं. (हे सागायला नकोच म्हणा !) अश्लीलतेची ही लाट आज काही वर्षं सातत्यानं टिकून आहे आणि ती हटण्याची चिन्हं तर नाहीतच, उलट वाढतेच आहे. गेल्या पाच वर्षांत अश्लीलतेविरोधी एकही खटला उभा राहू शकला नाही तो कायद्यातल्या पळवाटामुळे. तेव्हा हा पेच मोठा कठीण आहे आणि सर्व समाजधुरिणांनी एकत्र बसून याचा विचार केला पाहिजे !

समारोप करताना अनंत भावे म्हणाले की, सध्या सगळीकडेच अरबट–चरबटपणा आला आहे, तेव्हा नाटकातही तो यायचाच. अशा प्रकारे त्यांनी आग आणि बंब अशा दोन्ही छावण्याना चुचकारून सामंजस्यपूर्ण मैत्रीच्या वातावरणात परिसंवाद संपवला !

## ☐ उच्च शिक्षण, पण अमेरिकेमध्ये

अमेरिका आणि भारत ही दोन राष्ट्रं. तुलनाच करायची म्हटली तर भेदांमधून साम्यं शोधून काढावी लागतील; पण या वैभवशाली अमेरिकेलाही काही दु:खं आहेत, आणि उच्च शिक्षण व तत्संबंधी समस्याच्या बाबतीत तर भारत आणि अमेरिका समदु:खी आहेत ! धक्का देणारी ही गोष्ट आहे की नाही ?

पण हे अगदी सत्य आहे. भारत आणि अमेरिकेतल्या उच्च शिक्षणाचा तुलनात्मक आढावा घेताना मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू राम जोशींनी दिलेली ही माहिती आहे. शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांचा अधिकार दांडगा. आज मुंबई विद्यापीठाची धुरा ते समर्थपणे सांभाळत आहेत. शिवाय अनेक देशांत जाऊन शिकवण्याचं श्रेयही त्यांच्या पदरी आहे. तेव्हा त्यांच्या वक्तव्याला विशेष वजन आहे.

मला या भाषणाचं महत्त्व वाटलं ते अशासाठी की, या विषयाच्या निमित्तानं अमेरिकन समाजजीवनाच्या काही महत्त्वाच्या पैलूंवर प्रकाश पडला. साधारण अमेरिका म्हटलं की आपले डोळे विस्फारतात; पण अमेरिकेतलं उच्च शिक्षणही किती तरी कमतरता आणि वैगुण्यांनी झाकोळलेलं आहे ! भारत आणि अमेरिकेच्या शिक्षणपद्धतीत एका बाबतीत साम्य आहे असं म्हणता येईल; या दोन्ही देशातल्या शिक्षणपद्धतींना ब्रिटीश वसाहतीच्या आपल्या भूतकाळातून बाहेर पडणं ही समस्या होती. दोन्ही देशांतल्या शिक्षणाचं ध्येय लोकशिक्षण हे आहे आणि दोन्ही देशातलं वातावरण (निदान अधिकृतपणे तरी !) स्वतंत्र लोकशाहीचं आहे. ७८–७९ सालच्या एका पहाणीनुसार अमेरिकेत उच्च शिक्षणसंस्थाची सख्या ३१२५ होती आणि त्यातल्या विद्यार्थ्यांची संख्या ११ लाख, तर भारतात उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी केवळ ३ लाख. पण विद्यार्थ्यांच्या संख्यात्मक वाढीचं प्रमाण अमेरिकेत घटण्याच्या मार्गावर आहे. १९५० ते ६० च्या दरम्यान तिथे विद्यार्थ्यांच्या संख्येतली वाढ होती ६० टक्के, तर १९६० ते ७० च्या दरम्यान ती २४ टक्के एवढी खाली आलेली आहे. भारतात मात्र याच कालखंडात विद्यार्थ्यांच्या संख्येत नेत्रदीपक वाढ झालेली आहे.

पण आकडेवारीइतकी फसवी गोष्ट दुसरी सापडायची नाही हे आहेच. डिझ्रायली तर म्हणत असे की, असत्याचे प्रकार तीन– पहिलं खोटं, दुसरं निखालस खोटं आणि तिसरी आकडेवारी. तेव्हा विद्यार्थ्यांच्या तुलनात्मक वाढीचं प्रमाण अमेरिकेपेक्षा भारतात वाढतं आहे, ही झाली एक आकडेवारी. आता दुसरी आकडेवारी काय सागते बघा. उच्च शिक्षण घेण्याच वय साधारण १८ ते २४. तेव्हा या वयोगटातले किती टक्के विद्यार्थी असं उच्च शिक्षण घेतात? अमेरिकेत ५३·६ टक्के, जपानमध्ये २४ ६९टक्के, जर्मनी, रशिया, फ्रान्स, इस्रायल, अर्जेंटिना अशा साऱ्या देशात सुमारे २० ते २५ टक्क्यांच्या दरम्यान तर इजिप्त, इराक, इराण, मेक्सिको, ब्राझिल आणि अगदी चिनी, क्युबासारख्या लहान लहान देशातसुद्धा हे प्रमाण १० ते १५ टक्क्याच्या दरम्यान आहे आणि भारतात ते किती आहे म्हणता ? अवघं ४०·५ टक्के ! प्रयत्नाची पराकाष्ठाच केली आणि अगदी धडाकेबाज कार्यक्रम आखून ते राबविले (जे आपल्याला परवडणारं नाही) तरी आपण वीस टक्क्याच्या आसपास येऊ, आणि तेही या शतकाच्या अखेरीस! आणखी एक टक्केवारी घ्या. अमेरिकेत १९४५ साली ग्रॉस नॅशनल प्रॉडक्टच्या १/२ टक्का उत्पन्न शिक्षणावर खर्च होत असे. आता हे प्रमाण ३ टक्के इतकं वाढल आहे. आपल्याकडे १९५१ साली ·०२ टक्के ग्रॉस नॅशनल प्रॉडक्ट शिक्षणावर खर्च होत असे. हे प्रमाण १९६१ सालापर्यंत ·०६ टक्के एवढं वाढलं; पण १९७८–७९ साली त्याची ०५ टक्के अशी पुच्छप्रगती झाली. 'ॲलिस इन वंडर लँड'मध्ये ॲलिसला राणी म्हणते की, वंडर लँडची जमीन अशी आहे की, ती सतत मागे मागे सरकत असते; त्यामुळे एका जागी उभं रहायचं तरी धावावं लागत. झपाट्यानं पुढं सरकणाऱ्या या काळात आपण इतपतसुद्धा पळत नाही, उलट मागेच सरकतो आहोत ! शिवाय पुढे म्हणजे नेमकं कुठे जायचं आहे याबद्दल तरी आपल्याकडे एकवाक्यता कुठे आहे ?

एकूण शिक्षणाच्या, विशेषत: उच्च शिक्षणाच्या बाबतीत मात्र दोन्ही देशात औदासीन्याचं वातावरण आहे. शिक्षण अधिकाधिक धंदेवाईक होण्याकडं झुकत चाललं आहे. ज्या शिक्षणानं व्यासंगी आणि विद्वान निर्माण होतील असं शिक्षण आज कुठ आहे ? आणि तशी वृत्ती तरी आज कुठ आहे ? एस. एस. सी. च्या गुणवत्त यादात यणारी हुशार मुलं डॉक्टर–इंजिनियर किंवा चार्टर्ड अकाउंटट बनू इच्छितात पण काहो व्यासग करावा अस किती जणाना वाटत असतं ? तसाच प्रश्न शिक्षकी पेशाचा. अमेरिका आणि इतर पाश्चात्य राष्ट्रात शिक्षकी पेशाची निदान आर्थिक उपेक्षा तरी नाही. आपल्याकडे मात्र या बाबतीतही अंधार आहे !

पण शिक्षकाबद्दल आदर मात्र दोन्ही देशात कमी होतो आहे. विद्यार्थी अभ्यासापेक्षा राजकारण आणि शिक्षणक्षेत्रात ट्रेड युनियनसारख्या उलाढाली आणण्यात अधिक गुंतलेले आहेत. राखीव जागांचे वाद दोन्ही

देशांत आहेत. शिक्षण अधिकाधिक महागडे, न परवडणार होत चालल आहे. शिक्षणातही विद्यार्थ्यांचा कल तांत्रिक शिक्षण किंवा वाणिज्य शाखांकडे अधिक आहे. समाजशास्त्र किंवा कला शाखाना संख्या आणि गुणवत्ता या दोन्ही बाबीत कमीच विद्यार्थी मिळतात. त्यामुळे शिक्षणात समतोल राहिलेला नाही. समाजाला ग्रासून टाकणारी चिंता म्हणजे बेकारीची समस्या ! अर्थार्जन अगोदर, उच्च शिक्षण नंतर. यामुळे शिक्षणावरचा एकूण विश्वासच उडत चालला आहे. भविष्याबद्दलची चिंता, अस्वस्थता, असुरक्षितता तरुण वर्गाला पोखरते आहे; पण बेकारीच्या पार्श्वभूमीवर झटपट नोकरी मिळण्यासाठी अमेरिकन तरुणाचा कल कामचलाऊ आणि जुजबी अभ्यासक्रम करून नोकरी मिळवण्याकडे असतो. भारतीय तरुण मात्र या बाजारात आपल्याला चांगला भाव मिळावा म्हणून अधिकाधिक आणि प्रदीर्घ मुदतीचे अभ्यासक्रम शिकून स्वत:ला उच्चविद्याविभूषित करण्याची खटपट करतो.

प्रा. राम जोशींचं हे वक्तव्य इतकं अभ्यासपूर्ण होतं की, भारतातल्या तर आहेच, पण अमेरिकन शिक्षणक्षेत्रातल्याही किती तरी समस्यांचं त्यांनी सखोल विश्लेषण केलं आहे, असं भारतातल्या अमेरिकन कॉन्सुलेट जनरलनीसुद्धा नंतर बोलताना मोकळेपणानं कबूल केलं. ◻

◻ रोटरी क्लबच्या ज्या कार्यक्रमाचा वृत्तांत मी ' मुंबई वार्ता 'मध्ये दिला होता. (माणूस ४ जुलै) त्यावर काही स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे असे रोटेरियन माधव धोपेश्वरकर यांच्या 'माणूस' १८ जुलै अंकातील पत्रावरून लक्षात आले. माझा रोख रोटरी क्लबच्या समाजसेवेवर किंवा भूतदयेवर नव्हता. मला काय म्हणायचे होते हे स्पष्ट करण्यासाठी या कार्यक्रमाचे आणखी काही तपशील—जे आधीच्या वृत्तांतात देणे मी कटाक्षाने टाळले होते—इथे देत आहे.

कार्यक्रमाची दिलेली वेळ सव्वाची; पण दोन वाजून गेले, तरी कार्यक्रम सुरु होण्याचे चिन्ह दिसेना. कहर म्हणजे, कार्यक्रमाच्या ठिकाणी मी गेले, तेव्हा एका संयोजकाला; आज इथे चित्रपटदिग्दर्शिका या संदर्भात काही कार्यक्रम व्हायचा आहे याचाही पत्ता नव्हता. त्यामुळे मी आणि माझ्याबरोबरचे अन्य पत्रकारही बुचकळ्यात पडले.

यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली. पत्रलेखकाने म्हटल्याप्रमाणे, कार्यक्रम ठरवणे आणि त्या कार्यक्रमाना श्रोतृवर्ग जमा करणे म्हणजे कठीण कामगिरी हे अगदी तंतोतंत खरे आहे. कारण धरून आणल्यासारखेच हे रोटेरियन्स अनिच्छेने बसले होते आणि मागच्या बाकावर बसणाऱ्या शाळकरी मुलासारखे आपसात कुजबूज करत होते. ही कुजबूज कार्यक्रमात एवढा अडथळा आणत होती की, अध्यक्षमहाशयांना वारंवार उठून 'सभ्य गृहस्थ हो, शांत रहा, कृपा करून गप्प रहा ! ' असे सांगावे लागत होते. म्हणजे कार्यक्रमात रस घेणे तर दूरच; पण निदान त्यात व्यत्यय न आणणे हेही या प्रतिष्ठित गृहस्थाना शक्य नव्हते काय ?

खरा कळस झाला तो पुढे. 'पुरूष सहकाऱ्याबरोबर काम करताना तुम्हाला काही एंबॅरॅसिंग अनुभव आले का ?' या प्रश्नावर सई परांजपे काही उत्तर देण्याआधीच, प्रेक्षकामधून 'इट इजन्ट मॅटर, शी इज मॅरिड !' त्याला दुसऱ्या कोपऱ्यातून प्रत्युत्तर 'ओ, शी इज नो मोअर मॅरिड !' त्यावर आणखी एक शेरा—'बट शी वॉज मॅरिड वन्स !' अशी शेलकी शेरेबाजी झडली ! आपल्या पाहुण्यांच्या वैवाहिक स्थितीच्या अशा खुल्या चर्चा करणे याला सभ्यपणा म्हणावा का ? की हा ' जंटलमन ' ला साजेसा ' खेळकर मोकळेपणा ' आहे ? या कुठल्याही असभ्य वागणुकीचा उल्लेख मी लेखात केला नाही. कारण सभ्यपणाच्या मर्यादा पाळण्यावर माझा विश्वास आहे.

मी दिलेल्या एकूण वृत्तांताचा रोख पत्रलेखकाच्या ध्यानी आला नसावा. रोटरी क्लब आणि तत्सम संस्था पुष्कळ समाजकार्य करतात. गरजवंतांना आर्थिक मदत करतात, याबद्दल तुच्छता किंवा तिरस्कार मुळीच नाही, उलट कृतज्ञताच आहे; पण भूतदया, मानवता आणि कलेची जाण, कलाकाराचा सन्मान किंवा त्याच्या कलेला दाद या दोन सर्वथैव भिन्न गोष्टी आहेत. ज्या कार्यक्रमाचा वृत्तांत मी लिहीला त्याच कार्यक्रमात अपंगांसाठी कृत्रिम अवयवाचे वितरण झाले; (हा उल्लेख मी केलेला आहेच.) पण सभासदांनी आपल्या वागणुकीने एका कलाकाराचा आणि तिच्या कलेचा उपमर्द केला ही वस्तुस्थिती त्यामुळे नाहीशी होत नाही. सभासदांच्या गजबजत्या वेळापत्रकाबद्दल पूर्ण सहानुभूती आहे; पण म्हणून एखाद्या कलाकाराला बोलावून त्याचे भाषण हे मिडडे-मिल आणि बिझनेसच्या चर्चांच्या साथीने उरकू नये एवढी किमान सुसंस्कृतपणाची अपेक्षा वावगी ठरणार नाही. आपल्या सन्माननीय पाहुण्याच्या व्यक्तिगत आयुष्याची चर्चा त्याच्यासमोरच चघळण्याचा असभ्यपणा करू नये. तेव्हा आक्षेप आहे तो ' पैसा मिळवणे आणि त्याचा उपभोग घेणे ' यावर नाही. ' थंडगार वातावरण आणि चैनीच्या साधनावर ' नाही. ' विज्ञाननिष्ठ दृष्टी असलेल्या जीवनोन्मोमुख वृत्तीवर 'ही नाही. माझा आक्षेप हा एकट्या रोटरी क्लबवर किंवा खरे म्हणजे या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या व्यक्तिगत सभासदावरदेखील नाही. विरोध आहे, तो विद्या आणि कला, विद्वान आणि बुद्धीवान कलाकारांच्या होणाऱ्या घडघडीत अवमानाला; ज्या बेफिकीरीतून हा अपमान होतो त्या बेफिकिरीला. मग ही वृत्ती कुणा व्यक्तिची असो, एखाद्या संस्थेची असो, नाही तर दस्तूरखुद्द शासनाची असो ! कुणाही सजाण, सुसंस्कृत व्यक्तिला त्याबद्दल चीड आल्यावाचून राहणार नाही !

'कोरेगाव, जयसिंगपूर, चिपळूण, चिकोडी सारख्या तशा आडवळणाच्या लहानसहान गावी' होणाऱ्या अशा क्लब्जच्या सभा मी पाहिलेल्या नाहीत आणि अर्थातच त्याबद्दल काही वक्तव्यही केलेले नाही. मी एका विशिष्ट कार्यक्रमाचा वृत्तांत लिहिला आहे आणि अशा प्रकारच्या कार्यक्रमांची मुंबईत तरी मुळीच कमतरता नाही, हे मला स्वानुभवावरून पक्के माहीत आहे.

राहता राहिला माझ्यातल्या—'द्वेष, मत्सर, आकस, असूया, चिल्लरपणा' इत्यादीचा प्रश्न. वरील विवेचनानंतर या आक्षेपाना उत्तर देण्याची काही गरज आहे असे मला वाटत नाही.

—ललिता बर्वे

# पत्रलेख

## प्रा. भावे लिहितात त्याप्रमाणे ग्रामीण व दलित विद्यार्थी आता पोरका राहिलेला नाही

'माणूस' (२७ जून १९८१) मधील उत्तरमीमांसेतील प्रा. स. शि. भावे यांचा 'ग्रामीण आणि दलित विद्यार्थ्यांचे भयानक पोरकेपण' हा लेख वाचला. ग्रामीण विद्यार्थ्यांविषयीचे प्रा. भावे याचे अनुभव मर्यादित आहेत असे वाटते. पुणे–मुंबईतील नामवंत महाविद्यालयात येणारा एखादा ग्रामीण किंवा दलित विद्यार्थी प्रा. स. शि.-ना भिऱ्या सश्यासारखा, पोरका पोरका दिसलाही असेल, परंतु पुणे–मुंबईच्या एखाद्या उच्चभ्रू महाविद्यालयात काम करणाऱ्या प्राध्यापकापेक्षा अस्सल ग्रामीण भागात किंबहुना कोल्हापूर, सांगली इतपत शहरातील महाविद्यालयात विद्यापीठात काम करणाऱ्या प्राध्यापकाचे अनुभव भिन्न आहेत. अस्सल ग्रामीण विद्यार्थी व वातावरण यांच्याशी आमची रोज गाठ पडते व पोरकेपणाच्या बाबतीत प्राध्यापक आणि विद्यार्थी यांची अदलाबदल होते.

फर्ग्युसन कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांची संख्या भरून वाहात असते. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाला गुणवत्तेची अट घालून हा लोंढा थोपवावा लागतो; परंतु ग्रामीण महाविद्यालयात विद्यार्थी मिळविणे हे किती कष्टप्रद, त्याहीपेक्षा अपमानास्पद काम आहे हे मोठ्या शहरातील प्राध्यापकाना कळणे कठीणच आहे. एकाच खेडेगावातील माध्यमिक शाळेला व महाविद्यालयाला अकरावी बारावीचे वर्ग चालविण्यास परवानगी देणे, दहापंधरा किलोमीटरच्या आसपास महाविद्यालये असणे व १० वी १२ वीचे निकाल कमी लागणे यामुळे ग्रामीण महाविद्यालये टिकविणे म्हणजे पर्यायाने आपली नोकरी टिकविणे, असे समीकरण असते. शासकीय सेवकांप्रमाणे प्राध्यापकाना संरक्षण नसल्यामुळे, विद्यार्थी मिळवा व तुमच्या नोकऱ्या तुम्ही टिकवा, असे त्याचे स्वरूप बनले आहे. मराठवाड्यातील प्राध्यापकांचे अनुभव आमच्यापेक्षाही भयप्रद असण्याची शक्यता अधिक ! या परिस्थितीची जाणीव ग्रामीण विद्यार्थ्यांना असते. विद्यार्थी मिळविण्यासाठी पत्रे घेऊन अक्षरशः मुलांच्या दारोदार जावे लागते. त्यातही बी. ए. भाग ३ ला स्पेशल पातळीवर विद्यार्थी मिळवून ते वीस तास टिकवून पर्यायी एक प्राध्यापक टिकविण्यासाठी जे वैध-अवैध उपद्व्याप करावे लागतात ते प्रा. स. शि. भावे यांनी एकदा प्रत्यक्ष येऊन पहावेत किंवा अनुभवच घ्यावा. वाढलेल्या पगारामुळे एकीकडे समाजाची सहानुभूती नाही व दुसरीकडे मुले मिळविण्याकरिता मुलांच्याच दारी जावे लागते, या विचित्र पेचातून ग्रामीण भागात प्राध्यापकांची काय अवस्था होते त्याची काही दृश्ये.

दृश्य पहिले–

दोन प्राध्यापक एका विद्यार्थ्याच्या दारात–

प्राध्यापक : ए पक्या, आहेस का घरात ?

विद्यार्थी : हो हाय की ! मराठी घ्ये म्हणून सागायशानी आला असाल ?

प्राध्यापक : काय हुशार आहेस रे !

विद्यार्थी : अवो, त्यात कसला हुशारपना? सकाळधरनं हिंदीवालं, इतिहासवालं लई येऊन ग्येलं !

प्राध्यापक : मराठी घे. एस. टी. चा पास देतो बघ. तुला पास करायच आपल्याकडे लागलं बघ !

विद्यार्थी : मी नोकरी हुडकतुया. माजं नाव घालून तुमची नोकरी टिकणार असेल तर घाला बापडं. पण फी भरन-बिरनं आपल्या बापाला जमणार न्हाई बगा.

दृश्य दुसरे–

तालुक्यातल्या लांबच्या खेडेगावात दोन प्राध्यापिका एका परिचितासह एका कोळी समाजातील प्राथमिक शिक्षिकेच्या घरी.

परिचित गृहस्थ : कोळीबाई या XYZ कॉलेजच्या प्राध्यापिका.

प्राध्यापिका : आपल्या दोन मुलींनी कॉलेजमध्ये प्रवेश घ्यावा. वसतिगृहाची सोय आहे. आम्ही त्यांच्या अभ्यासावर लक्ष ठेवू. तुम्ही फॉर्म भरा.

शिक्षिका : मुलींना पाठवायचं की नाही अजून आम्ही ठरविलं नाही. मुलींचे वडील गावाला गेलेत. पण मी एकदा तुमचे कॉलेज येऊन पाहीन. अहो, त्या ह्या म्हणत होत्या की कोणकोणत्या गावच्या ह्या आहेत कुणास ठाऊक. फसवून पैसे घेऊन जाणार नसतील कशावरून ?

दृश्य तिसरे–

कोल्हापूरइतपत शहरातील एका मोठ्या कॉलेजमधील जिमखाना–निवडणुक, शहर विरुद्ध ग्रामीण विभाग अशी चुरस. त्यात ग्रामीण विभागाचे पॅनल विजयी. प्राचार्यांच्या चेंबरबाहेर घोषणा. 'ग्रामीण पॅनल जिंदाबाद !' 'शहर पॅनल हाय ! हाय !' जनरल सेक्रेटरीचे वडील-कपाळाला गुलाल, भला मोठा फेटा वगैरे. प्राचार्यांना विजयभेट देण्यासाठी आले आहेत. पेढ्यांचा मोठा पुडा प्राचार्यांना देतात. निवडून आलेले चिरंजीव आपल्या गळ्यातला हार प्राचार्यांच्या हातात देतात. प्राचार्य मोठ्या आनंदाने तो हार ज. सेक्रेटरीच्या वडिलांच्या गळ्यात घालतात.

प्राचार्य : ओ हो–या या बसा बसा ! अभिनंदन, अभिनंदन !

वडील : आमचं जयसिंगरावाचं लई वजन समद्या पोरांवर ! ते निवडून येणार खात्री व्हती, पर सायेब, त्यो आभ्यास करीत न्हाई बघा. जरा वाईच आभ्यासाव लक्ष ठेवा त्याच्या !

प्राचार्य : आमचं लक्ष आहे त्याच्यावर. तो निश्चित पास होणार ! खात्री आहे आमची.

बाहेर आरडाओरडा, घोषणा 'ग्रामीण पॅनल जिंदाबाद' शिवाजीमहाराजांच्या पुतळ्याला हार घालण्यासाठी मिरवणूक वगैरे.

महाविद्यालयातील निवडणुका हा एक स्वतंत्र विषय आहे.

सधन शेतकऱ्याच्या चिरंजीवांनी ग्रामीण विभागाचे नेतृत्व स्वीकारले आहे. त्या नेतृत्वाखाली ग्रामीण विद्यार्थी भरपूर धीट होऊन शहरच्या विद्यार्थ्यांच्या बरोबरीने कॉलेजमध्ये धिंगाणा घालत आहेत. याहीपेक्षा मोठा धिंगाणा परीक्षेच्या वेळी घातला जातो. आत पेपर लिहीत असलेल्या संख्येच्या दुप्पट युवा–कार्यकर्ते बाहेरुन त्यांना कॉपी पुरवीत असतात. १० वी व १२ वीच्या कचाटयातून सुटलेला विद्यार्थी बी. ए. १, २, ३ सुखेनैव उत्तीर्ण होतो. हा सर्व प्रकार का खपवून घेतला जातो, हा आणखी एक भ्रष्टाचाराचा वेगळा प्रश्न! परंतु संधी मिळेल तेथे शैक्षणिक भ्रष्टाचार करण्यात ग्रामीण विद्यार्थी भरपूर पुढाकार घेतो हा प्रस्तुत मुद्दा. साराश, प्रा भावे लिहितात त्याप्रमाणे ग्रामीण विद्यार्थी हा अनाथ, पोरका, भित्रा ससा राहिलेला नाही!

ग्रामीण बहुजनसमाज हा ग्रामीण कथेतल्या माणसासारखा आता सरळसोट, एकमार्गी राहिलेला नाही. हा माणूस आता बराच गुतागुतीचा झालेला आहे. तो आर्थिकदृष्टया अजूनही दरिद्री आहे; परंतु स्वभावाने गरीब आहे असे म्हणणे म्हणजे या समाजात वावरणे नसल्याचेच प्रतीक होईल! ग्रामीण नेतृत्व पुढे आले व त्यांनी बहुजन, दलित समाजाला त्याच्या हक्कांची भरपूर जाणीव करून दिलेली आहे. निवडणुका, मतदानाच्या वस्तुपाठांमुळे मंडळीना बरेच शहाणे करून सोडले आहे. रेडिओ, टी. व्ही., चित्रपट, वाहने यामुळे ग्रामीण समाजाला शहर फारसे अनोळखी राहिलेले नाही. किंबहुना शहराजवळ असलेली खेडी सकाळी बहुतांशी रिकामी झालेली असतात. मुले-मुली एस. टी. चे पास काढून कॉलेजात जात-येत असतात. त्यामुळे शहरचे तसे नावीन्य याना राहिलेले नसते. शहरच्या कॉलेजमध्ये आलेला ग्रामीण–दलित विद्यार्थी फार तर प्रथमच्या अनोळखीपणामुळे काही दिवस गोंधळत असेल; पण ही अवस्था पुढील पाचही वर्षे टिकून रहात नाही. शहरच्या कॉलेजमध्ये त्याचा गट तयार होतोच. ग्रामीण विद्यालयाच्या प्राचार्यांच्या इग्रजीलाही तो भीत नाही. कारण ग्रामीण महाविद्यालयाचे प्राचार्य–प्राध्यापक हे बहुतेक अशाच कॉलेजाचे प्रॉडक्टस असतात. इंग्रजीची भीती फक्त परीक्षा व मुलाखतीच्या वेळी; एरवी शिवीगाळीसहित अस्सल ग्रामीण भाषेत प्राध्यापक व विद्यार्थी यांचा सलगीचा संवाद सुरू असतो! ग्रामीण कॉलेजमधल्या कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा व दलित–ग्रामीण विद्यार्थ्यांचा संवाद प्रा. भावे यानी दिलेल्या सवादापेक्षा वेगळा असू शकतो. कामाच्या गर्दीत स्कॉलरशिप देण्यास चार-दोन दिवस उशीर झाला तर काउंटरच्या पलीकडून त्यांना काय ऐकावे लागते ते प्रा. भावे यांनी या कर्मचाऱ्यांनाच प्रत्यक्ष विचारावे. या लेखनिकांची परिस्थिती आणखीच विचित्र! विद्यार्थी कमी असले तरी एकंदरीत कागदी व्यवहार मोठ्ठा! कागदाच्या पूर्ततेत तो आधीच वैतागलेला असतो. पगार ४००। ५०० रु.! रोज तीन तासिका घेणाऱ्या (वा न घेणाऱ्या) प्राध्यापकांच्या लठ्ठ पगाराची पत्रके हाच करत असतो. आपल्या पोराबाळाच्या शिक्षणाचा खर्च करता करता मेटाकुटीस आलेल्या ह्या कर्मचाऱ्याच्या हस्तेच दलित विद्यार्थ्यांच्या स्कॉलरशिपचा वाटपसमारंभ पार पडत असतो. अशी एकंदरीत त्याची अवस्था!

शहरात घरकाम करणारा ग्रामीण भागातील समाज आर्थिकदृष्टया गरीब असेल; पण तो वृत्तीने गरीब राहिलेला नाही याचा अनुभव प्रापंचिक घेतच असतात. संजय गांधी निराधार योजनेखाली पैसे मागणारा ग्रामीण समाज किती खरी-खोटी माहिती अधिकाऱ्यांना देतो व लाभ पदरात पाडून घेतो याचे किस्से ग्रामीण भागातल्या पुढाऱ्यांकडूनच ऐकावेत! तेव्हा ग्रामीण विद्यार्थी चागला व्यवहारी, हक्कांची जाणीव असणारा, बहुसंख्येच्या बळावर इतराप्रमाणेच नियम धाब्यावर बसवून लाभ पदरात पाडून घेणारा आहे. अभ्यास करणे हा प्रकार जवळजवळ ग्रामीण विद्यालयातून नष्ट होत चाललेला आहे!

अस्सल ग्रामीण विभागात काम करणाऱ्या प्राध्यापकाचे हे अनुभव आहेत. अनुभव म्हणून ग्रामीण महाविद्यालयाचे प्राचार्यपद भूषविण्यास अस्सल शहरी विद्वान, ज्येष्ठ प्राध्यापक तयार आहेत काय ? निदान व्याख्यानासाठी, प्रबोधनासाठी तरी (फक्त प्रवासखर्च घेऊन) खेडयात येण्याच्या काही योजना त्यांच्याजवळ आहेत काय ? असे जर काही असेल तर ते पहातात त्यापेक्षा वेगळी दृश्ये त्याना पहावयास मिळतील!

प्रा. प्रमिला कुलकर्णी
प्रा. सुप्रिया सहस्रबुद्धे
पाटण (जि. सातारा)

**[ 'ग्रामीण आणि दलित विद्यार्थ्यांचे भयानक पोरकेपण' ही २७ जूनच्या 'माणूस' मध्ये प्रसिद्ध झालेली उत्तरमीमासा : ११ :**

ग्रामीण विद्यार्थ्यांचे एक अगदी वेगळे रूप प्रा. प्रमिला कुलकर्णी व प्रा. सुप्रिया सहस्रबुद्धे यांनी वरील लेखात दाखवले आहे

उत्तरमीमासा :११: वाचली आणि ग्रामीण विद्यार्थ्यांच्या सद्य:स्थितीकडे आस्थेने लक्ष दिले यासाठी उभय प्राध्यापिकाचे आभार. पाटण परिसरातील ग्रामीण विद्यार्थ्यांचे स्वानुभवनिष्ठ चित्र रेखाटल्याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन!

पुणे-मुंबईसारख्या शहरी कॉलेजात दलित विद्यार्थ्यांना, आणि कोणत्याही जातीच्या ग्रामीण विद्यार्थ्यांना कसे अनुभव येतात, आर्थिक सवलती मिळूनही त्यांच्या मूळ समस्या कशा कायमच राहतात या वस्तुस्थितीकडे लक्ष वेधावे, असा माझा हेतू होता. तो चागला साध्य झाला असे या विद्यार्थ्यांच्या, पालकांच्या आणि इतर वाचकांच्या अनुकूल प्रतिक्रिया मला मिळाल्या त्यावरून, म्हणता येईल.

उभय प्राध्यापिकानी दिलेले चित्र खरे आहे, पण ते प्रातिनिधिक नाही. पाटण परिसराचे स्वभाववैशिष्टय महाराष्ट्रात सर्वजण ओळखतात, पण कोयनेच्या पश्चिमेला चिपळूणला कॉलेज आहे. तेथील विद्यार्थ्यांचे चित्र वेगळे आहे नागपूर–वाद्यापासून मालवण–सावंतवाडीपर्यंत अनेक कॉलेजांताल ग्रामीण विद्यार्थ्यांशी बोलण्याची, त्यांना पाहण्याची संधी प्रस्तुत लेखकास मिळाली आहे. यातील बहुसंख्य ठिकाणी पाटणपेक्षा परिस्थिती वेगळी आहे. 'नवधनाढ्य' आणि 'नवसत्तारूढ' या क्षेत्राबाहेर बहुसंख्य ग्रामीण, दलित विद्यार्थी आहेत. ते अद्यापही पीडित आणि उपेक्षित आहेत.

'शहरी प्राध्यापक खेडयात येतील का ?'

असा प्रश्न लेखिकांनी विचारला आहे. मी मूळचा ग्रामीण भागातला आहे. सध्याही अनेकदा ग्रामीण भागात जातो. पाटणला जाण्यासही माझी नेहमीच तयारी असेल. कळावे.

–स. शि. भावे ]

---

## ☐ एका मिनि शरद जोशीची धमाल !

---

उमरगा. उस्मानाबाद जिल्ह्यातील एक तालुक्याचे ठिकाण दि. २५ जून. महाराष्ट्राचे कायदामंत्री बॅ. बाबासाहेब भोसले येणार असतात.

त्याआधी दोन दिवसांपासून विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीच्या कार्यालयांसमोर शेतकरी सरकारतर्फे विकल्या जाणाऱ्या बियाण्यांच्या पिशव्यांची वाट पहात हताशपणे बसलेले असतात. बियाणे त्यांच्यापर्यंत पोहचत नसते. बिचाऱ्या शेतकऱ्यांना वाली नसतो. जनतेविषयी बांधिलकीने बोलणाऱ्या एकाही राजकीय पक्षाला त्याची दखल नसते.

इतक्यात विश्वास डिग्गीकर नावाचा एक पंचविशीतला तरुण सोसायटीच्या ऑफिसासमोर ठाण माडून बसलेल्या शेतकऱ्यांना भेटतो-बोलतो. तिथून लगेच सायकलवर टाग मारून तो डाकबगल्यावर पोहचतो. डाकबगल्यावर मंत्रिमहाशयाची वाट पाहात तहसीलदार, बी. डी. ओ., फौजदार, इंजिनिअर वगैरे अधिकारी थांबलेले असतात. हा तरुण त्या सर्वांना भेटून बियाण्याचा प्रश्न ताबडतोब सोडविणे कसे आवश्यक आहे, त्याशिवाय पेरण्या कशा खोळंबल्या आहेत वगैरे सागतो. प्रश्न त्वरित न सुटल्यास मोर्चा काढणे भाग पडेल व त्यात हिंसा घडल्यास त्याची सर्व जबाबदारी तुमच्यावर राहील, असे फौजदाराना सौजन्यपूर्ण भाषेत सागतो. लगेच तासाभरात डाकबगल्यावर शे-दीडशे शेतकऱ्याचा शिस्तबद्ध मोर्चा येतो. मोर्चाचे नेतृत्व अर्थात ह्याच अेकाड्या शिलेदाराकडे असते. हा पुढारी व मोर्चातला एक शेतकरी डाकबंगल्यात जातात. बी. डी. ओ ना मोर्चासमोर निवेदन करण्याची विनती करतात. बी. डी. ओ. ती मान्य करतात. कायदामंत्र्याचे भाषण संपल्यानंतर बियाणेवाटप सुरू होईल, असे खात्रीलायक आश्वासन देतात त्याप्रमाणे घडतेही. तहसीलदार व बी डी. ओ. बियाणे वाटपासाठी प्रामाणिकपणाने प्रयत्न करून रात्री १० पर्यंत सोसायटीला बियाणे वाटप करणे भाग पाडतात. दुसऱ्या दिवशीही असाच प्रकार घडतो. सोसायटीचे बी. डी. ओ. ऑफिसमध्ये असलेले क्रेडिट सपलेले असते. सोसायटीचे ऑफिस कुलुपबंद असते. शेतकरी पुन्हा तसेच हताश चेहरे घेऊन दाराशी बसलेले असतात. सदर तरुण पुन्हा त्या शेतकऱ्यात शिरतो. या वेळी मात्र तो एकटा पुढारी नसतो. त्याचा एक दोस्त, जो मुबईचा रहणारा विद्यार्थी-नेता असतो, त्याच्याबरोबर असतो. काही वेळानंतर सोसायटीचे ऑफिस उघडे असलेले आढळते. आत कर्मचारी असतात. हे दोन पुढारी आत जाण्याचा प्रयत्न करतात तेव्हा कर्मचारी त्याना अडवतात व 'चेअरमनसाहेब' झोपलेले आहेत असे सागतात. मग बाहेरून घोषणा दिल्या जातात, 'चेअरमनसाहेब ! जागे व्हा !' कानठळ्या बसवणाऱ्या घोषणा होऊनही चेअरमन जागे होण्याच्या मनःस्थितीत नसतात. शेवटी तहसील कार्यालयावर मोर्चा निघतो. या वेळी मोर्चात २०० ते २५० शेतकरी असतात. त्यात स्त्रियाही असतात. मोर्चाचे दोन्ही पुढारी तहसीलदाराना भेटतात. तहसीलदार चिडलेले असतात. ते सोसायटीच्या चेअरमनला ताबडतोब बोलावून घेतात व बी डी. ओ. करवी १० क्विंटल बियाणे सोसाटीला पुरवून वाटप करावयास लावतात. सर्वच गरजू शेतकऱ्याना बियाणे मिळते. शेतकरी ह्या दोन्ही पुढारी पोराना दुवा देत पेरणी करण्यासाठी आपापल्या गावी परततात. बियाणे आदोलन यशस्वी होते.

दुसऱ्या दिवशी 'श्रमिक शेतकरी सघटने'च्या नावाने उमरग्याच्या मुख्य रस्त्यावर पाढऱ्या कागदावर लालभडक अक्षरानं लिहिलेला एक बोर्ड झळकतो. त्यात गेल्या दोन दिवसात बियाणे मिळविण्यासाठी झालेल्या आदोलनात सहकार्य केल्याबद्दल श्रमिक शेतकरी, तहसीलदार, बी. डी. ओ., सोसायटीचे पदाधिकारी यांचे हार्दिक आभार मानलेले असतात. खाली 'संघटक, श्रमिक शेतकरी संघटना, उमरगा' एवढेच लिहिलेले असते. ही श्रमिक शेतकरी संघटना म्हणे बियाण्यासाठी काढलेल्या पहिल्या शेतकरी मोर्च्यापासून अस्तित्वात आली. तिचा संघटक आहे हा विश्वास डिग्गीकर नावाचा तरुण. हा मराठवाडा विद्यापीठातून एम. ए. अर्थशास्त्र झालेला असून त्याने अेक वर्षभर औरंगाबादच्या एका उच्चभ्रू कॉलेजात प्राध्यापकी केलेली आहे. 'काही अपरिहार्य कारणामुळे' (असे तो म्हणतो) त्याने नोकरीचा राजीनामा दिलेला आहे.

आता ह्या 'श्रमिक शेतकरी संघटने'तर्फे दुसरा एक महत्वाचा प्रश्न त्याने घेतला आहे. 'सजय गाधी निराधार अनुदान योजने'तर्फे निराधाराना दिले जाणारे अनुदान त्वरित दिले जावे, धूळ खात पडून असलेले अर्ज लवकरात लवकर निकालात काढले जावेत अशी त्याची मागणी आहे. या मागणीसाठी त्याने आपल्या एका साथीदारासह तहसील कार्यालयासमोर दि. १ जुलै रोजी लाक्षणिक धरणे धरले. हा प्रश्न आपण सोडविणारच, अशी त्याची प्रतिज्ञा आहे.

या पुढाऱ्याने आणखी एक धमाल केली आहे. धरणे धरल्याच्या दुसऱ्या की तिसऱ्या दिवशी याने चक्क एक 'पत्रकारपरिषद' येथील मेनरोडवरील एका हॉटलात बोलावली. अर्थातच पत्रकाराना चहा-बिहा काही पाजू शकला नाही. कारण तो स्वत च सध्या बेकार असल्याने त्याच्या खिशात पैसे असण्याचा प्रश्नच नव्हता. उमरगा गावातले इन-मीन तीन वार्ताहर ह्या 'शेतकरी नेत्याच्या' पत्रकार-परिषदला जमले. त्यांनी बरेच उलट-सुलट प्रश्न विचारले; पण ह्या 'शेतकरी नेत्याने' न डगमगता उत्तरे दिला. इन-मीन तीन पत्रकाराना आपल्या 'श्रमिक शेतकरी संघटने'च्या चार कलमी घटनेच्या स्वहस्ताक्षरात लिहिलेल्या प्रता वाटल्या. त्या चार कलमातली दान कलमे लक्षणाय. एक-श्रमिक शेतकरी सघटना ही पक्षनिरपेक्ष असून ती कोणत्याही राजकोय पक्षाची बाधलेलो जनसघटना नाही. तिचे हेच स्वरूप कायम रहावे असा संघटकाचा प्रयत्न राहील. दान आमचा अहिंसा व हृदयपरिवर्तनावर विश्वास आहे. सर्व आंदोलने आम्ही याच

मार्गाने हाताळू इच्छितो. धमाल ! एकदम धमाल ! प्रस्तुत तरुण 'शेतकरी नेता' जो विश्वास डिग्गीकर या नावाने ओळखला जातो, हा CPM चा (मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा) सभासद असल्याचे खात्रीलायक-रीत्या समजते आणि हा म्हणे पक्षनिरपेक्ष संघटना बांधणार. त्याने घेतलेल्या तथा-कथित पत्रकारपरिषदेत त्याला एका आर. एस. एस. वाल्या वार्ताहराने विचारले, 'मग तुम्ही तुमचा पक्ष का सोडत नाही ?' तेव्हा त्याने तावडतोब उत्तर दिले, 'तुम्ही आर. एस. एस. सोडून माझ्या संघटनेत येणार असाल तर मी आताच माझा पक्ष सोडतो !' एकूण हा प्राणी धमाल करणार असे दिसते. पक्षनिरपेक्ष शेतकरी ( चुकलो ! श्रमिक शेतकरी संघटना ! ) संघटना बांधणे अवघड असले तरी अशक्य नाही असे त्याचे म्हणणे. एक गोष्ट मात्र खरोखरच मनोरंजक आहे. त्याच्या ह्या आंदोलनाला आर. एस. एस. व कम्युनिस्ट (उजवे) या परस्परविरोधी विचाराच्या लोकांची सहानुभूती व साथ आहे !

ज्ञा. सि. महाराज, उमरगा

---

## रॉयल्टीच्या दगडाखाली चेंगरलेल्या पाथरवट समाजाचा टाहो !

---

महाराष्ट्र शासनाच्या मागासवर्गीयांच्या; मागासलेल्या जमातीच्या यादीत पाथरवट या जमातीचा समावेश आहे. मूळची आंध्र-प्रदेशातील वंशज असलेली ही जमात आहे. कुलदैवत भवानी, एलामाय इत्यादी देवता आहेत. आदिवासी समाजात असणाऱ्या चाली-रीती या जातीत रूढ आहेत. वधूपक्षास पैसे देणे, दारू पाजून लग्न जुळविणे इत्यादी अनिष्ट रूढी आहेत. ऋणग्रस्तता हा या समाजाचा स्थायीभाव आहे. लग्न जुळविण्या-पूर्वी दारू-मांसाची मेजवानी होते. हा सर्व कार्यक्रम टिळा अथवा शालमुदीसारखा असतो. या वाङ्‌निश्चयास ते 'डसपी' असे म्हणतात. अकोला जिल्ह्यात शिर्ला, चिखल-गाव, बाभुळगाव, नादखेड, देऊळगाव या गावी या जातीची वस्ती आहे. नांदेड, परभणी, यवतमाळ व बुलढाणा जिल्ह्यात काही दोन-चार गावी यांची गावाच्या बाजूस वस्ती आहे. ह्या गावात ते दुष्काळात येऊन स्थायिक झाले आहेत. पिढ्यान्‌पिढ्या दगडाशी लढणाऱ्या या लोकांची नावे धोंडी, धोंड्या, दगडू, दगडी, गोट्या, गोटी अशी दगडसादृश आहेत.

विदर्भातील ज्या मोजक्या सधन गावात हे स्थायिक झाले त्या गावाचा आर्थिक विकास यांच्या श्रमांनी झाला आहे. शेत-कऱ्यांना मजूर मिळाले, घराना व वाड्यांना ताशीव दगड मिळाले. विहिरी खोदल्या गेल्या. सावकार, दुकानदार इत्यादी सर्व लोकांचे पोट भरले. पाथरवट समाजातील लोक आजही उपाशीपोटी राहतात ! घरावर टिन नाहीत. कवेलु नाहीत. दारिद्र्य स्थायीभाव असलेले हे लोक दारिद्र्य घेऊनच मरणार आहेत. ग्रामपंचायतीचं राज्य आलं आणि सर्वच मुसळ केरात गेलं ! त्यांचा एक शिर्ला ग्रामपंचायतचा उपसरपंच सांगत होता—

'भाऊ, आमास्नी पूर्वीच्या काळात फुकटात दगड मिळत असे. ग्रामपंचायतीचं राज आलं. आमच्या लोकाईनं जसं हे राज-कारण धरलं तसं रायल्टीचं भूत आमच्या लोकाईनच्या मानगुटीवर बसलं !'

पूर्वीच्या काळात गावतील बड्या मंडळीस हे लोक दबून वागत असत. त्यांना जाते, पाटे, खलबत्ते बनविण्यासाठी सरकारने कधीही भाडकाठी आणली नाही. गावातले राजकारण बदलले आणि कुणा एका शहाण्या माणसाने तहसीलदाराच्या कोर्टात तक्रार दाखल केली. तेव्हापासून शिर्ला या गावात दगडापासून जीवनोपयोगी वस्तू बनविणाऱ्या या लोकांना रॉयल्टी भरावी लागत आहे.

दगडाची रॉयल्टी भरणाऱ्या या पाथरवट जातीच्या लोकांना दारूबत्तीने खोल खाणीतून दगड काढावा लागतो. या धोक्यास पूर्णतया अर्धवट ,कपडे घालणारे हे लोक स्वत: जबाबदार 'असतात. शिर्ला येथील दगडखाणीतून अकोल्याचे टॉवर, कृषिमहा-विद्यालय व बगीचे उभे झाले असले तरी पाथरवटांच्या झोपड्या कायम आहेत. सर्व उत्पन्न ठेकेदाराच्या घशात जाते ! या समा-जातील लोकांना शेतीचे काम येत नाही. शिक्षणाची आवड नसल्यामुळे शासनाच्या मागासलेल्या जातीच्या सवलतीतून नोकरीचा फायदा ते घेत नाहीत. शिर्ला गावातील स. स. नं. ७३ 'इ' क्लासमधून त्यांना दगड मिळतो ही रॉयल्टी पातूर तहसीलमध्ये भरावी लागते. दर प्रत्येक टनास १-५० (एक रुपया पन्नास पैसे) असला तरी यांना परवारी दाखला, ७/१२ ची नक्कल, खाणीचा नकाशा, अर्ज लिहिणे, अर्ज-फी चलन लिहून घेणे व भरणे या सर्व कार्यात दर महिन्यास प्रत्येकी २५ रुपये खर्च येतो. दरमाणशी व दर कुटुंबास हा खर्च करणे कठीण आहे. आधुनिक मिक्सर वापरणाऱ्या धनिकास जाते, पाटे, खलबत्ते या सामानांची गरज नाही. गरिबाच्या संसाराच्या ह्या वस्तू विकण्यासाठी त्यांना लांब-दूर ट्रकने माल न्यावा लागतो. दळण-वळण-खर्च, मुक्काम; विक्रीसेवा व अज्ञान ह्या त्रिविध गुणांमुळे ते यात्रेवरून खाली हात घरी येतात. त्यातही रॉयल्टी परवान्यात जास्तीत जास्त पंधरा दिवसांची मुदत तहसीलदार देतात. पंधरा दिवसांत जाते, पाटे होण्यास योग्य दगड निघत नाहीत. निघाल्यानंतर खाणीवरून गाढवावरून दोन नग दररोज हे लोक घरी आणतात. मुदत संपल्यानंतर अनधिकार प्रवेश व खोदकाम केल्याबद्दल यांच्यावर केसेस दाखल होतात. ठेकेदारीने काम करीत नाही, असे लेखी देण्यास हे लोक तयार आहेत.

पोटाच्या धंद्यासाठी मोजक्या दोन सर्व्हे-नंबरमधून दगड काढण्याची कायमची पर-वानगी शासनाने द्यावी, अशी शिर्ला येथील पाथरवट समाजाची मागणी आहे. शरद पवारांनी गरिबांच्या भल्यासाठी फार मोठं केलं असे म्हणतात; पण पाथरवट उपवासीच झोपत आहेत.

ना. अंतुले सरकार दरदिवशी गरिबांच्या भल्याची एक योजना जाहीर करतात; पण पाथरवटासाठी त्यांनी अजून का डोळे झाकले आहेत ? इंदिरा गांधींना ते कुलदैवताइतकाच मान देतात; पण कुलस्वामिनी भक्ताकडे का पाहात नाही ?

*अकोला जिल्ह्याचे माजी खासदार पैगं-*बरवासी असगर हुसेनसाहेब यांनी एक वेळ त्यांना आश्वासन दिले होते; पण ते लव-करच कालवश झाले. योगायोगाने त्यांचे पुत्र ना. अजहरहुसेन महसूलमंत्री आहेत.

कलीयुगात त्यानी पितृवचनाची पूर्ती केल्यास त्याच्या पित्याच्या आत्म्यास शांती मिळेल! एवढ्या शांततामार्गाने एक अनपढ समाज गेल्या दशकात शासनाकडे अर्ज-विनंत्या करीत आहे. कुठल्याही पक्षाची लाल, काळी, निळी, पांढरी झेंडी या समाजास समजली नाही. आ. राम मेघे यांनी त्यांना विधानसभेत गाऱ्हाणी मांडतो असे सांगितले आहे.

'रामा तुजविन कोन आता' असे म्हणत ते लोक मामलेदारकचेरीवर तारखेवर कामधंदे पाडून हजर होतात. ईश्वर करो आणि सनदशीर भांडणाऱ्या या लोकांना न्याय मिळो!

—लक्षवेधी

## बापटसाहेब, जमाना बदलला आहे

□ दि. १३ जुलैच्या अंकातील अनिल बापट या आमच्या मुबईतील मध्यमवर्गीय मित्राचे पत्र वाचले. बिचारे बापट प्रामाणिकपणे आपल्या काय अडचणी आहेत हे कबूल करतात. त्याच्या संसारातील महागाईच्या मूळ समस्यांना शेतकरी आंदोलन व त्याचे नेते जबाबदार आहेत असे त्याचे ठाम मत दिसते. 'माणूस' हे त्याचे समर्थक असलेले प्रमुख साप्ताहिक आहे म्हणून त्यांना या साप्ताहिकाचा अलिकडे राग येण्यास सुरुवात झाली आहे. बिचाऱ्या संपादकांपुढे आता प्रश्नच उभा ठाकलेला आहे. कारण पिढ्यानपिढ्या शापित असलेल्यांच्या अन्यायाबाबत स्पष्ट लिहायचे का, मध्यमवर्गीय वाचक जपण्यासाठी गुळगुळीत साहित्य नेहमीप्रमाणे लिहायचे?

श्री. बापट यानी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्यात किती सत्य आहे हे आपण तपासून पाहू या. साखर जेव्हा महागली त्याचा शेतकरी आदोलनाशी कमलाही संबंध असण्याचे कारण नाही. कारण शेतकरी चाल हंगामातील उसाला भाव मागत होते, तर व्यापाऱ्यांनी गेल्या हंगामातील साखरेची टंचाई निर्माण करून साखरेची प्रचंड किंमत वाढवली होती हे स्पष्ट आहे. हे शासनाच्या चुकीच्या धोरणाचे फळ होते.

सरकारने कसलेही धोरण आखले तरी व्यापारी त्याचा फायदा घेतात. साखर खुली केली तरी त्याचा फायदा घेतात. नियमित केली तरीही फायदा घेतात. व्यापारी माजरासारखे असतात. माजर कसेही पडले तरी नेमके पायावर पडते. त्यामुळे त्यांचा फायदा असतोच.

आम्ही मध्यमवर्गीय 'इंडिया'तील मित्रांना आमचे नंबर एकचे शत्रू मानले नाही. तुमचे जे दुःख आहे ते आम्ही पिढ्यानपिढ्या भोगत आहोत. फरक इतकाच की, तुम्ही ते मांडत आलात. आम्हाला संधी मिळालीच नाही!

'माणूस' चे संपादक कोण आहेत याची जाणीव करून देण्याची आता तरी गरज वाटत नाही. कारण 'माणूस'ने आदिवासी-समस्या महाराष्ट्राच्या वेशीवर टांगण्याचा प्रयत्न केला होता. आता शेतकरी आंदोलनास प्रकाशात आणण्याचे प्रामाणिकपणे काम त्यांनी केले आहे.

मा. बापटसाहेब, जमाना बदलला आहे! त्यात माजगावकर तर बदललेच आहेत, पण परिस्थितीने तुम्ही पण बदलावं ही आमची इच्छा आहे.

समजा, 'माणूस'ला तुम्ही दिलेल्या सल्ल्याप्रमाणे 'शेतकरी आंदोलन' याला प्रसिद्धी नाही दिली तर चळवळ थांबेलच अशी खात्री वाटते का?

म्हातारीने कोंबडे डाळले तरी सूर्य उगवायचा राहात नसतो. तुम्ही 'माणूस' वाचलाच नाही तर किंवा संपादकानी छापला नाही तर शेतकरी आदोलन थांबणार नाही! आपण मात्र परिस्थितीचा विचार करूनच या सर्वावरील उत्तरे बघाल ही अपेक्षा!

**देविदास पवार**
औराद—शहाजानी
जि. उस्मानाबाद

## NEW TITLES RECEIVED

१. थैमान (गुन्हेगार-कथा) : प्रमोद नवलकर
२. आवितान : आनंद यादव
३. स्वानंदिनी (संगीत) गुनिदास गीतसंग्रह
४. बेघर (कादंबरी) : शांता निसळ
५. रंग माझा वेगळा (कविता) : सुरेश भट
६. आणि बाकीचे सगळे (कथासंग्रह) : श्याम मनोहर
1. **Face to face with Krushchov (Interview) : Abbas Khwaja**
2. **An Analysis of Human Sexual Response (Sexology)**
Edited by Ruth & Edward Brecher

*It has been proved in U. S. A. that reading the book of your choice gives you relaxation and produces Beta Waves. They are very beneficial ! Beat the rat-race with a book !!*

**The Phoenix Library**
**727, Sadashiv Peth, Pune 411 030**

## उत्तरमीमांसा : १६ :

स. शि. भावे

# पत्रकारितेच्या आदर्शांची पाच तपे

# 'किर्लोस्कर' नाबाद ६१

एक ऑगस्ट–लोकमान्याची पुण्यतिथी! लोकमान्यांचे अनेकागी मोठेपण नव्याने सागण्याची आवश्यकता नाही. त्याच्या महान् गुणवैभवातून आणि कार्यकर्तृत्वातून अलीकडे पुन्हा पुन्हा आठवते ती त्याची श्रेष्ठ पत्रकारिता!

निर्भयता हा लोकमान्याचा पिंड होता आणि समाज–शिक्षण हे त्याचे ध्येय होते. लोकाचे, लोकानी आणि लोकांसाठी चालविलेले खरे स्व–राज्य त्याना हवे होते. 'केसरी' आणि 'मराठा' या वृत्तपत्राच्या माध्यमातून या लोकवादी स्वराज्य–मूल्याचे शिक्षण त्यानी लोकाना दिले.

समाजशिक्षणाच्या बाधिलकीने लोकमान्यानी चालविलेल्या तेजस्वी पत्रकारितेची पुन्हा पुन्हा आठवण होणे अपरिहार्य आहे. शिवाय, आज अशी आठवण होण्याला एक चागले निमित्तही आहे.

समाजशिक्षणाचे आणि समाजप्रबोधनाचे व्रत अंगिकारिलेल्या एका ज्येष्ठ, मान्यवर मासिकाची एकसष्ट वर्षांची अखड तपश्चर्या आज एका नव्या टप्प्यात प्रवेश करते आहे. किर्लोस्कर मासिक आज बासष्टाव्या वर्षात प्रवेश करते आहे आणि गेली जवळ जवळ चाळीस वर्षे, 'उद्योग–उत्साह–आत्मोन्नती' यांच्या जोडीने सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून, पुरोगामी धोरणाने 'किर्लोस्कर'चे कुशल संपादन करणारे, आपणा सर्वांचे (साठी पूर्ण केलेले) तरुण मित्र, श्री. मुकुन्दराव किर्लोस्कर आज आपली संपादकीय सूत्रे अधिकृतपणे खाली ठेवत आहेत. समाजप्रबोधनाच्या अखंड व्रताचा दुसरा टप्पा आज पुरा होत आहे!

¤

पहिला टप्पा–'किर्लोस्कर' मासिकाचा प्रारंभ १९२०, जानेवारीच्या एक तारखेस सुरू झाला होता. चार पृष्ठाच्या त्या पहिल्या अंकाला नाव होते, ते फक्त 'किर्लोस्कर' नव्हते, तर 'किर्लोस्कर–खबर' असे होते. एका उद्योजक घराण्याचे मासिक (House Magazine) असा या मासिकाचा मूळ उद्देश होता. तरी तेवढाच एक उद्देश नव्हता.

पुढे आठ वर्षांनी, १९२९ मेच्या अंकापासून 'खबर' हे उप-पद लुप्त झाले. 'किर्लोस्कर मासिक' असे ठसठशीत नाव उरले. या बदलाविषयी लिहिताना, आरंभापासूनचे संपादक श्री. 'श. वा. कि.' यांनी लिहिले आहे की, '१९१६ च्या सप्टेंबरात 'खबर'चा नमुना अंक काढला होता, त्या वेळी किर्लोस्कराच्या कारखान्यात तयार होणाऱ्या सुधारलेल्या आउताची माहिती द्यावी, असा मर्यादित उद्देश होता.' पण १९२० ते २९ या काळात 'या मासिकाद्वारे एक उत्कृष्ट समाजसेवा' घडते आहे असा विश्वास संपादकाना वाटला. मराठी जीवनात 'किर्लोस्कर' चे वेगळे सास्कृतिक व्यक्तिमत्त्व निर्माण होते आहे असा आत्मप्रत्यय संपादकाच्या अनुभवास आला आणि 'किर्लोस्कर–खबर' चे 'किर्लोस्कर मासिक' झाले!

आपले स्वत:चे सास्कृतिक व्यक्तिमत्त्व कोणते, याची सुस्पष्ट जाणीव संपादकाना आरभापासूनच होती. 'किर्लोस्कर' च्या दुसऱ्याच अंकात, 'झाकलेले माणिक' या नावाने एका कर्तृत्वाचा गौरव प्रसिद्ध झाला आहे. चौथ्या अकात, 'उद्यम व उत्साह' यासाठी सपादकानी एकांना 'शाबासकी' दिली आहे. पाचव्यात 'लोखडी नांगराची' कविता आहे. सातव्याच्या मुखपृष्ठावरच संपादकीय घोषणा आहे : 'हे मासिक काल्पनिक गोष्टीसाठी नाही!' नवव्या अंकात, औन्धचे पुरोगामी राजे, भवानराव पतप्रतिनिधी, याचे 'इंग्लंडचे पत्र' आहे. १० व ११ या जोड-अंकात, ना. ह. आपटे यांची 'यशोमंदिर' ही उत्साहवर्धक लेखमाला सुरू झाली आहे.

सतराव्या अकात लोकमान्याचे पुण्यस्मरण करताना, सहाव्या अंकात दिलेले लोकमान्याचे पत्र स्मरून, टिळकांच्या परंपरेशी स्वत:चे नाते 'किर्लोस्कर'ने अभिमानाने सागितले आहे आणि लोकमान्यांच्या व्रतस्थ निष्ठेचे अनुकरण करा, असे वाचकाना आवाहन केले आहे.

पहिल्या वर्षं दीड वर्षाचा जो हा तपशील येथे सागितला आहे तो मुद्दामच. या तपशीलात या बाळाचे पाळण्यातले पाय दिसतात.

¤

वाचकांना बोध करणे, नवी माहिती देणे, नवी ज्ञानदृष्टी देणे, शक्य तर त्याचा जुना-पारंपारिक साचा बदलणे याची केवळ हौसच नव्हे, तर अंगी भिनलेला अभिनिवेश, अगदी आरंभापासून दिसतो. एखाद्या नवधर्मप्रसारकाच्या अभिनिवेशासारखा हा अभिनिवेश आहे.

'किर्लोस्कर'च्या संपादकाना त्याचा 'नवधर्म' मिळाला होता. इहवाद, बुद्धिवाद, वास्तववाद आणि प्रयत्नवाद असा त्याचा आधुनिकतेचा चतुष्कोणी धर्म होता. या धर्माचा मत्र होता– 'उद्योग-उत्साह-आत्मोन्नती' (दुसऱ्या वर्षाच्या अखेरीस उद्योग, उत्साह, आत्मोन्नती याचे मासिक') अशी प्रतिज्ञा मुखपृष्ठावर आली आहे.

या आधुनिकतेच्या निष्ठेचे निशाण 'शंवा कि'नी बावास–तेवीस वर्षे खाद्यावर वागवले. या 'मिशनरी' कार्यासाठी त्यानी अनेक नवे समानशील लेखक मिळविले, समविचारी सहकारी शोधले, नवनवी सदरे, नव्या लेखमाला लिहून घेतल्या, निर्भयतेने लिहिण्यासाठी लेखकाना प्रोत्साहन दिले आणि संपादकीय सरक्षण त्याना दिले.

थोडा तपशील पाहू या.

१७ व्या अकात लखकांना विस्तृत सूचना आहेत. त्यातली एक 'नेहमी त्याच उपमा नकोत.' वर्ष २, अक १ मध्ये, पार्वतीबाई आठवल्याचा परिचय आहे. वर्ष २, अंक ५ मध्ये, डॉ. आनंदीबाई जोशीची वचने आहेत. नंतर नंतर मुखपृष्ठावर, त्याहीनंतर आत

अनुक्रमणिकेच्या पहिल्या पृष्ठावर, सुवचने देणे हे 'किर्लोस्कर'चे वैशिष्टयच होऊन बसलेले दिसते. काही सुवचने पाहू या. संपादकांचे मन व दृष्टिकोण त्यात दिसतील. 'खरा आनंद दुसऱ्याचे उपयोगी पडण्यात आहे,' हे सुवचन आठव्या अंकात आहे. 'आला क्षण गेला क्षण' ही केशवसुताची कविता, सुभाषित म्हणून, वर्ष ३, अंक ९ मध्ये पुनर्मुद्रित केली आहे वर्ष ४ अंक ४ मध्ये, श्री. नि. चापेकराचे 'उन्नतिगीत' आहे. 'डॉक्टरानी रोग्याकडे सावज म्हणून पाहू नये' असा इशारा वर्ष ४, अंक ८ मध्ये आहे 'आमचे लाडके शब्द : नशीब, ब्रह्म, अवतार'– असा उपहास वर्ष ५, अंक १२ मध्ये आहे, तर वर्ष ६, अंक १ मध्ये महत्त्वाचा, गंभीर तत्त्वविचार आहे–' स्वतंत्र देशात क्षुल्लक अन्याय घडला तरी चोहोंकडे ओरड सुरू होते; पण जुलमी अमलाखाली लोकांवर गैहजब झाला तरी थोडीशीच कुरकुर ऐकू येते.'

¤

मर्यादित भूमिकेकडून व्यापक भूमिकेच्या दिशेने 'किर्लोस्कर'चा विकास आरंभापासूनच कसा होत गेला हे वरील मासल्यावरून समजून येते. उद्योग, उत्साह, स्वावलंबन, शरीरबळ, सेवाबुद्धी, त्यागबुद्धी, प्रयत्नाची पराकाष्ठा करण्याची जिद्द असे वैयक्तिक गुण नव्या औद्योगिक जीवनासाठी आवश्यक होते. अमेरिका, जर्मनी, इंग्लंड या देशातील उद्योजक, लोकनेते व विचारवंत याच्या आदर्शांनी ह्या व्यक्तित्व-मूल्य-सघ 'किर्लोस्कर'-च्या तरुण संपादकाच्या मनावर ठसला होता.

उद्योगमहर्षी लक्ष्मणराव किर्लोस्कर यांच्या कार्याने व प्रत्यक्ष उदाहरणाने शतनुराव, शंवाकि यांचे हे आधुनिक पिंड घडले होते. किर्लोस्कर, ओगले, टिकेकर या कुटुंबांनी एक नवी संस्कृतिछटा या महाराष्ट्रात आणण्याची जिद्द बाळगली होती. देशभक्तीचाच ह्या एक आविष्कार आहे, अशी त्यांची दृढ धारणा होती आणि उद्या येऊ घातलेल्या स्वतंत्र भारताची निर्दोष व भक्कम पायाभरणी आपण करीत आहोत, असे तेज त्यांच्या उद्यमात होते. नवसंस्कृतीच्या नवजागरणाचा अग्रदूत म्हणून 'किर्लोस्कर' चे संपादक स्वत.च्या कामाकडे बघत होते. 'माझे काम मोठे आहे असे माना, मी मोठे काम करीत आहे असे मानू नका' या (वर्ष ७, अंक २) सुभाषिताचा भावार्थ 'शवाकि'च्या कार्यात सर्वत्र भरून राहिला होता.

व्यक्तिगत गुणांचा उत्कर्ष या स्वत.च्या ध्येयासाठीच 'किर्लोस्कर'ला क्रमाने समाज-प्रबोधन आवश्यक वाटू लागले केवळ व्यक्ती आधुनिक झाली आणि त्या व्यक्तिभोवताल चा समाज जर जुनाटच राहिला तर त्या व्यक्तीची आधुनिकता परिणामकारक होऊ शकत नाही, असा विचार 'शंवाकि'नी आरंभीच्या संपादकीयात मांडला आहे. याच दृष्टिकोनातून त्यांनी लेखक, लेख, लेखमाला इत्यादि जमविले आणि वाचकाना जे दिले पाहिजे असे त्यांना पटले होते ते ते त्यांनी दिले.

ना. ह. आपटे, स्वतः शंवाकि, ना. सी. फडके, महादेवशास्त्री दिवेकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. वा का. किर्लोस्कर, ग. वि. केतकर, 'र. धो,' 'दि. धो.' आणि 'भा. धो.' हे कर्वेबंधू, स्वत अण्णासाहेब कर्वे, रियासतकार सरदेसाई, ना. धों. ताम्हनकर-किती बरे नावे सांगावी? यांच्या लेखमाला व यांचे लेख यांनी 'किर्लोस्कर'ची आरंभीची वीस-पंचवीस वर्षे गाजली आणि या सर्वांच्या सडेतोड आधुनिक विचारांच्या लेखनाने (आणि त्यातून उद्भवलेल्या उपासनीमहाराज-खटल्यांसारख्या खटल्यानी व वादविवादांनी) 'किर्लोस्कर' गाजले आणि 'आधुनिक, पुरोगामी विचाराचे मुखपत्र' म्हणून मान्यता पावले!

चातुर्य, नियोजनकौशल्य, चतुरस्रता, शतावधानी बुद्धी, निरलस उद्योग इत्यादी अनेक गुण 'शंवाकि'च्या संपादनकार्यात झळाळून प्रकट झाले; पण आज त्याचा एक गुण विशेष आठवतो, तो म्हणजे पत्रकारितेतील निर्भयता! हिंदू सनातनी विचारप्रवाहाला आणि त्यांच्या पूजकांना शंवाकि कधीही भ्याले नाहीत. त्याचप्रमाणे, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, स्वदेशी, स्वराज्य याची कडवी निष्ठा प्रकट करण्यास आणि ब्रिटिश साम्राज्यशाहीचा आणि तिच्या दडपशाहीचा कडक निषेध करण्यासही ते कधी डगमगले नाहीत 'जनतेत बेडरपणा आणला, हे गांधीजीचे खरे यश आहे', असा निर्वाळा त्यांनी मे, १९३० च्या अंकात दिला आहे. सरकारच दडपशाही करून आगीत तेल कसे ओतीत आहे हे ऑगस्ट, ३० च्या अंकात, मुख्य व्यंगचित्रात स्पष्ट दाखविले आहे.

¤

हे सारे प्रबोधन साधताना 'व्यवसाय' म्हणूनही 'किर्लोस्कर'ने दक्षतेने लक्ष दिले व भरभराट साधली. 'किर्लोस्कर'ची ही दक्षता विशेष लक्षात घेण्यासारखी आहे. ध्येयवादाच्या अतिरेकाने व्यवहाराकडे दुर्लक्ष करणे हा गुण नव्हे, हे यावरून ध्यानी येईल. उलटपक्षी, व्यवहारदक्षतेने ध्येयवादी विचारसरणी रुजविण्यास मदत होते हे स्पष्ट होईल.

उत्पादनाची शिस्त 'किर्लोस्कर'ने कडक पाळली. प्रकाशनाची एक तारीख गेल्या एकसष्ट वर्षांत चुकलेली नाही! पहिल्या अंकापासूनची वर्गणी व्यवसायाला आवश्यक इतकीच ठेवलेली आहे. ती मुद्दाम कमी ठेवलेली नाही. दुसऱ्याच वर्षी, किरकोळ अंकास दोन आणे व वार्षिक वर्गणी रु एक, ही किंमत १९२१ सालाच्या मानाने कमी नाही. (त्याचे आजचे सममूल्य पाहता येईल.) वर्गणीदार वाढले पाहिजेत याची काळजी घेतलेली दिसते. वर्ष ५, अंक १ मध्ये, वर्गणीदाराची संख्या सात हजारावर गेली, असा उल्लेख आहे. याच वर्षी, अंक २ मध्ये, वर्गणीदार साडेसात हजार झाले व अंक ५ मध्ये, वर्गणीदार आठ हजार झाले अशी घोषणा, मुखपृष्ठावर, अभिमानाने केली आहे.

दुसऱ्या-तिसऱ्या वर्षापासून जाहिरातीची पृष्ठे भरपूर दिसतात. त्यात 'स्वदेशी' मालाच्या जाहिरातीसाठी स्वतंत्र पृष्ठे राखून ठेवून ध्येय व व्यवहार याची सागड घातलेली दिसते. छोटया जाहिरातीची कल्पना सुरू केली व त्यास प्रतिसादही त्वरेने व मुबलक मिळाला. [एक मासला (वर्ष ७, अक ४): 'आम्ही रंगून (बर्मा) मध्ये जाहिराती चिकटवू व हुंडविले धाटू. S. K. Dhakapa] किती तरी वर्षे जाहिरातीची पृष्ठे व मजकुराची पृष्ठे समसमान असलेली दिसतात.

स्वतःच्या या व्यावहारिक कौशल्याबद्दल सपादकाना रास्त अभिमान होता. संपादकीयात अनेक वेळा याचे उल्लेख आले आहेत. 'उत्तमोत्तम पाश्चात्य मासिकांशी

तुलना करण्यास आम्ही मागे-पुढे पाहत नाही' असे त्यांनी १९३१, ऑगस्ट अंकात म्हटले आहे. दर अंकात एक व्यंगचित्र, आत कथा-चित्रे, पान दोन पाने चुटके व विनोद असा खुसखुशीतपणा अंकात यावा अशी योजना दिसते.

ध्येयवाद तोच, पण जसा गंभीरपणाने तसाच खुसखुशीतपणाने, तो मांडला जावा अशी समावेशक दृष्टी यात दिसते.

मोठ्या व छोट्या, सर्व लेखकांना सारखाच मान लेखक-संमेलनात दिलेला दिसतो. प्रत्येक लेखनाला मोबदला देण्याची प्रथा, लेखकाचा हक्क म्हणून होती. लेखासोबत लेखकाचे, तसेच चित्रासोबत चित्रकाराचे नाव सतत आले आहे. सिनेमा, सर्कस यांसारख्या क्षेत्राची उपेक्षा नाही. व्यवसाय व सामाजिक जीवनाचे महत्त्वाचे भाग या महत्त्वाने त्यांची आवर्जून दखल घेतली आहे. चित्रित होत असलेल्या चित्रपटांची छायाचित्रे नियमाने दिलेली आहेत. त्या वेळचे एक प्रसिद्ध शिंपी श्री. श्रीपतराव काकडे यांचा परिचय, वर्ष ३ अंक ५ मध्ये व्ही. शान्ताराम यांनी करून दिला आहे. स्वत: शांतारामांनाही आज हे आठवत नसेल !

समाजाच्या सर्व क्षेत्रांना गवसणी घालावी या हेतूनेच 'किर्लोस्कर'च्या कार्याचे नंतर विकेन्द्रीकरण झाले. 'कारखान्याचे पान,' 'उत्कर्ष मंडळाचे पान', 'स्त्रियांचे पान' अशी पाने आधी 'किर्लोस्करा'तच येत असत. यातून 'स्त्री' मासिक जुलै, १९३० पासून स्वतंत्रपणे प्रसिद्ध होऊ लागले. 'मनोहर' १० मार्च, १९३४ पासून नव्याने निघाले. वटवृक्षाचा हा विस्तार आजही कायम आहे. शिवाय त्यात 'बालवाडी' अंकाची भर पडली आहे !

◻

चाळीस वर्षांपूर्वी मुकुंदरावांनी जेव्हा तीन जहाजांच्या या काफिल्याचा ताबा घेतला तेव्हा त्यांच्यावर दुहेरी जबाबदारी पडली. शंकरभाऊंनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी, लक्ष्मणराव किर्लोस्करांच्या नेतृत्वाने जी भक्कम परंपरा निर्माण केली होती ती कायम राखायची आणि त्याच वेळी नव्या सामाजिक आव्हानांचा 'किर्लोस्करी' बाण्याने विचार करण्यासाठी 'नवे' व्हायचे.

ही दुहेरी जबाबदारी मुकुंदरावांनी निष्ठेने, कार्यक्षमतेने आणि तडफेने पार पाडली आणि मराठी-भारतीय समाजाची थोर सेवा केली असेच कोणासही म्हणावे लागेल !

'किर्लोस्कर' मासिकाची आधुनिकता आणि पुरोगामिता यांना पहिली वीस वर्षे आदर्श आणि सुखवस्तू रंग होता. स्वातंत्र्य, समता, लोकशाही अशी सामाजिक व्यवस्था, बुद्धिवादी आधुनिकतेसाठी आवश्यक आहेत, ही जाणीव होती. तथापि, या समाजव्यवस्थेचा आशय कोणता असावा याचे चित्र स्पष्ट नव्हते. १९३१, ऑक्टोबर अंकात कॉ. श्री. ग. सरदेसाई यांचा 'कम्युनिझम' सुरू केल्याशिवाय मंदीचा पुरा बीमोड होणार नाही' असे बजावणारा लेख आला आहे. त्याला शंवाकिनी नंतर उत्तरही दिले आहे; पण ही अपवादात्मक चर्चा होती. हेही अर्थात खरे की, तो पारतंत्र्याचा काळ असल्याने सर्वांचे लक्ष स्वातंत्र्य मिळवण्यावर केंद्रित झाले होते. स्वातंत्र्यानंतर कशा प्रकारची समाजरचना करायची या चर्चेला पुन्हा पुन्हा मागची जागाच मिळत होती.

स्वातंत्र्य क्षितिजावर दिसू लागले होते अशा मुजूमुजू काळात मुकुंदरावांनी या छोट्या काफिल्याचे प्रमुखत्व स्वीकारले. नंतरच्या काळात 'किर्लोस्कर' चा व्यावसायिक भक्कमपणा संभाळणे, विविध उपक्रमांनी मासिक रोचक करणे, समकालीन महत्त्वाच्या घटनाशी आणि समस्यांशी समांतरता राखणे अशी कामे त्यांनी कुशलतेने केली. कोयनाधरण, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, चिनी आक्रमण अशी काही उदाहरणे सांगता येतील. मुकुंदरावांच्या या कारकीर्दीचा सविस्तर आढावा घेऊ म्हटले तर दोन 'मीमांसा' चा विचर लागेल. आत्ताही 'किर्लोस्कर' च्या पहिल्या वीस वर्षांचा जास्त तपशीलात विस्तार केला आहे. कारण तो इतिहास आहे. मुकुंदरावांचे कार्य त्या मानाने अलीकडचे, लोकांच्या डोळ्यांसमोर आहे.

मुकुंदरावांनी 'किर्लोस्कर' ला स्वत:चे असे दिलेले नवे वळण म्हणजे त्यांचे सुसंगत एकसंध सामाजिक तत्त्वज्ञान, बुद्धिवाद, यंत्राधिष्ठित अर्थव्यवस्था, शास्त्रीय संशोधन, यांचे पर्यवसान शोषणात व्हायचे नसेल तर खरी समता, खरी जागृत लोकशाही, खरी विकेंद्रीत व्यवस्थापद्धती आणि राज्यपद्धति, खरी स्वतंत्र न्यायव्यवस्था या सामाजिक बांधणीची आवश्यकता आहे, हे ते गेली चाळीस वर्षे सातत्याने सांगत आले आहेत.

या सांगण्यात आवश्यक तो कणखरपणा, निस्पृहता, निष्ठा-हे गुण जरूर आहेत; पण अकारण आक्रमकता नाही. संपादकाच्या व्यक्तित्वातून त्यांचे वैचारिक धोरण प्रकट होत असते. मुकुंदराव मनाने खरे स्वातंत्र्यवादी आणि म्हणून स्नेहशील आणि सहिष्णु आहेत. या त्यांच्या वैशिष्ट्यांनी त्यांची ही सामाजिक निष्ठा सौम्य रूपात व्यक्त होत आली आहे; पण ही सौम्यता म्हणजे व्यावसायिक मऊपणा नव्हे ! त्यांच्या अंतरंगीच्या कणखर निष्ठेमुळे 'किर्लोस्कर' चा कणा अखंडपणे ताठ राहिला आहे. आजच्या ताज्या अंकाच्या प्रकाशनासाठी त्यांना नाव सुचले ते नेमके नानासाहेब गोरे या निःस्पृह, सत्त्वस्थ आणि कडव्या तत्त्वनिष्ठ व्यक्तिमत्त्वाचे !

साठ-एकसष्ट वर्षे असे एकच व्रत आचरणे हे मोठे आणि बिकट काम असते. या कामासाठी आपण 'किर्लोस्कर' चा गौरव करू या, त्यांच्या आजवरच्या कार्याला नमस्कार करू या आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी आपल्या स्नेहाचे आश्वासन देऊ या ! ◻


वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

लेखिका : सौ वीणा गवाणकर
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०
मूल्य : रुपये पंधरा

अवतीभवती । शरद कृष्णन

## □ चिंताजनक आर्थिक आघाडी

देशाची आर्थिक परिस्थिती चांगलीच चिंताजनक आहे. बाजारभाव अशा झपाट्याने वाढत आहेत की, नियोजन अर्थशून्य ठरावे. दैनंदिन गरजेच्या अनेक वस्तूंच्या किंमती आकाशाला भिडल्या आहेत. खाद्यतेल सध्या सोळा रुपये किलो या भावाने विकले जात आहे. डाळी, तांदूळ, गहू यासारख्या अन्य वस्तूंच्या किंमतीही कमालीच्या अस्थिर व चढ्या आहेत. भाववाढीच्या भस्मासुराने साऱ्या जगालाच घेरले आहे, असे म्हणून पंतप्रधान अथवा अर्थमंत्री दिलासा देण्याचा प्रयत्न करतात खरे; परंतु या मलमपट्टीचा उपयोग होणार नाही याची जाणीव त्यांनाही आहे. ज्या मानाने महागाई वाढत आहे त्या मानाने उत्पन्नात वाढ होत नसल्याने गरजांचा अग्रक्रम ठरवून आणि त्यामध्ये कपात करूनच जनतेला या आर्थिक संकटाला तोंड द्यावे लागत आहे. सरकारची खर्चाची बाजू वेगाने फुगत असली तरी उत्पन्नावर असंख्य मर्यादा असल्याने करवाढीचे आणि दरवाढीचे हत्यार चालवूनच शासनाला या परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे. त्यातच अपेक्षित उत्पन्नाच्या अनेक बाबींद्वारा उपलब्ध होणारा पैसा व्यक्त केलेल्या अंदाजापेक्षा फारच तोकडा पडत असल्याने उत्पन्न वाढवून देणाऱ्या नवीन दरवाढीचा अथवा करवाढीचा वापर करण्याखेरीज शासनासमोर अन्य पर्याय उपलब्ध नाही असे दिसून येते. पेट्रोल व पेट्रोलजन्य पदार्थ यांच्या किंमतीमध्ये अलीकडे पुन्हा वाढ करण्यात आली आहे. पेट्रोल लिटरमागे ५३ पैशांनी महागले आहे. गॅस-सिलेंडर ५० रुपयाच्या पुढे गेले आहे. रॉकेल दोन रुपये लिटरच्या जवळपास पोचले आहे. या दरवाढीचा वाहतुकीच्या दरावर परिणाम होणार असल्याने लगोलग सर्व पदार्थांच्या किंमती वाढतात आणि जनतेलाही त्याविरुद्ध आवाज उठवता येत नाही. पेट्रोल-डिझेलच्या किंमती वाढल्याने सार्वजनिक वाहतुकीचे दर वाढणे अपरिहार्य आहे. या वाढत्या दराचा नोकरदार वर्गावर परिणाम होतो. बस, एस. टी., मालवाहतूक या साऱ्यांमध्ये दरवाढीने वेग घेतला की, बाजारभावही त्याच दिशेने वेग घेतात आणि पर्यायाने सारी अर्थव्यवस्था धोक्यात येते.

आर्थिक आघाडीवरील या चिंताजनक परिस्थितीला तोंड देण्याचा प्रयत्न शासन करत आहे, असे अर्थमंत्री आर. वेंकटरामन सांगतात. तुटीच्या अर्थधारणेने कमाल मर्यादा गाठली असून या पद्धतीचा वापर आता उपाय म्हणून होणे अवघड दिसते. स्वतः पंतप्रधान देशाच्या आर्थिक परिस्थितीबाबत विलक्षण असमाधानी असून आर्थिक प्रश्नाबाबत सल्ला देणारी तज्ज्ञांची जी समिती आहे त्या समितीशी त्या सतत संपर्क ठेवून आहेत. अनेक अनावश्यक बाबींवर सरकार मोठमोठ्या रकमा खर्ची टाकत असते. सरकारी खर्चामध्ये लक्षणीय कपात करण्याच्या दृष्टीने काय करता येईल, याचा विचार करून उपाय सुचवावेत असे तज्ज्ञांच्या समितीला सुचवण्यात आले आहे. खेरीज वाढती आयात आणि घसरती निर्यात याबाबतही काही तातडीचे उपाय या समितीने सुचवावेत, असे पंतप्रधानांना वाटते. १९८१-८२ च्या अंदाजपत्रकाचा विचार केला तर १,८०० कोटी रुपयांची तूट अपेक्षित होती; परंतु प्रत्यक्षात ही तूट ३,००० कोटी रुपयांच्या घरात जाईल असे दिसते. अपेक्षित तुटीच्या मर्यादा तुटल्या तरी परिस्थिती आवाक्यात रहावी यासाठी अर्थमंत्रालय शर्थीचे प्रयत्न करत आहे.

### काळा पैसा बाहेर काढण्यात अपयश

काळा पैसा बाहेर निघावा म्हणून शासनाने बेअरर बाँड्सची योजना काढली. या योजनेपासून एक हजार कोटी रुपये मिळावेत अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात केवळ ३७० कोटी रुपये उपलब्ध होऊ शकले. आता काळा पैसा बाहेर काढण्यासाठी सरकार कठोर उपाय योजणार आहे. संपूर्ण चलनव्यवस्था रद्दबातल करण्यासारख्या उपायांपासून ते अन्य अनेक योजना शासनासमोर आहेत. शंभर रुपयाच्या नोटा रद्द होण्याच्या अफवा अधूनमधून उठत असतात. त्या अफवा अगदीच बिनबुडाच्या असतात असे नाही. शासकीय धोरणाचा वास या अफवामागे असतोच. दहा हजार रुपयांवरील ठेवी आणि अन्य व्यवहार चेकने करावेत असा जो नवीन वटहुकूम काढण्यात आला आहे, त्यामागेही काळ्या पैशाच्या व्यवहाराला पायबंद बसावा असाच उद्देश आहे.

आयात धोरणामध्ये अनेक सवलती देण्यामागे उत्पादन वाढावे असा हेतु होता. उत्पादन वाढले तर महागाईवर आळा बसण्यास मदत होईल या उद्देशाने आयातधोरणात बदल करण्यात आले; परंतु त्याचा मिळावा तसा लाभ मिळू शकला नाही. उलट आयात वाढल्याने दोन हजार कोटी रुपयांच्या विदेशी मुद्रा खर्ची पडल्या आहेत आणि वाढत्या आयातीमुळे उत्पादनवाढीचे जे अंदाज होते ते मात्र कागदावरच राहिले आहेत. आयात खर्चामध्ये वाढ झाली असला आणि इंधनावर वाढत्या प्रमाणात खर्च करावा लागला असला तरी त्याचा अपेक्षित लाभ मिळत नसल्याने आयात खर्चावर मर्यादा घालण्याच्या दृष्टीनेच अर्थमंत्रालय काम करू लागले आहे. निर्यातीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाची स्थिती फारशी समाधानकारक नाही. त्यामुळे आयात-निर्यात धोरणाचा फेरविचार सुरू असून नवीन निर्बंधांचा तपशील असलेले एखादे परिपत्रक अर्थ मंत्रालयामार्फत निघाले तर आश्चर्य वाटू नये.

वाढत्या महागाईची झळ खऱ्या अर्थाने असंघटित वर्गाला लागते. संघटित नोकरवर्ग आपल्या संघटनेच्या ताकदीवर महागाईभत्त्यामध्ये वाढ करवून घेतो. किंमतीच्या निर्देशांकाशी महागाईभत्त्याची सांगड घातल्याने अनेक कंपन्यांमधील, बँकांमधील आणि सार्वजनिक उद्योगांमधील कर्मचाऱ्यांना वाढत्या महागाईबरोबर भत्ता वाढवून मिळतो. सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनातही वाढ होते. केंद्रीय कर्मचाऱ्यांना १ फेब्रुवारीपासून महागाईभत्त्याचा आणखी एक हप्ता वाढवून देण्यात आला आहे. महागाईभत्त्याबाबतच्या एका हप्त्याचा निर्णय घ्यावा तोच दुसरा हप्ता लागू होतो. फेब्रुवारीपासून

एप्रिलमध्ये एक व जूनमध्ये एक असे दोन हप्ते लागू झाले आहेत. आता ते द्यायचे म्हणजे खर्चाचा बोजा वाढणारच. बहुतेक सर्व राज्यांना महागाईभत्त्याबाबतचे आपले धोरण केंद्र–शासनाच्या याबाबतच्या धोरणाशी निगडित केले असल्याने राज्य कर्मचाऱ्यानाही वाढत्या महागाईप्रमाणे भत्ता द्यावा लागतो. यामुळे जो पैसा मोकळा केला जातो त्यामुळे भाववाढ होते असे म्हणता येणार नाही. कारण भाववाढीला तोंड देता यावे म्हणून केलेली उपाययोजना, असेच या भत्त्याचे स्वरूप असते. पंतप्रधानाचा या संदर्भामधील मुख्य आक्षेप असा आहे की, असंघटित असलेल्या फार मोठ्या दरिद्री समाजाला अशा स्वरूपाचे कोणतेही संरक्षण नाही आणि या आक्षेपात तथ्य असल्याने भाववाढीला तोंड देण्यासाठी असंघटित अशा गरीब वर्गाला, विशेषत: ग्रामीण भागामधील शेतमजुरांना कशा प्रकारे सहाय्य करता येईल याचाही अर्थमंत्रालयाकडून विचार होत आहे. अर्थमंत्रालयाकडून जी परिपत्रके प्रसारित करण्यात आली आहेत त्यामध्ये या चिंताजनक आर्थिक परिस्थितीचा आढावा घेण्यात आला आहे.

## □ अरबांची लग्ने : एक पुस्तिका

मुंबईमधील अरेबियन नाइटस्च्या संदर्भात मजकूर मी याच सदरामध्ये दोन आठवड्यापूर्वी लिहिला होता. त्या वेळी अरबाची लग्न हा एक स्वतंत्र विषय असून त्याची तपशीलवार दखल घेणे अगत्याचे आहे असे म्हटले होते. आखाती देशांमधील अनेक मंडळी प्रतिवर्षी येथे येतात आणि यथील गरीब कुटुंबामधील मुसलमान मुलीशी लग्ने लावतात. भारतात असेपर्यंत ते या पोरीबरोबर खुशाल मौजमजा मारतात आणि जाताना या बायकांना तलाक देऊन जातात अथवा चक्क येथेच सोडून देऊन निघून जातात ! सोडलेल्या या मुली अखेरीस वेश्यागृहामधून भरती होतात. काही अरब आपल्या या भारतीय–मुसलमान बायकांना स्वदेशी घेऊन जात असले तरी तेथे त्यांना अक्षरशः मोलकरणीसारखे राबवले जाते. अरबाच्या बायकांची बाळंतपणं करणे, घरामधील स्वयंपाक–पाण्यासह सर्व कामे करणे आणि रात्रीच्या वेळी अरबाची शय्यासोबत करणे असे गुलामी जिणे या मुलींच्या वाट्याला येते. या संदर्भामधील आकडेवारीवरून असे दिसून येते की, केवळ हैद्राबादमधून अरबाशी विवाह करून २० हजार मुलींची फसगत झाली आहे. महाराष्ट्र, केरळ आणि अन्य ठिकाणी अरबांनी केलेले विवाह लक्षात घतले तर जवळजवळ ६० हजार मुसलमान मुलींनी अरबाशी विवाह केल्याचे दिसून येत. या साठ हजारांपैकी सहाश विवाहही समाधानी ठरू शकलेले नाहीत, असे या विवाहांचा पहाणी करणाऱ्या आंध्र काझी असोसिएशनने एका अहवालामध्ये नमूद केल आहे.

अरबाचे हे विवाह म्हणजे केवळ एक छानषौकीचाच प्रकार असून, पैसे मोजून उपभोगासाठी पोरी विकत घेण्याचाच हा एक प्रकार आहे, असे मतही असोसिएशनच्या अहवालात नोंदले आहे आणि काही उदाहरणं व लग्न करणाऱ्या अरबाचा थोडा-फार तपशीलही दिलेला आहे. आखाती देशातून येणारा प्रत्येक अरब हा मोठा धनाढ्य शेख आहे अशा समजुतीने त्याच्याकडं पाहिले जात असले तरी प्रत्यक्षात लग्नाच्या लफड्यात पडणारे बहुसंख्य अरब हे सामान्य कामगार, ड्रायव्हर, खाजगी नोकरदार, असे मामुली असतात. त्यामधील बहुतेकांची लग्ने झालेली असून मुलाबाळांसह ते आपल्या संसारात मश्गुल झालेले असतात. ते ज्या वेळी भारतात येऊन लग्न करतात त्या वेळी त्यांचे वय ४५ च्या पुढे व काही वेळा तर सत्तरपर्यंत असल्याचे आढळून आले आहे ! त्यांना मुली मिळतात त्या प्रामुख्याने गरीब मुसलमान कुटुंबामधून आलेल्या असतात. पालकांना पोरीचे ओझे असते आणि आणि म्हणून अरबाकडून पैसे घेऊन ते पोरीची जवळजवळ विक्री करतात. सर्वसाधारणपणे पंधराशेपासून ते पंधरा हजार रुपयापर्यंतच्या रकमा अरबांनी खर्च केलेल्या दिसतात. या लग्नाबाबत ते मुळीच गंभीर नसतात. त्यामुळेच बायको नकोशी होताच ते तलाक देऊन मोकळे होतात !

हैद्राबादमधील एका गाजलेल्या प्रकरणामुळे अनेक मुसलमान संघटनांचे या प्रकरणाकडे लक्ष वेधले गेले.

गेल्या महिन्याच्या १६ तारखेला एका अरबाने हैद्राबादमधील एका गरीब मुसलमान मुलीशी लग्न लावले. ती मुलगी या विवाहास तयार नव्हती; परंतु अरबाने मुलीच्या बापाच्या हातावर पंधराशे रुपये ठेवताच मुलीच्या वडलांनीच या विवाहाची सक्ती केली. अरब ५६ वर्षांचा होता, तर लग्न करणारी मुलगी वयात आलेली नव्हती, बापाने एकच अट घातली की मुलगी वयात आल्याखेरीज अरबाने तिच्याशी संबंध ठेवू नये ! परंतु उतावळा अरब थांबला नाही. त्याने हॉटेलमधील आपल्या खोलीमध्ये मुलीवर बलात्कार केला ! तिने आरडा–ओरडा केल्याबर मारपीट केली. पुढे संधी मिळताच ही पोरगी पोलीसस्टेशनात गेल्याने हे सारेच प्रकरण उजेडात आले. ५६ वर्षांच्या त्या अरबाने भारतामध्ये आल्यापासून चार लग्ने केली होती आणि एक घटस्फोटही दिला होता आणि लग्नाच्या तीन बायका जवळ असूनही कोवळ्या वयामधील लग्नाच्या चौथ्या बायकोवर त्याने अत्याचार केला होता! याच संदर्भामधील आणखी दोन उदाहरणे देण्यासारखी आहेत. मुंबई येथील आझाद मैदान पोलीसस्टेशनवर एक १३ वर्षांची मुसलमान मुलगी यऊन दाखल झाली. 'आपल्या अरब नवऱ्यापासून आपली सुटका करा!' अशी मागणी तिने केली. आपल्या आत्याने एक हजार रुपये घेऊन एका अरबाला आपणाला विकून टाकले, असे तिने जबाबात सांगितले. तिच्याशी तिसरे लग्न करणारा अरब ५० वर्षांहून मोठा होता! हैद्राबादमधील कमामबरा या भागामधील एका मुलीने पोलिसाकडं अशी तक्रार नोंदवली की, आपण जर सरळ मार्गाने 'तलाक' घेऊन बाजूला झालो नाही तर मुंबईला नेऊन आपल्याला विकून टाकू, अशी धमकी आपल्या अरब नवऱ्याने आपल्याला दिल्याने आपण तलाकपत्रकावर सही केली आणि तरीही आपला नवरा आपल्याला बळजबरीने मुंबईला नेऊ पहात आहे. त्याच्या हेतूबद्दल आपल्याला शंका असल्याने आपल्याला संरक्षण मिळावे. पोलिसांना या संदर्भात योग्य ती कारवाई केली व त्या मुलीचा बचाव केला तरी पोलिसापर्यंत ज्या मुलींना पोचता येत नाही, अशा असंख्य मुली अखेर आखातामध्ये मोलकरणीप्रमाणे राबवल्या जातात अथवा मुंबईमधील वेश्यागृहात भरती होतात !

अरबाशी विवाह करून असंख्य मुसलमान मुलींची फसगत

झाल्याने मुस्लिम समाजामधील काही संघटनाचे लक्ष या प्रकाराकडे वेधले असून त्यांनी आंध्रप्रदेश व महाराष्ट्र या राज्यसरकारांकडे तसेच केन्द्र सरकारकडे याबाबत निवेदने दिली आहेत. आंध्र सरकारने या प्रकरणी लक्ष घातले असून अरबांना भारतामध्ये येऊन येथील मुस्लिम समाजामधील मुलीशी विवाह करायचा असेल तर त्यांनी संबंधित मुलीच्या नावाने भारतीय बँकेमध्ये भारतीय चलनामध्ये पाच हजार रुपयांची रक्कम जमा करावी. तसेच आपल्यापेक्षा दहा वर्षांहून लहान असलेल्या मुलीशी त्याने लग्न करू नये, अशा अटी घालण्यात याव्यात, असे आंध्र शासनाचे मत असून त्यांनी केन्द्रशासनाकडे या संदर्भामधील आपले निवेदन तसेच फसलेल्या विवाहांचा एक अहवाल पाठवला आहे. या प्रश्नाचा विचार करताना आखाती देशाबरोबर असलेल्या राजकीय संबंधावर तणाव येणे संभवनीय आहे आणि ते परवडण्यासारखे नसल्याने केन्द्रिय शासन लगोलग हालचाल करणे शक्य नाही, हे ओळखून मुस्लिम समाजामधील संघटनांनी आपल्या धर्मबांधवांना पूर्ण चौकशी केल्याखेरीज अरबांना मुली देऊ नयेत, असे आवाहन केले असून या सदर्भात जी पुस्तिका प्रकाशित करण्यात आली आहे त्यामध्ये फसगत झालेल्या ४० मुलींची छायाचित्रे व माहिती देण्यात आली आहे त्यामध्ये मिरजेमधील चार मुलींचा समावेश आहे.

## □ इंग्लंडचा नेत्रदीपक विजय !

ऑस्ट्रेलिया व इंग्लड यांच्यामधील कसोटीमालिका जवळजवळ एकांगी होऊन ऑस्ट्रेलिया ही मालिका सहजी खिशात घालून जाईल असे वाटत असतानाच हातातून गेलेला तिसरा कसोटी सामना अक्षरश: खेचून आणून इंग्लडने या मालिकेमधील चुरस कायम ठेवण्यामध्ये यश मिळवले आहे. सहा कसोटी सामन्यांच्या या मालिकेमध्ये इंग्लड व ऑस्ट्रेलिया यांनी प्रत्येकी एक-एक सामना जिंकला असल्याने या मालिकेमधील चुरस कायम राहिली आहे. ४०१ धावाचे ओझे उरावर घेऊन मैदानात उतरलेल्या इंग्लडच्या सघाचा पहिला डाव ज्या वेळी केवळ १७४ धावांमध्ये गुडाळला गेला त्या वेळी इंग्लडने सामना गमावला असे मातब्बर मंडळीनाही वाटू लागले होते. इंग्लडच्या दुसऱ्या डावाची अवस्थाही केविलवाणी होती. ७ बाद १३५ वरून सर्वबाद ३५६ अशी अजब किमया इंग्लडचा माजी कर्णधार इयान बॉथम व त्याला साथ देणारा डिली या जोडीच्या झंझावती फलंदाजीमुळेच होऊ शकली. या जोडीने आठव्या विकेटसाठी ११७ धावाची भागी करून एक चमत्कारच घडवून आणला. तथापी त्याहून मोठा चमत्कार बॉब विलिसने घडवून आणला. पहिल्या डावात ४०१ धावा रचून डाव घोषित करण्याची शेखी मिरवणाऱ्या ऑस्ट्रेलियन संघाला बॉबने अक्षरश: माती चारली. अगदी चौथा डाव खेळायचा म्हटले तरी १३० ही धावसंख्या ऑस्ट्रेलियन संघाला काही तशी फार मोठी नव्हती. विशेषत: १ बाद ५६ अशी धावसख्या झाल्यावर उरलेल्या सघाला विजयासाठी आवश्यक असलेल्या ८४ धावा करणे म्हणजे तसा मामुली वाटणारा मामला, पण विजय आणि ऑस्ट्रेलिया यांच्या मध्ये बॉब बिलिस जळत्या अंगारासारखा उभा राहिला. केवळ १५ षटके टाकणाऱ्या विलीसने ४३ धावा देऊन ऑस्ट्रेलियन संघाचे आठ खेळाडू परत पाठवून विजय खेचून आणला! हॅटस ऑफ टू बॉथम अँड विली. आधीच रोचक असलेले क्रिकेट जास्त चवदार होते ते अशा विजयामुळेच ! □

चौकशी

# पुण्यातील विद्यार्थी संघटना

रमेश दिघे

काही दिवसांपूर्वी (८ ते १० जुलै) पुण्यात झालेली राज्यमंत्रीमंडळाची बैठक. या बैठकीच्या वेळेस संपूर्ण मंत्रिमंडळाला मेजवानी देण्याचा निर्णय पुणे विद्यापीठाने घेतला. विद्यापीठ तोट्यात चालू असताना या प्रकारच्या खर्चिक गोष्टी करू नयेत म्हणून पुण्यातील एका विद्यार्थी संघटनेने (एस. एफ. वाय.) या भोजनास मनाई मिळावी म्हणून न्यायालयात अर्ज दाखल करून खळबळ उडवून दिली. यासंबंधी निर्णय देताना न्यायालयाने खर्चाची मर्यादा घालून दिली. अशा प्रकारे विद्यार्थी संघटनेने न्यायालयात धाव घेण्याचे प्रकरण पुणे विद्यापीठाच्या इतिहासात अपवादात्मकच म्हणावे लागेल. परीक्षापद्धती, अभ्यासक्रम, फी-वाढ, परीक्षा-निकालातील गोंधळ इत्यादी मोजक्या व विद्यार्थ्यांशी निगडित अशा प्रश्नांवर पुण्यातील विद्यार्थी संघटनांनी आजवर अनेक आंदोलने उभी केली. बाकी विद्यापीठाचा कारभार व इतर 'गौण' प्रश्न याबाबत या विद्यार्थी संघटना बहुतेक वेळा सामान्य विद्यार्थ्यांइतक्याच उदासीन असतात. म्हणूनच अनेक विद्यार्थी-समस्या या आजही तशाच कायम आहेत. मग प्रश्न उभा राहतो की, या तथाकथित विद्यार्थी संघटना करतात तरी काय ? त्यांच्या सैद्धान्तिक भूमिका काय ? व विद्यार्थी-हिताचे प्रश्न सोडविण्यासाठी त्या कोणत्या हालचाली करतात ? इत्यादी प्रश्नांचा मागोवा घेत मी पुण्यातील विद्यार्थी संघटनाची माहिती गोळा करण्यास सुरुवात केली.

पुण्यातील विद्यार्थी संघटनामध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ही सर्वांत जुनी व मोठी विद्यार्थीसंघटना. एकनाथजी रानडे, नारायणभाई भंडारी, दत्ताजी डिडोळकर आदि अकरा संघीय प्राध्यापकानी ९ जुलै १९४९ रोजी स्थापन केलेल्या या संघटनेला खऱ्या अर्थाने अखिल भारतीय स्वरूप येण्यास १९६२ साल उजाडले. प्राध्यापक, शिक्षणतज्ज्ञ, सस्थाचालक व शासन या सर्वांनी मिळून बनलेल्या शैक्षणिक परिवाराचा विद्यार्थी हा केंद्रबिंदू असावा, ही वि. प ची सैद्धांतिक भूमिका. विद्यार्थी हा उद्याचा नागरिक नसून तो आजचा नागरिक आहे, असे परिषद मानते. पुस्तकपेढी, उपकरणपेढी, रक्तपेढी, सुट्टीतील रोजगारयोजना, व्यवसायमार्ग-

दर्शन व्याख्यानमाला इत्यादी विविध उपक्रम वि. प. तर्फे राबविले जातात.

वि. प. च्या पुणे शाखेने कामाच्या सोईसाठी पुण्याचे चार विभाग केलेले आहेत. दरवर्षी जुलैमध्ये होणाऱ्या अभ्यासवर्गात परिषदेच्या सैद्धांतिक भूमिका व विद्यार्थ्यांच्या प्रश्नासंबंधी चर्चा करून वर्षभरातील कार्यक्रमाची आखणी केली जाते. गेल्या शैक्षणिक वर्षातील वि. प. चा महत्त्वपूर्ण कार्यक्रम म्हणजे दि. १६ फेब्रु ८१ रोजी पुण्यात झालेली विद्यार्थ्यांची मागणीपरिषद. यानिमित्त सतरा प्रमुख मागण्यांचे निवेदन कुलगुरूंना देण्यात आले व या मागण्याबाबत त्वरित कारवाई करण्यात यावी अशी विनंती करण्यात आली.

वि. प. चे वैशिष्टय म्हणजे त्यांच्या मागण्यांमध्ये नेहमीच विद्यार्थी-प्रश्नाचा सर्व बाजूंनी अभ्यास असतो. मागणीपत्रातील भाषा कडक असली तरी प्रत्यक्ष कृती ही नेमस्तपणाची असते.

वि. प. संबंधी या माहितीव्यतिरिक्त इतर काही गोष्टी जाणून घेण्यासाठी वि. प. चे एक जुने कार्यकर्ते प्रा. मुकुंद तापकीर याची मी भेट घेतली. विद्यार्थी संघटनांकडे पाहण्याचा प्राचार्यमंडळीचा दृष्टिकोन हा पूर्वग्रहदूषित असतो, असे त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. या मुद्द्याचे स्पष्टीकरण त्यानी एका उदाहरणाने केले. ऑगस्ट' ७९ मध्ये वि. प. ने पुण्यातील प्रमुख दहा महाविद्यालयामध्ये एक सर्वांगीण पाहणीचा कार्यक्रम केला. त्या आधारे प्रत्येक महाविद्यालयाचे एक स्वतंत्र मागणीपत्र तयार करून ते प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांना सादर केले; परंतु फारच थोड्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्या समजावून घेतल्या. बहुतेकांनी 'महाविद्यालयीन कामकाजात विद्यार्थी संघटनाची ढवळाढवळ नको' अशी भूमिका घेतली. विद्यार्थी संघटनांचा रचनात्मक दृष्टिकोन समजावून घेतला जात नाही, ही प्रा. तापकीर याची तक्रार आहे.

कोणत्याही प्रश्नाबाबत वि. प. ची भूमिका लवकर स्पष्ट होत नाही आणि त्यातून गैरसमज निर्माण होतात. यासंबंधी प्रा. तापकीर म्हणतात—परिषदेला कोणतीही विद्यार्थीप्रिय उथळ भूमिका घेऊन चालत नाही. मग तो नामांतराचा प्रश्न असो की राखीव जागांचा. सर्व विद्यार्थ्यांना घेऊन पुढे जायचे असल्याने सर्व बाजूचा विचार करून मग वि. प. ला आपली भूमिका ठरवावी लागते. हे करत असताना कोणत्याही प्रश्नाचे राजकीय भांडवल करणे वि. प. ला मंजूर नाही. विद्यार्थीशक्ती ही गुंडगिरीत गुंतविण्यापेक्षा विधायक कार्यात गुंतविणे हा वि प. चा. दृष्टिकोन आहे.

## रजनी पाटील, धनंजय थोरात

महाविद्यालयापासून ते विद्यापीठापर्यंत विविध निवडणुकांवर वर्चस्व गाजविणारी विद्यार्थी संघटना म्हणजे एन. एस. यू. आय. सत्ताधारी काँग्रेस पक्षाची ही विद्यार्थी संघटना असल्यामुळे, सातत्याने प्रसिद्धीच्या झोतात राहण्याचे ज्याना आकर्षण आहे अशा कार्यकर्त्यांचा या संघटनेकडे विशेष ओढा. रजनी पाटील या कर्तबगार, स्वतंत्र विचारसरणीच्या विद्यार्थिनीमुळे ही संघटना नावारूपाला आली. कोणतीही विद्यार्थी संघटना ही पक्षपाठिंब्याशिवाय जगू शकत नाही, हे रजनी पाटीलचे स्पष्ट मत. याशिवाय ती म्हणते की, आजचे आमचे आदर्श हे जातीयवादाचे आहेत. विद्यापीठाच्या निवडणुकांमध्ये पैशाच्या बरोबरीने हा जातीयवाद बोकाळलेला आहे आपल्या सेनेटमधील अनुभवाबद्दल ती सांगते, 'सेनेटमध्ये फार मोठ्या प्रमाणांत गटबाजी असते. तेथे विद्यार्थी-प्रतिनिधींना दाद दिली जात नाही. सध्याचे कुलगुरु श्री. राम ताकवले हे इतरांच्या मानाने फारच समजूतदार आहेत. ते विद्यार्थ्यांना किमान बोलू तरी देतात.

एन. एस. यू. आय. चा पुण्यातील दुसरा वैचारिक आधार म्हणजे धनंजय थोरात. गेली दहा वर्षे सातत्याने समाजाच्या तळच्या थरात वावरल्यामुळे त्याचा सभोवतालच्या परिस्थितीचा चागला अभ्यास आहे. 'स्वातंत्र्योतर काळात विद्यार्थीशक्तीकडे सर्वच राजकारणी लोकाकडून दुर्लक्ष झालेले आहे. राजकारणात आपले महत्त्व प्रस्थापित करण्यासाठी विद्यार्थीशक्तीकडे पाहिले जाते', असा धनंजय थोरातचा आरोप आहे. तो पुढे म्हणतो की, 'शिक्षणाने वाढविलेल्या तरुण पिढीच्या अपेक्षा पूर्ण करण्याची क्षमता आजच्या राजकीय रचनेत नाही.' स्वातंत्र्योत्तर काळात मध्यवर्गीय पांढरपेशा व दलित वर्गांच्या विकासात बहुजन समाजाचा कोंडमारा झाला, असेही धनंजय थोरातला प्रामाणिकपणे वाटते.

पुणे विद्यापीठाची कक्षा नासिक-धुळ्यापर्यंत पसरली आहे. पण त्याच्या अभ्यासक्रमात ग्रामीण आकांक्षाची पूर्तता करू शकेल असा भाग फारच कमी आहे. शहरी मध्यमवर्गीय तरुणांच्या राहणीमानाचे आकर्षण ग्रामीण तरुणामध्ये निर्माण झाल्याने ते बहुसंख्येने शहरात येतात. त्यांच्या वसतीगृहाचा प्रश्न धसास लावण्याचे यंदा एन. एन. यू. आय. ने ठरविले आहे. तसेच साहित्य, कला, क्रीडा इत्यादीमध्ये चमकणाऱ्या विद्यार्थ्यांचा एक गट बनविण्याची योजना या विद्यार्थी संघटनेच्या डोळ्यासमोर आहे, असे सांगून शेवटी धनंजय थोरात म्हणतो—पक्षभेद विसरून विद्यार्थ्यांसाठी काम करणाऱ्यांना एकत्र आणले पाहिजे. या बाबतीत आज सर्वच संघटना विस्कळित आहेत.

## पतितपावन

पुण्यातील युवकाचा जहाल हिंदुत्ववादाचा आविष्कार म्हणजे पतितपावन संघटना. १९६८ साली दसऱ्याच्या शुभमूहर्तावर भीम बडदे, नंदू फडके, सुरेश नाशिककर आदी तरुणांनी या संघटनेची पुण्यात स्थापना केली. या सुमारास 'युक्रांद' ही जहाल व डाव्या विचारसरणीची संघटना फोफावलेली होती. त्यांच्या हिंदु संस्कृती—वरील हल्ल्यांना चोख उत्तर देणे आवश्यक होते. या गरजेतून पतितपावनचा जन्म झाला. 'आमच्या पूर्वजांनी दलितांवर अन्याय-अत्याचार केले म्हणून आम्हाला किती काळ झोडपायचे ? बदलण्याची इच्छा असणाऱ्या ब्राह्मणी तरुणांना, 'तूच या अत्याचारांना जबाबदार आहेस असे म्हणून तुम्ही किती दिवस ठोकणार आहात ?' असा स्पष्ट सवाल पतितपावन संघटनेचे माजी अध्यक्ष व एक धडाडीचे कार्यकर्ते प्रदीप रावत यानी माझ्याशी बोलताना विचारला.

विद्यार्थी संघटना या सहसा महाविद्यालयीन पातळीच्या खालती उतरत नाहीत परंतु पतितपावन ही एकमेव संघटना अशी आहे की, जी शालेय पातळीपासून ते विद्यापीठीय पातळीपर्यंत जेथे जेथे

विद्यार्थ्यांवर अन्याय होतो तेथे ठाम पावले टाकत असते. विद्यार्थी-हिताला ओलीस ठेवून शिक्षणक्षेत्रातील कोणत्याही घटकाने आपल्या मागण्या पुढे करू नयेत, ही पतितपावनची भूमिका आहे. 'आमचा धर्म, इतिहास, संस्कृती यावर हल्ला करणाऱ्याचा प्रतिकार आम्ही पूर्ण सामर्थ्यांनीशी करीत असतो,' असे पतितपावनचे कार्यकर्ते म्हणतात.

जयप्रकाशजींची संपूर्ण क्रांतीची चळवळ विद्यार्थ्यांच्या हातातून राजकारणी लोकांच्या हातात गेल्यामुळे तिचा विनाश झाला, असे प्रदीप रावत यांना वाटते. पतितपावन नेहमी टोकाची भूमिका का घेते याचे समर्थन त्यांनी असे केले की, समाजात कोणी तरी टोकाची भूमिका घेतल्याशिवाय समाज मध्यममार्गी भूमिका घेत नाही. भीमबडे यांच्यापाठोपाठ प्रदीप रावत यानी पतितपावन संघटना उभी केली. परंतु केवळ जहाल हिंदुत्ववादाच्या जोरावर ही संघटना यापुढे युवकविश्वात कितपत आपले स्थान मजबूत करेल याविषयी शंका वाटते.

## 'पुसु' ते एस. एफ. आय.

'७७ साली नवीन अभ्यासक्रमाची १२ वी आणि जुनी एफ वाय. या दोन तुकड्या मेडिकल व इंजिनिअरींगच्या प्रवेशासाठी एकत्र आल्या. शासनाने नेहमीप्रमाणे निश्चित धोरण न ठरवून घोळ घातलेला होता. प्रदीप आपटे, प्रवीण महाजन, रमण देशपांडे, लता भिसे इत्यादी 'डिलाईट'मधील डाव्या विचारसरणीच्या तरुणांनी आंदोलन उभे करायचे ठरविले. प्रश्न ज्वलंत असल्यामुळे आंदोलन पेटण्यास उशीर लागला नाही. यातूनच 'पुणे विद्यापीठ विद्यार्थी संघटना' (पुसु) उदयास आली. ७७ व ७८ या दोन वर्षांत फी वाढ, सत्र पद्धतीची अशास्त्रीय अमलबजावणी, निकालांमधील गोंधळ इत्यादी विद्यार्थी प्रश्नावर 'पुसु'ने त्या वेळेचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, कुलगुरु दाभोळकर याना घेराव घातले. गणपतीचे वास्तवस्वरूप लोकासमोर मांडण्यासाठी गणपतीप्रदर्शनाचाही 'उपद्व्याप' या संघटनेने केला. हे प्रदर्शन उधळले गेल्यामुळे या संघटनेतील नेते निराश झाले. संघटनेला काही काळ शैथिल्य आले. तरीसुद्धा सामाजिक आशय असणाऱ्या चित्रपटावर चर्चा, प्रायोगिक चित्रपटाचे प्रदर्शन इत्यादी उपक्रम 'पुसु'ने राबविले. हेतू हा की, संघटनेत येणाऱ्या विद्यार्थ्यांची वैचारिक बैठक पक्की व्हावी. याच दरम्यान 'पुसु'चे काही कार्यकर्ते हे आदिवासी भागात पूर्णवेळ काम करण्यास गेले.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षास जवळची म्हणून ओळखली जाणाऱ्या 'स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया' या विद्यार्थी संघटनेची पुण्यात '७९ साली स्थापना झाली; पण 'पुसु'पैकी रमण देशपांडे, लता भिसे यानी अलीकडच्या काही महिन्यात एस्. एस्. आय. मध्ये प्रवेश करून नव्या उमारीने कामाला सुरुवात केली. १४ फेब्रुवारी ८१ रोजी विद्यार्थ्यांच्या मोर्चाच्या निमित्ताने 'पुसु' व 'एस्. एफ्. आय.' या दोन संघटना एकत्र आल्या. २२ जून ८१ ला त्यांचे विलिनीकरण झाले. पुढे-मागे आपलेही 'युक्रांद' होऊ नये असा विचार बहुधा 'पुसु'च्या कार्यकर्त्यांनी केलेला असावा.

वरील संघटनांच्याव्यतिरिक्त युक्रांद, समाजवादी युवजन सभा, ए. आय. एफ्. इत्यादी संघटनांनी काही काळ (६५ ते ७१) विद्यार्थी-जगतामध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले होते; पण आज या संघटना विद्यार्थी संघटना म्हणून हयात नाहीत. त्यांपैकी कुमार सप्तर्षी, अरुण लिमये, विकास देशपांडे, रमेश टिळेकर हे राजकीय–सामाजिक वर्तुळामध्ये वावरताना दिसतात. या नावांच्या बरोबरीनेच आज इतर राजकीय पक्षांच्या युवक आघाड्यामध्ये किती तरी व्यक्ती अशा आहेत की, ज्यांनी 'युवक–नेता' म्हणून आपले पक्षातील स्थान पक्के केलेले आहे. म्हणूनच राजकीय पक्षामधील आपल्या स्थानाची पूर्वतयारी म्हणजे विद्यार्थी संघटनेमधील कार्य असे जर कोणी म्हटले तर ते वावगे ठरू नये.

या लेखाचा समारोप करण्यापूर्वी सर्वसामान्य विद्यार्थ्याला विद्यार्थी संघटनाबद्दल काय वाटते, याचे एक प्रातिनिधिक मत म्हणून विद्यार्थ्यांमध्ये गेली सहा वर्षे सातत्याने काम करणाऱ्या व 'फेकसत्ता' या विद्यार्थीप्रिय अनियतकालिकाचा संपादक युवराज शहा याचे मत देतो: 'विद्यार्थी संघटना या जोपर्यंत राजकीय हितसंबंधाची जपणूक करण्यासाठी वापरल्या जातात तोपर्यंत त्या व्यापक विद्यार्थीहित साधू शकणार नाहीत. विद्यार्थ्यांच्या मूलभूत प्रश्नाचा विचार कोणतीही संघटना करत नाही. किंबहुना वर्षाकाठी चार–दोन मोर्चे काढणे, शहरभर भित्तीपत्रके लावणे व एखादी फीवाढीसारखी पारंपारिक मागणी करणे याखेरीज काही कार्य करणे शक्य आहे, असे कोणत्याही संघटनेला वाटत नसावे. विद्यार्थीमंडळाच्या निवडणुका या लाखो रुपयांच्या उधळपट्टी करणाऱ्या आहेत. यातील संघटनाचा सहभाग हा वीट आणणारा आहे!'

मला वाटते, वरील तीव्र प्रतिक्रिया लक्षात घेऊन विद्यार्थी संघटना या आपल्या कार्यपद्धतीमध्ये बदल करतील. आज पुण्यातील सर्व विद्यार्थी संघटनामध्ये १% विद्यार्थ्यांचासुद्धा सहभाग नाही. बाहेरगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वसतीगृहाचा प्रश्न, तसेच महाविद्यालयांमधील प्रवेशाचा प्रश्न आणि मुख्य म्हणजे पदव्या घेऊन हिंडणाऱ्या बेकाराचा प्रश्न असे किती तरी प्रश्न दिवसेंदिवस उग्र होत आहेत. सर्व थरातील विद्यार्थ्यांना या संघटना समजावून घेऊ शकल्या, आपापले मतभेद विसरून खऱ्या अर्थाने विद्यार्थीशक्ती एक झाली तर शिक्षणक्षेत्रातील उच्चपदस्थाना विद्यार्थीविरोधी निर्णय घेताना पुन्हापुन्हा विचार करावा लागेल! पण हे होणे कसे? □


**व्हान गॉग**

'लस्ट फॉर लाइफ' या आयर्व्हिंग स्टोनच्या जगप्रसिद्ध कलाकृतीचा मराठी अनुवाद

अनुवादिका : माधुरी पुरंदरे

प्रकाशक

प्रसाद पुरंदरे, पर्वती, पुणे

श्यामचा संसार (कथा सोळावी)

फिरोझ रानडे

# यु यु काँग्रेस व हाइ् हाइ् काँग्रेस व आपला श्याम

आधीच कचेरीच्या कामामुळे श्याम मरगळला होता. त्यातून बसला खूप वेळ उभे रहायला लागल्यामुळे त्याच्या जिवाची भारी चिडचिड झाली होती. अशा मनःस्थितीत तो घरी आला व प्रथम घराचे दार उघडे आहे का ते पाहिले. ते उघडे नाही, हे बघून तो दारावरची बेल वाजवू लागला तर बेलचा मोठा मंजूळ पियानोटाइप आवाज आला.

त्या मंजुळ आवाजाने श्यामच्या रागात आणखी भर पडली. तो मनाशी म्हणाला, ह्या नव्या नव्या सुधारणा माणसाचे राग–लोभ अगदी दाखवू देत नाहीत. पूर्वी कसं बायकाना नवऱ्यावरचा राग स्टोला दणादण पप मारून दाखवता यायचा. आता गॅस आल्यामुळं रागातली हवाच निघून गेली आहे.

तसेच पूर्वी कर्कश व सतत वाजणाऱ्या बेलमुळ नवऱ्याला आपली दारं उशिरा उघडण्यामुळ होणारी चिडचिड दाखवता येत असे. आता ह्या नुसत्या 'टूय, टूय,' वाजणाऱ्या बेलमुळ नवऱ्याचा 'आवाज'च गला आहे!

श्यामन परत 'टूय, टूय' केलं. मिनिट-दीड मिनिट झालं; पण आतून जाग आली नाही वा कोणी दार उघडल नाही. त्यामुळे श्यामच्या चिडीत भागली म्हणजे वाईट भर पडला. फुल्या-फुल्यानी छापल्या जाणाऱ्या शिव्या देत तो म्हणाला, 'करते काय आहे बायको ? का डोळ्याला डोळा लागला हिचा ?'

आता दारामागे काही तरी खडबड सुरू झाली होती. प्रथम वरचा बोल्ट काढला गेला, मग मधली कडी काढली गेली, मग नाइट–लॅच. नाइट–लॅच नेहमीप्रमाणे उघडण्यास वेळ लागला, त्यामुळे श्याम जास्तच चिडला व परत बेल वाजवू लागला.

आता नाइट–लॅच निघाले होते. राधा दार उघडून म्हणाली, 'हो, हो पण माणसाने आतून येऊन दार तर उघडायला पाहिजे ना ?'

श्याम तिरीमिरीने खुर्चीवर जाऊन बसला व रुमालाने कपाळावरचा घाम पुसत म्हणाला, 'पण दिवसाढवळ्या दार इतके पक्के बंद करायची गरज काय असते तुम्हाला ?'

'आता असं बोलू नका हां!' राधा आपली काहीही चूक नाही ह्या आत्मविश्वासात म्हणाली, 'तुम्हीच नेहमी म्हणत असता की, हल्ली दिवसा–ढवळ्या चोऱ्या होतायेत, खूनसुद्धा होताहेत! दार अगदी थोड्या वेळाकरता का होईना उघडं टाकत जाऊ नका. अगदी सगळ्या कड्या लावत चला! आता असे बोलू नका. तुमचे आपले बरे असते, काही केलं तरी बायकोला दोष द्यायचा.'

आता श्याम अगदी निरुत्तर झाला होता. त्यानेच दार पक्के बंद करा, असे सांगितले होते. पोलिसाना दररोज निघणाऱ्या मोर्च्यांमुळं व मंत्री–महोदयाच्या उद्घाटनाला कराव्या लागणाऱ्या बंदोबस्तापुढं चोऱ्या व खून अशा किरकोळ गोष्टीकडे लक्ष देण्यास वेळ नव्हता. पोलीस–कमिशनरनं स्वतःच तसं T. V. वर सांगितले होते.

'दार बंद करणे योग्य आहे तुझे.' श्याम पडेल आवाजात बोलू लागला,

'पण तू मुळी दारापर्यंत यायलाच चांगला अर्धा तास लागला!' अतिशयोक्ती केल्याशिवाय जसा विनोद होत नाही तसाच राग पण दाखवता येत नाही.

'अर्धा तास कुठला ? अर्धा मिनिट असेल जेमतेम!'

'बरं अर्धा-मिनिट तर अर्धा मिनिट; पण तो तरी का लागावा ?' श्याम अर्धा तास व अर्धा मिनिटात काहीच फरक नाही ह्या भावनेने म्हणाला.

'अहो, स्वैपाक करत होते.'

'आता ह्या वेळी ? म्हणजे फ्रिजमध्ये काही शिल्लक नाही आहे ?' श्याम टोचून बोलला, अर्थात राधानं त्या टोचण्याकडे लक्ष दिले नाही.

'तसं शिल्लक आहे पण ते पाहुण्यांना वाढायचं का ? अय्या, ह्या तुमच्या रागावण्यात पाहुण्यांचं सागायचं राहूनच गेलं बघा!'

'आता कोण पाहुणे उपटलेत ह्या पावसाच्या दिवसात ?'

'अहो, आपल्या नाशिकचे पूर्वीचे आमदार येसवन्तराव पाटील, ते येताहेत दोन-चार दिवसाकरता!'

'काय नासिकचे यशवंतराव ? ते येऊ देत येणार आहेत तर; पण तू त्याना येसवंतराव म्हणू नकोस पाहू. हा अ-दलितानी लिहिलेल्या दलित वाङ्मय वाचण्याचा परिणाम! येसवतराव काय ?'

'हा काही दलित वाङ्मय वाचण्याचा परिणाम नाही. त्यानीच तशी सही केली आहे.' राधान पत्र शामच्या पुढ्यात टाकलं व आपण आत गेली.

श्यामनं पत्र पाहिलं. येसवंतराव पूर्वी आमदार होते. म्हणजे आता ते अर्स काग्रेसमध्ये आहेत हे वेगळं सागण नकोच. आमदारकी गेल्यावर त्यानी दारूबदी, भू-दानकार्य वगैरेला वाहून घेतल होतं. लेटरहेडवर अखिल भारतीय नशाबदी मंडळ छापलं होतं व पत्राच्या खाली Yes Wantro Patil अशी सही ठोकली होती!

येसवतराव काँग्रेसचे मोठे मान्यवर पुढारी होते. त्या वेळी काँग्रेस म्हणजे एकच काँग्रेस होती. म. गांधी, पं. नेहरू, स. पटेल अगदी स. का. पाटीलपर्यंत सगळ्याची काँग्रेस एक होती. त्या वेळी असे काँग्रेस I, you, He, She, It वगैरे व्याकरणमय प्रकार झाले नव्हते; पण मग नंतर काय झाले हे

सर्वांना माहित आहेच. येसवन्त राव यु काँग्रेसमधून आय काँग्रेसमध्ये येण्याचे जमंतय का ते बघत होते. रविवारच्या सह्याद्रीवर होणाऱ्या सोहळ्याला जाता आले तर बघावे; पण तेही कोणाला न कळत, म्हणून ते श्यामकडे उतरणार होते. महाराष्ट्राच्या सह्याद्री पर्वताप्रमाणे ह्या सह्याद्री बंगल्यालासुद्धा काय सोहाळे बघावे लागणार होते कोणास ठाऊक, असा विचार शामच्या मनात ते पत्र वाचून आला.

रविवारी दुपारीच यशवंतराव घरीम्हणजे श्यामच्या घरी आले तेच मोठ्या रागारागात. खादीची पांढरी टोपी टेबलावर आपटत ते म्हणाले, 'सगळीकडे लबाडी व बदमाशी चालली आहे बघा!'

'तुमच्याइतक्या लबाडी व बदमाशीवर बोलणाऱ्या दुसऱ्या अधिकारी व्यक्ति महाराष्ट्रात किती असतील?' श्यामच्या मनात हा प्रश्न येऊन गेला; पण तो बोलला नाही. आज हे यू आहेत; पण उद्या आय झाल्यावर? त्याने फक्त यशवन्तरावांकडे सहानूभुतीच्या नजरेने पाहिले.

'त्याचं काय झालंय, ह्या म्हणजे काँग्रेस आयच्या लोकाना आमच्यासारख्या निष्ठावान कार्यकर्त्यांना घ्यावयाची इच्छा आहे; पण आमचे हे यू यू चे आमदार आणि खासदारच आम्हाला हाड, हाड करून घरात येऊ देत नाहीत.'

गेल्या काही दिवसात 'घरात येणे' ह्या शब्द प्रयोगाला एक अर्थ प्राप्त झाला आहे. तो अगदी पोरासोरांना पण माहित झाला आहे. तेव्हा तो राधा–श्यामलाही माहित झाला होता.

येसवतराव आले तसेच परत गेले व श्याम–राधाचा संसार परत पूर्वीसारखा सुरू झाला होता. पूर्वीसारखा म्हटलं खरं, पण ते सर्वस्वी बरोबर नाही हल्ली हल्ली राधा दार उघडायला व श्यामला घरात येऊ द्यायला फार वेळ लावत असे श्यमला फार वेळ ताटकळत उभं रहायला लागायचे.

पूर्वी यथा राजा तथा प्रजा म्हणत असत. आता राण्याचं राज्य सुरू झालं आहे. तेव्हा यथा राणी तथा साऱ्या माया–बहिणी, असा तर प्रकार होत नव्हता ना? दार उशिरा उघडण्यात आपला अधिकार व्यक्त होतो असं तर राधाला वाटत नव्हतं ना?

एक दिवस असाच दार उघडायला उशीर झाल्यावर तो राधाला म्हणाला, 'त्या कर्वे बाई बघ, वेळी अवेळी केव्हाही बेल वाजो, तावडतोब दार उघडतात त्या!'

'तुम्ही अगदी खुळे आहात, असा भाव चेहऱ्यावर आणून राधा म्हणाली 'अहो, वेळी-अवेळीच व बाहेरच्या माणसांनाच ती कर्वेबाई झटकन दार उघडते. तिचे नका सांगू काही. ती बाई तसलीच आहे!'

तसली म्हणजे कसली, ह्या वादात श्याम पडला नाही. कारण वाद घालण्यात राधाला इतर बायकाप्रमाणे D. Lit मिळाली होती. त्यामुळं वादात पडलं की श्याम खरेच 'पडत' असे.

असेच दिवस जात होते; पण राधाचा उशीरा दार उघडण्याचा रोग बळावत चालला होता. एकदा असाच उशीरा दार उघडण्यावरुन वाद झाला. 'असं स्वत च्या घरी येण्याकरता वाट पहात थांबणं किती लाजेचं व चिडचिडीचं असतं ह्याची कल्पना आहे तुला?' श्यामनं विचारलं,

'चिडचिडीचं असेल; पण लाजेचे काय म्हणून वाटावं–पाच दहा मिनिटं थांबायला लागलं तर?' राधा.

'तुला माहित आहे. सोसायटीतले सगळे लोक मला 'यु यु काँग्रेस' म्हणतात. ह्यात काय लाज जात नाही?'

'तुमचं आपलं उगाचच. आणि लोकांच्या बोलण्यावर जाऊ नका. त्याना बोलायला काय होतं. तुमच्यापेक्षा किती तरी मोठी माणसं घरी येण्याकरता ताटकळत उभी असतात. १०–१५ मिनिटे नाही महिनान महिने! ते चिडचिडतात? उलट ते म्हणतात, 'मला काय घाई आहे?'

आता श्यामला काय बोलावं ते सुचेना. □


## प्रसिद्ध झाले

शेतकरी नेते श्री. शरद जोशी यांचे व्यक्तिमत्त्व व विचार सादर करणारे, तसेच त्यांच्या व कै. माधवराव बोरसे, श्री. प्रल्हाद पाटील, श्री. माधवराव मोरे इत्यादींच्या नेतृत्वाखाली लढल्या गेलेल्या नासिकच्या ऊस–शेतकरी–आंदोलनाचा चक्षुर्वैसत्यं वृत्तान्त कथन करणारे पुस्तक

# योद्धा शेतकरी

**सचित्र आवृत्ती, पंचरंगी मुखपृष्ठ, किंमत रुपये छत्तीस**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०.

'फिनिक्स' निवड

# इट शुड नॉट हॅपन टु अ व्हेट

लेखक : जेम्स हेरियट
प्रकाशक : पॅन बुक्स. पृ. २२९

जेम्स हेरियट हे टोपणनाव आहे. तो vet म्हणजे व्हेटर्नर सर्जन आहे. या प्राण्यांच्या डॉक्टरने सात-आठ पुस्तके लिहिली आहेत. या पुस्तकात हेरियटने त्याचे अनुभव व आठवणी दिल्या आहेत. एका पशुवैद्याने त्याच विषयावर इतक्या आठवणी व अनुभव लिहावेत याला जगात तोड नसेल ! या पुस्तकातल्या आठवणी बालटूनपालटून विनोदी व मनाला चटका लावून जाणाऱ्या आहेत. जिम कॉर्बेट, केनेथ अँडरसन, सखाला, इ पी. गी, जॉर्ज शॅलर वगैरे मंडळी वाइल्ड लाइफवर लीहितात, तर हेरियट हे डॉमेस्टिक व पेट ॲनिमलविषयी लिहितात.

सुरुवातीला आमच्या ग्रंथालयासाठी एक पुस्तक (All Creatures Great and Small) काकू करीतच घेतले; पण 'फिनिक्स' च्या वाचकवर्गाला हा लेखक एकदम पसंत पडला ! मग मी त्याची सर्वच्या सर्व पुस्तके घेऊन टाकली.

ब्रिटिश लोक प्राण्यावर प्रेम करण्यात प्रख्यात आहेत. एखादी म्हातारी विधवा किंवा जन्मकुमारी तिच्या मांजरासाठी विलमध्ये हजारो किंवा लाखो पौण्ड ठेवून जाते असे बरेच वेळा ऐकतो किंवा वाचतो. एखादा प्राणी किंवा पक्षी कुठे बिकट परिस्थितीमध्ये सापडला असेल तर त्याच्यासाठी मुद्दाम अग्निशामकदलाची मदत मागितली जाते व त्या प्राण्याचा किंवा पक्ष्याचा जीव वाचविण्यासाठी अग्निशामकदलाचे कर्मचारी स्वतःचा जीव धोक्यात घालतात हे सर्व वाचून मी लहान असताना माझ्या मनात विचार येई की, मग हेच ब्रिटिश लोक पक्ष्यांना व प्राण्यांना मारून त्याचे मांस इतक्या चविष्ट रीतीने का खातात ? ते जॉर्ज बर्नार्ड शॉसारखे शाकाहारी का होत नाहीत ?

आपल्याकडे डुक्कर हा एक किळसवाणा घाण प्राणी समजला जातो; परतु इग्लंडमध्ये डुकरेही पाळली जातात ! एकदा का एखादा प्राणी पाळला गेला की त्याचे कोण कोडकौतुक तिकडे चालते ! डुकरावर लहान मुलांच्यासुद्धा गोष्टी तिकडे उत्तम प्रकारे लिहिल्या जातात. Porky pig वगैरे नावे तुम्हाला माहिती असतीलच आणि डुकराची व त्यांच्या पिल्लांची काय गोजीरवाणी चित्रे या पुस्तकात असतात ! तिकडची डुकरंसुद्धा 'फॉरेन' म्हणून स्वच्छ व मस्त असतात. बहुतेक शहरी रहिवाशांची निसर्गाशी व प्राण्यांशी फारकतच झाली आहे. प्राण्याचे आजार, त्यांच्या सवयी, त्यांच्या भावना वगैरे गोष्टी बारकाव्याने पहाण्याइतका वेळच नसतो. मग त्यांनी आपल्या फ्लॅटमध्ये आरामशीर खुर्चीत बसल्या-बसल्या हेरियटच्या प्राणीविश्वात जरूर हिंडून-फिरून यावे !

जेम्स हेरियटच्या या पुस्तकात एका श्रीमंत बाईने एक डुकराचे पिल्लू पाळलेले असते. तिला ते एवढे गोजीरवाणे दिसते की, तिच्या नातेवाईकाचे नाव ती त्या पिल्लाला बहाल करते. या बाईला एके दिवशी असे दिसते की, ते पिल्लू थबकत थबकत लघुशंका करीत आहे ! लागलीच ती धसका घेते की, पिल्लाची प्रोस्टेट ग्रंथी वाढली आहे ! ती तावडतोब जेम्स हेरियटला फोन करते. हेरियट आल्यावर तिला सांगतो की, सवंच (नर) डुक्करे अशा तऱ्हेने लघुशंका करतात !

जेम्स हेरियटने पहिलीच आठवण एका शेतकऱ्याच्या गाईबद्दल दिली आहे. ही गाय व्यायल्यानंतर उठतच नाही. त्यामुळे शेतकरी हेरियटला बोलावणे पाठवतो. जेम्स हेरियट तिला दोन-तीन कॅल्शियमची इंजेक्शन देतो व सांगतो की, काळजी करण्यासारखे काहीच नाही; पण काही केल्या ती गाय उठेना. हा शेतकरी डॉक्टर हेरियटना सारखा सागत असे, आता माझे वडील जिवंत असते तर तिला अशी उठवली असती ! की यंव !... हा शेतकरी त्या गाईला उठविण्यासाठी काय काय करतो ? तिच्या कानात (down her lug'ole) तो थंड पाणी सोडतो. तिच्या कानात डॉक्टरसाहेबांना ओरडायला लावतो. (त्याच्या पुस्तकात हेरियटने स्वतःला थोडासा नेभळट व बावचळल्यासारखाच दाखवला आहे.) नंतर या शेतकऱ्याला आणखीन एक शंका येते की, आपल्या गाईच्या शेपटीत एखादी मोठी कृमी दडून बसली असेल ! मग तिचे शेपूटच तोडून टाकावे म्हणजे ती ताडकन उठून बसेल. अर्थात डॉक्टर हेरियटने शेतकऱ्याची समजूत (किंवा (R) SPCA ची भीती) घातली नसती तर त्याने तसे केलेही असते. भारी भोळसर असतात ही मंडळी आणि गंमत अशी की, तसे या पुस्तकात काल्पनिक असे काही नाही. या सर्व आठवणी डॉ. जेम्स हेरियटच्या अनुभवविश्वावरून घेतल्या आहेत.

'माझा बाप असे म्हणयचा की एखादी गाय अशी स्वस्थ झोपून राहिली तर एखादा विचित्र कुत्रा आणायचा...' काही केल्या ती गाय काही उठेना. तेव्हा शेतकरी परत डॉक्टरला म्हणाला, 'मग मी कुत्री मागवतो.' नंतर काय धम्माल उडाली ! शेजाऱ्यांनी आपापले वेगवेगळे कुत्रे आणले व सबंध आसमतच भुंकण्याने गाजून गेला आणि जणू या सर्वावर कळस म्हणून त्या शेतकऱ्याचा एक चिडखोर कुत्रा तेथे आला. त्याची व इतर कुत्र्यांची तिथे खडाजंगी झाली व शेजाऱ्याचे सर्व कुत्रे शेपूट घालून पळून गेले!

हे सर्व झाल्यावर डॉक्टरसाहेब असे निदान करतात की, 'गाईचे एक हाड मोडले आहे. तिचे ज्ञानतंतूसुद्धा निकामी झाले आहेत. तू आता तिला कसायाकडे घेऊन जा !'

मग तो शेतकरी गाईवर आणखी एक प्रयोग करतो. त्याचे वडील असे काही झाले की शेळीची ताजी कातडी गाईवर टाकत असत. शेतकऱ्याने तसे केल्यावर ती गाय बरी झाली व शेतात मुक्तपणे वावरायला लागली.

अर्थात डॉक्टरसाहेब एकदम खजील झाले. हेरियटचे बॉस म्हणाले की, ताज्या सोललेल्या शेळीच्या कातडीत फार 'हीट' असते म्हणून कदाचित ती उठून बसली असेल. 'हे प्राणी असे विनाकारण अडेलतट्टूसारखे वागतात. तुझ्या इंजेक्शनानंतरसुद्धा उठून बसली असती. तसे झाले नाही एवढेच !'

तो शेतकरी या गाईची विशेष काळजी घेत असे. जणू ती एक ट्रॉफीच ! तो सर्वांना सांगत असे, 'डॉक्टरसाहेब म्हणाले ही निश्चित मरणार. मी (होम रेमिडीने!) तिला बरे केले.' या गाईचे एक शिंग वाकडे व एक सरळ होते. रोज डॉक्टरसाहेब मोटारीतून निघत तेव्हा ही विचित्र शिंगे असलेली गाय डॉक्टरसाहेबांना त्यांच्या उणीवेची जाणीव करून देई.

कदाचित तुम्हाला माहीत असेल की लहान मुलांच्या डॉक्टराना-Pediatriciansना सुद्धा Vets म्हणतात ! कारण दोन्ही ठिकाणी ना प्रश्न ना उत्तरे आणि अडेलतट्टूपणाही तेवढाच !

—जे. एन्. पोंडा

रंगभूमी

# पोत्यातून गोत्यात

## एका असाप–संदेशासाठी सोडलेल्या पुड्या

'आपल्या अतृप्त आकांक्षाची प्रेते आपण एखाद्या पोत्यात दडवून ठेवलेली असतात. ती अचानक त्या पोत्यातून बाहेर पडून आपल्या नजरेसमोर आली तर आपण दुःखी होतो.' असा किंवा तत्सम काही तरी इसाप–सदेश देण्यासाठी 'पोत्यातून गोत्यात' नावाचा एक मोठा पीळ विविध नावाच्या संस्थातर्फे प्रेक्षकांच्या माथी मारला आहे.

या नाटकाचे लेखक आहेत चंद्रकात प्रभाकर देशपाडे. 'दिनकर पुरोहितचा खून' ही त्यांचीच एकांकिका तुटेपर्यंत ताणताणून त्यांनी हे तीन अंकी नाटक लिहिले आहे.

उमाकांत देवरस (माधव वाटवे) आणि रमा (आशा भेंडे) हे एक जोडपे; तर कर्नल रमाकांत (आत्माराम भेंडे) आणि त्यांची पत्नी उमा (दीपा श्रीराम) हे दुसरे जोडपे. हे चौघेजण उमाकांतच्या घरी रात्री शिळोप्याच्या गप्पा मारीत असताना अचानक दिनकर पुरोहित (उदय म्हैसकर) नावाचा एक पोलिसी आदमी तिथे अवतरतो आणि 'थोड्याच वेळात या ठिकाणी दिनकर पुरोहित नावाच्या दुसऱ्या माणसाचा खून होणार!' अशी त्यांना बातमी देतो. त्यानंतर तो खोली मधील चौघाची नावेही फटाफट ओळखतो आणि निघून जातो. सुरुवातीला रमा–उमाकांत आणि उमा–रमाकांत यांच्या विनोदी गप्पांमधून अचानक ही रहस्याची पुडी निघते. या ठिकाणी नाटकाचा पहिला अंक संपतो.

खुनाच्या तणावाखाली चौघेजण बसलेले असताना इन्स्पे. दिनकर पुरोहितने दिलेली वेळ टळत येते; तरी काहीही घडत नाही. त्याच वेळी रमा सहज स्वयंपाकघरात जाते, तर आत डायनिंग टेबलापाशी एक प्रेत पडलेले. त्याचा चेहरा हुबेहुब इन्स्पे. दिनकर पुरोहितसारखाच! रहस्याच्या पुडीतून आता ही डबल–रोलची पुडी निघते. चौघेजण आता या प्रेताची विल्हेवाट कशी लावावी, या विवंचनेत. तोच 'आला, आला पोतंवाला. पोतं घ्यायचं का पोतं ऽऽ' अशी हाळी ऐकू येते. आता अशा रात्रीच्या वेळी पोतेवाला? पण विचार करायला फुरसत नाही. प्रेत पोत्यात टाकायचे आणि–! पोतेवाल्याला (जनार्दन परब) कर्नल रमाकांत आत बोलावतात. पोतेवाल्याचे पोते म्हणजे एक भली मोठी कॉफीनसारखी पेटी. ती पेटी घेऊन त्या 'पोत्या'त ते प्रेत भरले जाते. तोच दारावर पुन्हा टकटक. एक हवालदार दारातून डोकावत असतानाच दुसऱ्या अंकाचा पडदा.

तिसरा अंक सुरू होतो आणि पोतेवालाच हवालदार बनून येतो. डबलरोलच्या पुडीतून ही वेशांतराची पुडी. काही वेळाने इन्स्पे. दिनकर पुरोहित येतो, अंगातील ओव्हरकोट काढतो; तर त्याच्या अंगावर थेट प्रेताच्या अंगावरचेच कपडे. तो 'पोते' उघडतो; तर प्रेत गायब आणि आतून एक छत्री, एक पुस्तक, एक निवडणुकीचे बॅनर आणि एक खेळण्यातील विमान अशा चार गोष्टी काढतो. या चार गोष्टी म्हणजे चार प्रतिके. रमाला छत्र्यांचा कारखाना काढायची इच्छा म्हणून तिला छत्री देतो. उमाकांतला एक पुस्तक लिहिण्याची आकांक्षा म्हणून त्याला पुस्तक, रमाकांतला लोकसभेच्या निवडणुकीसाठी उभे राहावेसे वाटत होते म्हणून त्याला बॅनर, तर उमाला अमेरिकेची हवाई सफर करण्याची हौस असल्याने तिला एक खेळण्यातील विमान. हे सगळे करून अखेर दिनकर पुरोहित सुरुवातीला सांगितलेली असाप-संदेशाची पुडी सोडतो आणि नाटक संपवतो. शिवाय नाटक संपवताना 'या गोष्टी फार गंभीरपणे घेऊ नका. उगाच कारणं–बिरणं विचारू नका!' अशी मखलाशीही करून टाकतो. प्रेक्षकांची तर्कशुद्ध विचार करण्याची शक्ती दाबून वर त्याना 'हे विचारायचं नाही,' असा बुक्क्यांचा मार देणारी ही एक नवीन युक्ती बऱ्याच नाटकांमध्ये असते.

वास्तव आणि कल्पनेच्या सीमारेषावर आट्यापाट्या खेळणारे हे कथाबीज खरे तर एकांकिकेला पुरेल इतपतच तीव्र होते. मग तेच तीन अंकी नाटकासाठी तीन-चार तासांपर्यंत पुरवायचे म्हटल्यानंतर त्यात पाणी ओतून ओतून पुरेसे पांचट आणि बेचव केल्यामुळे नाटक अतिशय कंटाळवाणे होते. (तिसऱ्या अंकात दिनकर पुरोहितच्या कामाला प्रेक्षकांनी केलेला ओरडा हा या कंटाळ्याचाच निदर्शक होता.) मग माधव वाटव्यांनी वारंवार शिरा ताणून आणि घसा खरवडून 'इन्स्पेक्टर, त्या पोत्यात काय आहे, ते उघडून पहा!' अशा आरोळ्या आणि किंचाळ्या मारल्या तरी तो कंटाळा कमी होत नाही.

नाटकाचे दिग्दर्शक आहेत प्रकाश बुद्धिसागर. नाटकाच्या कल्पनाक्षेत्रातील घुसखोरीला योग्य ठरेल असे फार्सच्या वळणाचे मुक्त, काहीसे स्वैर तंत्र त्यांनी नाटक बसविताना वापरले आहे; पण नाटकाचाच कंटाळवाणेपणा त्यातही उतरलेला. हवालदाराची कळसूत्री बाहुलीसारखी हालचाल एकदा, फार तर दोनदा पाहणे ठीक; पण दर साडेचार सेकंदात साडेपाच वेळा तो कळसूत्री बाहुलीसारखा हलायला लागला तर 'अरे, नको. अरे, पुरे!' असे म्हणावेसे वाटते.

नाटकाच्या कलाकारांमध्ये बहुतेक सगळीच बडी नावे आहेत. या सगळ्या बड्यांची, विशेषतः माधव वाटवे आणि आत्माराम भेंड्यांची कामे अतिशय सुरेख झाली असूनही शेवटी शेवटी नाटकाच्या कंटाळवाणेपणापुढे अभिनयानेही हताश होऊन हात टेकले आहेत.

नाटकाचे नेपथ्य म्हणजे तोच एखाद्या सुखवस्तू माणसाच्या फ्लॅटचा दिवाणखाना. एक कोच, खुर्च्या वगैरे आणि इत्यादी. फक्त एकच गोष्ट उल्लेखनीय भिंतीचा रंग. फिक्या रंगाच्या पट्ट्याने वरून सुरुवात होऊन चढत्या गडदपणाचे पट्टे जमिनीपर्यंत अंगावर ल्यालेल्या भिंती नाटकाच्या वास्तव व कल्पनेमधील आट्यापाट्यांना मदत करीत होत्या.

नाटक मुळातच एकांकिका–रूप नसते तर एक सूचना करता आली असती, 'या तीन अंकी नाटकाची एकांकिका करावी!'

—सदानंद बोरसे

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC-W 28
(Licensed to post without prepayment of postage-No 11)

# पुणे वार्ता

पृष्ठ ३ वरून

असं सांगत असले तरी काँग्रेस (आय)चेच नगरसेवक आता उघडपणे सांगू लागले आहेत की, निळूभाऊ लिमये आणि वसंतराव थोरात याच्यात हा समझोता एक महिन्यापूर्वीच झाला होता! आमची नऊ मतं आघाडीकडे असती तरी फरक पडला नसता, हे बोलण्यापुरतं झालं. आघाडीला खिंडार पाडण्याचं काम या गटानं केलं आणि त्यापाठोपाठ बुडती नाव सोडून इतर नगरसेवकही आघाडीबाहेर गेले.

नागरी संघटना आज काँग्रेस (आय) चीच शाखा असल्यासारखीच झाली आहे. काँग्रेस (आय) च्या प्रत्येक कार्यक्रमाला नागरी संघटनेचे नगरसेवक 'घरचा कार्यक्रम' असल्यासारखे उपस्थित असतात. 'कार्यक्रमावरील आमचे एकमत म्हणजे नागरी संघटनेनं इंदिरा गांधीच्या वीस कलमी कार्यक्रमावर व्यक्त केलेला विश्वास आहे,' अशी वक्तव्ये काँग्रेस (आय) चे नगरसेवक करतात. 'आमची युती कार्यक्रमापुरती आहे,' असा दुबळा खुलासा नागरी संघटनेचा एखादा नगरसेवक त्यावर करतो; पण अशी वक्तव्ये थांबवली नाहीत तर युती मोडून टाकू, असा इशारा मात्र कधीच दिला जात नाही. कारण मनानं सगळेच काँग्रेस (आय) ला जवळ करून बसले आहेत!

## बेशिस्त सभासदांचे लाड

स्वच्छ आणि नीतिमान कारभाराची अनेक आश्वासनं नागरी संघटनेनं पुणेकराना निवडणुकीपूर्वी दिली होती प्रत्यक्षात गेल्या दोन वर्षांत त्यानी काय उदाहरणं पुणेकरांसमोर माडली? १९७९ ला नवे सभासद निवडून आल्यावर कोणाशीही आघाडी न करता 'धोरण' म्हणून नागरी संघटनेनं महापौर–उपमहापौरपदासाठी आपले उमेदवार उभे केले. सत्तेपासून दूर राहण्याची भाषा करणाऱ्या संघटनेची दोन मतं या पहिल्याच निवडणुकीत फुटली. आपल्या पक्षाचे नऊ नगरसेवक असूनही नागरी संघटनेच्या उमेदवाराला प्रत्यक्षात फक्त सातच मतं मिळाली. आमच्या परंपरेनुसार ही मतं कशी फुटली याची चौकशी केली जाईल आणि संबंधिकांवर कारवाई केली जाईल, असा इशारा त्या वेळी त्यांच्या एका ज्येष्ठ नगरसेवकानं दिला होता.

पुढं त्याचं काहीच झालं नाही. नंतर महापालिकेच्या इतिहासातला सर्वात प्रदीर्घ ठरलेल्या कलकत्त्याच्या दौऱ्यावर अचानक गेलेल्या नगरसेवकामध्ये नागरी संघटनेचे महापालिकेतील नेते ना. तु. पवार सहभागी झाले होते. ही बाबही संघटनेला आक्षेपार्ह वाटली नाही. कारण त्याबद्दल श्री. पवार यांच्यावर काहीही कारवाई झाली नाही. या वर्षी शिक्षणमंडळाचे उपाध्यक्ष नागरी संघटनेचे उत्तम भूमकर याच्या अध्यक्षतेखाली, कार्यक्रमपत्रिकेवर विषय नसताना एकदम ठराव माडून दक्षिण भारताच्या दौऱ्यावर जाण्याचा ठराव संमत करण्यात आला, त्याबद्दलही नेत्यानी आक्षेप घेतला नाही. शिक्षणमंडळाच्या अध्यक्षाच्या निवडणुकीत आघाडीतून फुटलेल्या दोन मतांपैकी एक नागरी संघटनेचं होतं, हे सिद्ध झाल्यावरही त्याकडे फारसं लक्ष दिलं गेलं नाही. याउलट जनता पक्षानं नैतिक धैर्य दाखवून भगवान देडगावकर यांच्यासारख्या जुन्या कार्यकर्त्याची शिस्तभंगाबद्दल पक्षातून हकालपट्टी केली; पण नीतिमत्तेच्या गप्पा मारणाऱ्या नागरी संघटनेला मात्र तसेलं धैर्य झालं नाही! माजी उपमहापौर आणि स्थायी समितीचे अध्यक्ष असताना घरासमोर त्याची गाडी अडवून मोठीच मर्दुमकी गाजवण्याचा आव आणणाऱ्या डॉ. सतीश देसाईंनी आपल्या उपमहापौरपदाच्या कारकीर्दीत आपण गाडी फक्त महापालिकेच्या कामासाठी वापरली, असा दावा करून दाखवावा. त्याच्या मित्रमंडळीनी गाडी कुठेकुठे नेली हे कधी लपू शकलेलं नाही आणि या सगळ्यावर कळस म्हणून मुख्यमंत्र्यांच्या भेटीला काँग्रेस (आय) च्या ताफ्याबरोबर नागरी संघटनेचे सर्व नगरसेवक हौसेनं गेले, त्याबद्दलही नेत्यांनी त्याना जाब विचारला नाही!

नागरी संघटनेच्या राजकीय प्रवासाची सुरस कथा ही अशी आहे. 'आपल्या मूळ ध्येयधोरणांपासून दूर गेलेली ही नागरी संघटना काँग्रेस (आय) मध्ये विलीन केलेलीच बरी!' ही अनेक सर्वसामान्य नागरिकाची संतप्त प्रतिक्रिया लोकांचा या घटनेकडे पाहण्याचा दृष्टिकोनच दाखवते. निवडणुकीपूर्वी नागरी संघटनेनं प्रत्येक उमेदवाराकडून आपण संघटनेची ध्येयधोरणं न पाळल्यास राजिनामा देऊ, असं आश्वासन घेतलं होतं. आता संघटनेच्या नेत्यांनीच ही ध्येय-धोरणं धुळीला मिळवली आहेत! त्या ध्येयवादाची कसोटी घ्यायची असेल तर आता निळूभाऊंनी आपल्या नऊही नगरसेवकांना राजिनामे द्यायला सांगून पुन्हा निवडणूक लढविण्यास लावावे! नागरी संघटनची नवी 'निष्ठा' आणि नव्या 'धोरणा'चं मतदार कसं स्वागत करतात हे त्यांनीही जरूर अजमावून बघावं! □

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

मॅक्झिम गॉर्की

श्रीमती देवस्थळे

मूल्य बहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०